अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद
३२ वे राष्ट्रीय अधिवेशन
दि. १७ व १८ जानेवारी २०२५

# नेताजी शिक्षण संस्थेचे,
# सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय,
# केडगाव, ता. दौंड, जि. पुणे ४१२२०३.

प्रमुख संपादक
डॉ. अरुणा मोरे
अध्यक्षा
अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

प्रकाशक
प्राचार्य डॉ. नंदकुमार जाधव
सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय केडगाव, ता. दौंड, जि. पुणे



## प्राचीन / मध्ययुगीन / आधुनिक विभाग शोधनिबंध संग्रह खंड...4

ISSN: 2347-7075, Volume-6 Issue-8
International Journal of Advance and Applied Research (DOUBLE BLIND Peer-Reviewed )
January 2025 Special Issue

International Journal of Advance And Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor– 8.141
Vol.6 Issue-8 Jan-Feb-2025

# International journal of advance and applied research (IJAAR)

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*
**Bi-Monthly**

***Volume-6*** ***Issue-8***

**Published by:**
Young Researcher Association, Kolhapur, Maharashtra, India
***Website:*** *https://ijaar.co.in*

**Submit Your Research Paper on Email**

**Regular Issue:** 2013ijaar@gmail.com **Special Issue:** ijaar2022@gmail.com

For Publication Call On - **8888454089**

## Chief Editor
P. R. Talekar
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur(M.S), India
***Email:*** *editor@ijaar.co.in* ***Mob-*** *8624946865*

## Editorial & Advisory Board

| | | |
|---|---|---|
| **Dr. S. D. Shinde** | **Dr. M. B. Potdar** | **Dr. P. K. Pandey** |
| **Dr. L. R. Rathod** | **Mr. V. P. Dhulap** | **Dr. A. G. Koppad** |
| **Dr. S. B. Abhang** | **Dr. S. P. Mali** | **Dr. G. B. Kalyanshetti** |
| **Dr. M. H. Lohgaonkar** | **Dr. R. D. Bodare** | **Dr. D. T. Bornare** |

***The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.***

**© All rights reserved with the Editors**

ISSN NO-2347-7075

**नेताजी शिक्षण संस्थेचे**

सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय,

केडगाव, ता.  दौड, जि. पुणे ४१२२०३.

International Journal of Advance and Applied Research (DOUBLE BLIND Peer-Reviewed )
January 2025 Special Issue

प्राचीन / मध्ययुगीन / आधुनिक विभाग शोधनिबंध संग्रह खंड...

**अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद**

३२  वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. १७ व १८ जानेवारी २०२५

**-: प्रमुख संपादक:-**

डॉ. अरुणा मोरे

अध्यक्षा

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

**प्रकाशक**

प्राचार्य डॉ. नंदकुमार जाधव

सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय केडगाव, ता. दौंड, जि. पुणे

ISSN NO-2347-7075

## नेवासा येथील ३१ व्या अधिवेशनातील क्षण चित्रे

















## नेताजी शिक्षण संस्था शुभ संदेश

आमचे नेताजी शिक्षण संस्थेचे,सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय हे गेली अनेक वर्ष ज्ञानदानाचे कार्य करत आहे. दौंड तालुक्यातील शैक्षणिक अनुशेष भरून काढण्याचे कार्य आमची संस्था करत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम या अनुषंगाने होत आहे. प्राथमिक, उच्च माध्यमिक, ज्युनिअर कॉलेज, इंग्लिश मिडियम आणि महाविद्यालय अशा विविध शैक्षणिक विभागात संस्थेचे शैक्षणिक कार्य जोमाने सुरू आहे. आमचे महाविद्यालयात कला वाणिज्य व विज्ञान पदवी व पदव्युत्तर विभागसुरु असून, त्याचप्रमाणे विविध कौशल्यधिष्ठीत उपक्रम महाविद्यालयाच्या माध्यमातून चालविले जातात. NAAC मूल्यांकनात महाविद्यालयाने B++ मानांकन मिळविले आहे. आमच्या महाविद्यालयामध्ये अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे 32 वे अधिवेशनाचे आयोजन होत आहे. याचा आम्हांला विशेष आनंद होत आहे. महाविद्यालयातील इतिहास विभाग नेहमीच वेगवेगळे उपक्रमाचे आयोजन व नियोजन करत असतो. या अनुषंगाने महाविद्यालयाच्या नावलौकीकात भर पडते आहे. सदर अधिवेशनामुळे एकंदरीत ऐतिहासिक संकल्पना, संशोधन, प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक इतिहासाची माहिती व संशोधन सर्वांच्या समोर येणार आहे. याबाबत सर्व परिषदेच्या सभासदांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार व्यक्त करतो.

दि.१७ जानेवारी २०२५.

श्री.चंदकांत शेळके
(अध्यक्ष)
नेताजी शिक्षण संस्था)

श्री.सुनील निंबाळकर
(कार्याध्यक्ष)
नेताजी शिक्षण संस्था )

श्री.धनाजी शेळके
(सचिव)
नेताजी शिक्षण संस्था)



**NAAC मुल्यांकनात २०२४ महाविद्यालयास ‘B++’ श्रेणी प्राप्त**



**संकुलात होणाऱ्या विविध उपक्रमांची क्षणचित्रे**



सांस्कृतिक कार्यक्रम




जागतिक महिला दिन साजरा करताना




नारी सशक्तीकरण उपक्रम




राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत रक्तदान शिबिर




निर्भय कन्या अभियान व कराटे प्रशिक्षण




इतिहास विभाग अभ्यास सहल




विज्ञान विभागाअंतर्गत चंद्रयान प्रतिकृती

ISSN NO-2347-7075







क्रीडांगणतील क्षणचित्रे




पाककला स्पर्धा

ISSN NO-2347-7075

संस्था नोंदणी क्र. :- Mah / 464 /P

**नेताजी शिक्षण संस्थेचे**

सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, केडगाव ता. दौड, जि. पुणे ४१२२०३

International Journal of Advance and Applied Research (Double Blind Peer-Reviewed)
January 2025 Special Issue

शोधनिबंध संग्रह २०२५

**अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद**

३२ वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. १७ व १८ जानेवारी

**-: प्रमुख संपादक:-**

डॉ. अरुणा मोरे

अध्यक्षा

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

**-: प्रकाशक :-**

प्राचार्य डॉ. नंदकुमार जाधव

सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय केडगाव, ता .दौंड, जि. पुणे

**मुद्रक :-**

आवृत्ती :- प्रथम

दि. १७ /०१ /२०२५

या शोधनिबंध संग्रहात प्रकाशित झालेल्या शोधनिबंधातील मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. ती मते त्या त्या संशोधकाची समजावीत.

ISSN NO-2347-7075

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

संस्था नोंदणी क्र. :-Mah / 464 /P

# शोधनिबंध संग्रह २०२५

**प्रमुख संपादक**
डॉ. अरुणा मोरे
अध्यक्षा
अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

**-: संपादक मंडळ :-**

१. डॉ. सोमनाथ रोडे

२. डॉ. ग. का. माने.

३ . डॉ.शिवराज बोकडे

४. श्री रमेश चंदनकर

**प्रकाशक**
प्राचार्य डॉ. नंदकुमार जाधव
सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
केडगाव, ला दौंड, जि. पुणे

या शोधनिबंध संग्रहात प्रकाशित झालेल्या शोधनिबंधातील मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. ती मते त्या त्या संशोधकाची समजावीत.

ISSN NO-2347-7075

संस्था नोंदणी क्र. :-Mah / 464 /P

**नेताजी शिक्षण संस्थेचे**

सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, केडगाव ता. दौड, जि. पुणे ४१२२०३

International Journal of Advance Applied Research (DOUBLE BLIND Peer-Reviewed )
January 2025 Special Issue

# शोधनिबंध संग्रह २०२५

**अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद**

32 वे राष्ट्रीय अधिवेशन
दि. १७ व १८ जानेवारी

**-: प्रमुख संपादक :-**
डॉ. अरुणा मोरे
अध्यक्षा
अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

**प्रकाशक**
प्राचार्य डॉ. नंदकुमार जाधव
सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय केडगाव, ता . दौंड, जि. पुणे

**-: कार्यकारी मंडळ:-**

अध्यक्ष :- डॉ. अरुणा मोरे
उपाध्यक्ष :- डॉ. शिवराज बोकडे
कार्यवाह :- प्राचार्य डॉ. सोपान जावळे
उपकार्यवाह :- डॉ. अशोक कानडे
खजिनदार :- डॉ. कविता तातेड

**कार्यकारिणी सदस्यः-**

१] प्राचार्य डॉ. प्रशांत कोठे
२] श्री. रमेश चंदनकर
३] प्रा.डॉ. संजय पाटील
४] प्रा.डॉ. वैशाली भाकरे
५] प्रा.डॉ. शहाजहान शेख
६] प्रा.डॉ. सोमनाथ कदम

**निमंत्रित सदस्यः-**

१] प्रा. नामदेव गरड
२] डॉ. नारायण गवळी
३] डॉ. उर्मिला क्षीरसागर
४] प्रा.डॉ. रविंद्र सातभाई
५] प्रा. डॉ. संजय पाईकराव
६] डॉ. संजय शिंगाणे
७] डॉ. मंजुश्री पवार

**सल्लागार समितीः-**

१] डॉ. जयसिंगराव पवार
२] डॉ.पी.एन. देशमुख
३] डॉ. बी. डी. कुलकर्णी
४] डॉ.ग.का.माने
५] प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे
६] डॉ. सर्जेराव भामरे
७] डॉ. तुकाराम पाटील
८] डॉ. सतीश कदम

## अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे संस्थापक डॉ. जयसिंगराव पवार यांचे मनोगत

**डॉ. जयसिंगराव पवार कोल्हापूर**

दि. ०५/०१/२०२५

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेची स्थापना जुलै 1991 मध्ये झाली, त्यानंतर पहिले अधिवेशन धुळे जिल्ह्यातील मोराणे याठिकाणी 1992 मध्ये संपन्न झाले. दुसरे अधिवेशन कोकणातील निसर्गरम्य अलिबाग येथ भरविण्यात आले तर तिसरे अधिवेशन शाहू छत्रपतीच्या करवीर नगरीमध्ये म्हणजेच कोल्हापुर येथे 1994 साली पार पडले. तर चौथे अधिवेशन महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर येथे सपन्न झाले. 'इवलेसे रोप लावीयेली द्वारी । त्याचा वेलू गेला गगनावरी...। अशा पध्दतीने या अधिवेशनांची वाटचाल सुरु होऊन आता 32 वे अधिवेशन पंडिता रमाबाई यांची कर्म-भूमी "केडगाव " या ठिकाणी होत आहे. कोरानाचा अपवाद वगळता (2020-21) या अधिवेशनामध्ये कधीच खंड पडला नाही.

महाराष्ट्रातील तमाम इतिहास अभ्यासकांनी अधिवेशनाच्या निमित्ताने एकत्रित यावे. आपआपले संशोधन, अभ्यास, व्यासंग इतिहास-मंचावरुन मांडावेत आणि निकोप व शास्त्रशुध्द पध्दतीने इतिहासामध्ये भर घालावी हाच परिषदेचा प्रमुख हेतू आहे. मी नागपूरच्या चौथ्या अधिवेशनाच्या शोध निबंधाच्या प्रस्तावनेत शोधनिबंधाच्या विषयासंबंधी, मांडणी संबधी सविस्तर असे विचार प्रकट केले आहेत. इतिहासाच्या संशोधक, अभ्यासकांनी ते जरुर वाचावेत. त्यांची व्दिरुकती करणार नाही.

ह्या परिषदेचे नाव जरी अखिल महाराष्ट्रीय असले तरी इतिहासाच्या अभ्यासाला प्रांतीय सीमा नाहीत असे आमचे मत आहे. त्यामुळे संपूर्ण भारताच्या इतिहासाच्या कोणत्याही कालखंडावर शोध निबंध आपण परिषदेत सादर करु शकता. फक्त अशा संशोधनाची मांडणी अविकारी आणि अनाग्रही पध्दतीने होण्याची नितांत गरज आहे. कोणत्याही विचारसरणीपासून अलिप्त आणि यथायोग्य आणि 'तर्कशुध्द' पध्दतीने प्रथम दर्जाच्या संदर्भाच्या आधारे इतिहास शास्त्रशुध्द स्वरुपात मांडला जावा अशी परिषदेची भूमिका आहे. आपण हिंदी, इंग्रजी, मराठी कोणत्याही भाषेतून आपले शोध निबंध सादर करु शकता. अभ्यासकांनी आपल्या विषयाशी संबंधित सर्व भाषांतील साधनांचा परामर्श घ्यावा आणि आपली विधाने पुन्हा पुन्हा तपासून पहावीत ही ऐतिहासिक संशोधन पध्दती अंगीकारावी.

केवळ अधिवेशने भरवणे हाच परिषदेचा हेतू नाही तर, चर्चासत्रे, सेमीनार भरवणे, इतिहास संशोधन करणा-या संस्थांना उर्जितवस्था प्राप्त करुन देणे, इतिहासाचे बदलते स्वरुप लक्षात घेणे, आजकाल इतिहास हा अति संवेदनशील असा विषय होत आहे त्या विषयी चर्चा करणे, ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्यासाठी प्रयत्न करणे, असे अनेक उपक्रम परिषद राबवित आहे.

परिषदेची अधिवेशने विदर्भ, मराठवाडा, कोकण, खानदेश, अश्या अनेक भागात भरवून त्या त्या भागातील अभ्यासकांना परिषदेने व्यासपीठ उपलब्ध करुन दिले आहे. या परिषदेच्या सल्लागार समितीत डॉ. सोमनाथ रोडे (लातूर-मराठवाडा), डॉ. पी.एन. देशमुख, डॉ. ग का माने (विदर्भ), डॉ. सर्जेराव भामरे (खानदेश), डॉ. बी. डी. कुलकर्णी (पुणे), डॉ. सतिश कदम (तुळजापूर), डॉ. टी, एन पाटील (कोल्हापूर) असे महाराष्ट्राव्या सर्व भागातील नामवंत इतिहास तज्ञ व संशोधक आहेत. त्यांच्या सहकार्यानेच ही परिषद तारुण्यांच्या उंबरठ्यावरुन परिपक्कतेकडे चालली आहे.

दोन दिवसांची अधिवेशन घेणे, शोध निबंध वेळेत प्रकाशित करणे, ही कामे जिकीरीची आहेत असतात पण परिषदेचे अध्यक्ष, कार्यकारणी सदस्य, सल्लागार मंडळ यांच्या संयुक्त जबाबदारीतून ही वाटचाल नेहमीच यशस्वी होत असते.

मी नेताजी शिक्षण संस्थेचे मनापासून आभार मानतो, त्यांनी अल्पावधीत ही परिषद घेण्याचे मान्य केले. अध्यक्ष मा.श्री. चंद्रकांतजी शेळके, सचिव मा. श्री धनाजी शेळके, कार्याध्यक्ष मा. श्री सुनील निंबाळकर व नेताजी शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचे व्यक्तीशः आभार मानतो. त्यांनी आम्हाला ह्या परिषदेच्या यशस्वीतेसाठी सर्व प्रकारच्या सोयी, स्टाफ, निवास योजन, वाहन व्यवस्था उपलब्ध करुन दिली. व सर्वात महत्वाचे म्हणजे शोध निबंध संग्रह ही छापून देण्याचे मान्य केले. त्याबद्दल परिषद त्यांची ऋणी आहे.

आतपर्यंतच्या परिषदेच्या सर्वच अध्यक्षांनी, कार्यकारणी, सल्लागार मंडळ यांनी परिषदेसाठी केलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन परिषदेची भावी वाटचाल उत्तरोत्तर वर्धिष्णू बनत जावो अशी शुभकामना व्यक्त करुन लेखणीला पूर्ण विराम देतो!

**आपला**
**डॉ. जयसिंगराव पवार**
**संस्थापक, अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद**
**(कोल्हापूर)**

ISSN NO-2347-7075

## संपादकीय



**डॉ. प्रा अरुणा अर्जुन मोरे**
अध्यक्ष, अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद
(३२वे अधिवेशन,केडगाव, दौंड जि.पुणे )
मोबाईल – ९८५००१४५७३

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेची स्थापना झालेल्या आज 32 वर्ष होत आहेत, परिषदेला तीस वर्षे पूर्ण होऊन परिषद जेव्हा परिपक्व झाली, तेव्हा परिषदेची पहिली महिला अध्यक्ष होण्याचा मान मला मिळाला, हे मी माझे भाग्य समजते परिषदेचे संस्थापक अध्यक्ष माननीय जयसिंगराव पवार व परिषदेचे वरिष्ठ सल्लागार यांनी मी परिषदेसाठी प्रामाणिकपणे मनापासून केलेल्या कार्याची नोंद घेतल्यामुळेच हे शक्य झाले असो.

ही परिषद केवळ शोधनिबंध सादर करण्यासाठी नसून, हे शोध निबंध पुस्तक रूपाने प्रसिद्ध करण्याचे कार्य दरवर्षी करते मोराणेच्या पहिल्या अधिवेशनापासून ही परंपरा चालत आलेली आहे. परिषदेने नेहमीप्रमाणेच संशोधकांना हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. शहरी आणि ग्रामीण असा भेदभाव परिषदेने कधीच केला नाही, म्हणूनच मोराणे असो किंवा चिंचणी सारखा आदिवासी भाग असो की महाराष्ट्र आंध्रच्या सीमेवरचे अत्यंत दुर्गम भागातील संगरोळी सारखे गाव असो आम्ही तेथेही परिषदेची अधिवेशने भरवली आहेत. त्यामुळे आज तालुका ठिकाण नसलेल्या छोट्याशा केडगावचे ही आमंत्रण स्वीकारून आज या ठिकाणी आम्ही अधिवेशन घेत आहोत म्हणूनच परिषदेचे स्वरूप हे सर्व समावेशक असे झाले आहे. ग्रामीण भागालाही शहरा इतकेच महत्त्व आहे, हे आम्ही अधोरेखित करू इच्छितो यामागे सर्वसामान्यांपर्यंत परिषदेचे कामकाज पोचावे हा हेतू संस्थापक अध्यक्ष डॉ. जयसिंगराव पवार यांचा होता व आहे व आम्ही तो पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

लातूरच्या तिसाव्या अधिवेशनापासून परिषदेचे शोधनिबंध लगेचच त्याच अधिवेशनात प्रकाशित करण्याचे कार्यकारणीचे सदस्य सल्लागार मंडळ व त्या वेळचे अध्यक्ष डॉ. सतीश कदम यांनी ठरविले. त्यामुळे संशोधक अभ्यासकांना वर्षभर वाट पाहावी लागत नाही हे शोधनिबंध तज्ञ विभागीय अध्यक्षांकडून तपासून घेऊनच प्रकाशित केले जातात त्यांचा संशोधकांना फायदा होत आहे.

केडगाव ही एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या विद्वान विदुंषी स्त्री सुधारक पंडिता रमाबाई यांची कर्मभूमी पंडिता रमाबाईंनी शारदा सदन ची स्थापना करून वंचित शोषित निराधार विधवा परित्यक्ता स्त्रियांना आधार देऊन स्वपायावर उभे केले. रमाबाईंच्या पुरोगामी विचाराने प्रस्थापित धर्म राजकारण्यांनी त्यांना धर्म बहिष्कृत केले त्यामुळे पुण्यासारख्या तत्कालीन सनातनाच्या बालेकिल्ल्यातून त्या केडगावला आल्या व हीच आपली कर्मभूमी मानून त्यांनी स्त्रियांसाठी शेवटपर्यंत कार्य केले.

आज इतिहासात अनेक नवनवीन विचार प्रवाह आलेले आहेत त्यापैकी 'स्त्रीवाद' हा एक प्रमुख प्रवाह आहे ह्या प्रवाहाविषयी आज सभोवतालचा अस्वस्थ करणारा भवताल बघून मी थोडेसे विचार लिहिणार आहे सुरुवातीस मी स्त्रीवाद ही संकल्पना स्पष्ट करू इच्छिते.

स्त्रीवाद एक परिवर्तनवादी सम्यक राजकीय जाणीव आहे स्त्रीला स्वतः च्या शक्तीचे आलेले भान समाजाच्या प्रगतीत असलेला सहभाग, स्वातंत्र्य, मानवतावाद, समता या मूल्यांशी तिची झालेली ओळख म्हणजे स्त्रीवाद, अन्याय अत्याचार दडपशाही शोषण या सर्वातून मुक्तता होण्यासाठी उचललेले कृतिशील पाऊल म्हणजे स्त्रीवाद लोकशाही कुटुंब व्यवस्था तयार करण्यासाठी तशीच शिक्षण व्यवस्था निर्माण करणे व अर्थकारणातही ही खाजगीकरण उदारीकरण या ऐवजी सामाजिकीकरणावर भर देणे म्हणजे स्त्रीवाद' लोकशाही विकेंद्रीकरण हे तत्व राबविण्याचा व तसे संस्कार करण्याचा अविरत प्रयत्न स्त्रीवादात अपेक्षित आहे. 1960 ते 70 हे दशक युनोने स्त्री दशक म्हणून जाहीर केल्यापासून शैक्षणिक जगतात, जेव्हा स्त्री प्रश्नांचा अभ्यास सुरू झाला तेव्हा स्त्रीवादी जाणीव निर्माण झाली व स्त्रीवादाचा अभ्यास सुरू झाला याच काळात बेट्टी फ्रीडन व सीमाँतबुआंचे लिखाण भारतात वापरले जाऊ लागले. सुरुवातीस ही पाश्चात्य संकल्पना आहे असे मानले जात असे पण महाराष्ट्रात संत काळापासून आपल्याला ही आधुनिकता सापडते महाराष्ट्रातील पहिला शास्त्रशुद्ध स्त्रीमुक्तीचा विचार महात्मा फुले यांच्या विचारात साहित्य व कृती मध्ये प्रकट झाला म्हणूनच म्हटले जाते "पहिले नमन करु ज्योतिबाला ज्याने स्त्रीमुक्तीला जन्म दिला", ज्योतीबांचाच प्रभाव असलेल्या ताराबाई शिंदे व ज्योतिबाच्या शाळेत शिकणाऱ्या मुक्ता साळवे या बहुजन समाजातील स्त्रियांनी एकोणिसाव्या शतकात त्यांच्या बुद्धिनिष्ठ आकृतीबंधातून स्त्रीवाद प्रभावीपणे मांडला आहे. उच्चवर्णीय स्त्रियांचे जगणे व दलित स्त्रियांचे जगणे यातील फरक दाखवून मुक्ता साळवे यांनी जी राजकीय भूमिका घेतली आहे त्यावरून सर्व स्त्रियांची दुःखे एकाच साच्यात मोजमाप करणे

चुकीचे आहे हे अधोरेखित केले गेले आधुनिक भारतातील स्त्रीवादाची सुरुवातच या दोघींच्या विचारातून होते. पुरुष सत्तेला जसे हवे आहे किंवा दिसते आहे त्यापेक्षा जग खूप वेगळे आहे हे स्त्रीवादाने मांडले. पुरुषसत्ताक पद्धतीत स्त्रियांची झालेली हानी स्त्रीवाद मांडतो कोणतेही सत्य हे सत्य मांडणाराच्या स्थानानुसार समजेनुसार जात, वर्ग लिंग या भेदामुळे घडलेल्या व्यक्तिमत्त्वानुसार आकार घेते असे स्त्रीवाद सांगतो स्त्रीवादाने स्त्रीचा आवाज व तिच्या वेदनेचे वास्तव प्रथम उघड केले इतिहास म्हणजे His Story मग ती Her story का होऊ शकत नाही, असा प्रश्न स्त्रीवाद विचारतो.

इतिहास लेखन शास्त्रातील सर्वात प्रभावी ज्ञान शाखा म्हणून स्त्रीवादाचा उल्लेख करता येईल. स्त्रियांच्या इतिहासापासून सुरुवात करून आता स्त्रीवादी लिंगभाव या टप्प्यावर तो येऊन पोहोचला आहे, इतिहासाची स्त्रीवादी दृष्टिकोनातून मांडणी करणारे संशोधन जगभरात अनेक देशात सुरू आहेत. मात्र स्त्रीवादी ऐतिहासिक संशोधनाच्या बाबतीत ब्रिटन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया व भारत या चार देशांचे नाव अग्रक्रमाने घेण्यात येते. फ्रेडरिक ऍन्जल्स गर्दालर्नर या दोन संशोधकांनी जगभरात पितृसत्ताक कुटुंब पद्धती अवतरल्यापासून स्त्रियांच्या दुय्यमत्वाला सुरुवात झाली, हे संशोधनातून पुढे आणले. डॉ. कुमकुम राय, डॉ. शरद पाटील डॉ. लीला दुबे सुकुमारी भट्टाचारी यासारख्या स्त्रीवादी इतिहासकारांनी प्राचीन भारतीय समाजाचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून नवा इतिहास मांडला. तर उमा चक्रवर्ती यांनी 'ब्राह्मणी पितृसत्तेने' कोणती कामगिरी बजावली याची चर्चा आपल्या संशोधनात केली, या संशोधनाच्या कितीतरी आधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "जातीव्यवस्था व भारतीय स्त्रियांचे प्रश्न" यांच्यातील आंतरिक संबंधाची चर्चा केली होती. "स्त्रिया या जातीव्यवस्थेच्या प्रवेशद्वार आहे" हे त्यांच्या संशोधनाचे सूत्र होते. या सिद्धांताचा उपयोग करून भारतात स्त्रीवादी इतिहास लेखनाचे नवे अवकाश उपलब्ध झाले. डॉ. जास्वदी वांबूरकर यांच्या स्त्रीवादी विचार प्रवाहात त्या लिहितात, "जेव्हा शालेय महाविद्यालयीन पदव्युत्तर अभ्यासक्रमातून एकोणिसाव्या शतकातील सुधारणा चळवळीचे गोडवे गाण्यात इतिहासाचा समस्त अध्यापक वर्ग गुंतला होता, तेव्हा केवळ पितृसत्ताकच नव्हे, तर बदलत्या राजकीय अर्थशास्त्रामुळे राष्ट्रवादी परिभाषेतूनही स्त्रियांचे पुनर्साचीकरण कसे घडले, याची मांडणी करणारे डॉ. कुमकुम संगारी व सुदेश वैद यांनी संपादित केलेले रिकास्टिंग वुमन एॅसेज इन कलोनियल हिस्टरी हे पुस्तक 1989 साली प्रकाशित झाले मालविका कार्लेकर तनिका सरकार मीरा कोसंबी विनया खडपेकर तारा भवाळकर विद्युत भागवत ज्युडीथ वॉल्श, या अभ्यासकांनी महाराष्ट्र व बंगालच्या स्त्री लिखित साहित्याच्या आधारे स्त्रीवादी दृष्टीकोनातून नवा इतिहास पुढे आणला, तर पुण्यात साहित्य प्रेमी भगिनी मंडळाच्या डॉ. मंदा खांडगे यांनी "स्त्री साहित्याचा मागोवा" या खंडामधून भारतीय स्त्रियांच्या लेखनाचा समृद्ध वारसा प्रकाशित केला आहे.

जात, वर्ग, प्रदेश, राष्ट्र, परत्वे स्त्रियांच्या वाट्याला येणारे दुय्यमत्व भिन्न प्रकारचे असते. या गृहीतकातून नवे अभ्यास पुढे येत आहेत बहुजन समाजातील स्त्रियांना इतिहासात दुय्यमता देणारे अनेक अभ्यास पुढे आले यात उर्मिला पवार व मीनाक्षी मून यांचे "आम्ही इतिहास घडविला" हे पुस्तक अग्रक्रमावर होते. चतुर्भुज साहू शर्मिला रेगे मीना आनंद बद्री नारायण नारायण भोसले यांची पुस्तके या दृष्टीने महत्त्वाची आहेत. अशा प्रकारे स्त्रीवादी इतिहास लेखनाचा सारांश रूपाने मी थोडाफार आढावा घेतला, तरी विविध विद्यापीठांच्या इतिहास विषयक अभ्यासक्रमावर ओझरती नजर टाकली, तरी मुख्य प्रवाही इतिहासाची चौकट अबाधित राखत स्त्रियांच्या इतिहासावर एखाद दुसरा टॉपिक किंवा वैकल्पिक विषय म्हणून स्त्रीवादी इतिहास लेखनाचा अंतर्भाव केलेला दिसतो एनसीईआरटी च्या पाठ्यपुस्तकातून त्याची शास्त्रशुद्ध मांडणी केलेली दिसते, मला असं वाटतं की महाराष्ट्राच्या पाठ्यपुस्तक निर्मितीतही असे प्रयत्न व्हायला पाहिजेत.

आज 21 व्या शतकात भारतामध्ये भवताल असा दिसतोय की बाई माणूस म्हणून जगायचे असेल, तर प्रथम तिला धर्मांच्या विखारी राजकारणाच्या विरोधात उभे राहावे लागेल कारण धर्मांध राजकारण बाईकडे माणूस म्हणून नव्हे, तर मादी म्हणून बघणार या राजकारणाला विरोध करण्याचे आव्हान आपल्यासमोर आहेच, जात संस्था पितृसत्ता यावर प्रहार करणाऱ्या पंडिता रमाबाईचे कर्तृत्व म्हणून महान आहे. आपण त्यांचा वारसा या अधिवेशनाच्या निमित्ताने पुढे नेऊ यात आपल्या संवेदनशीलतेचा परीघ वाढवायलाच हवा अस्वस्थ करणाऱ्या भवतालाला जाब विचारायलाच हवा शेवटी असे म्हणेन की स्त्रीला माणूस म्हणून जगू द्यायचे असेल तर आपली दृष्टी बदलायलाच हवी पंडित रमाबाईंच्या विचारांचे तसेच स्त्रीवादी अभ्यासाचे मंथन या व्यासपीठावर व्हावे म्हणून हे थोडे लांबलेले संपादकीय.

या 32 व्या अधिवेशनाच्या शोधनिबंध संग्रहाचे संपूर्ण काम पाहणाऱ्या सुभाष कुल महाविद्यालय (केडगाव) इतिहास विभागाच्या स्थानिक सचिव डॉ शोभा वाईकर, प्राचार्य नंदकुमार जाधव, स.प्रा.शौर्या जगताप यांचे मी परिषदेच्या वतीने अंतकरणांपासून आभार मानते. या परिषदेच्या यशस्वीतेसाठी अथक परिश्रम करणारा प्राध्यापक वर्ग, कर्मचारी वर्ग, विद्यार्थी वर्ग, या सर्वांचे प्रति सद्भावना व्यक्त करते संस्थाचालक सचिव यांचेही शतशः आभार.

शोधनिबंध संग्रहाची उत्कृष्ट व सुबक छपाई वेळेत केल्याबद्दल माळशिरस च्या विशाल प्रिंटिंग प्रेस चे मालक संतोष माने व त्यांच्या सहकारी करिश्मा लवटे, प्रिया घोडके, ऋतुजा लष्करे यांचेही मनापासून आभार !

ISSN NO-2347-7075

# प्राचार्य मनोगत



**प्राचार्य डॉ. नंदकुमार जाधव**
सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय केडगाव,
ता . दौंड, जि. पुणे

नेताजी शिक्षण संस्थेच्या सुभाष बाबुराव कुल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे ३२ वे राष्ट्रीय अधिवेशन शुक्रवार दिनांक १७ जानेवारी व शनिवार दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी संपन्न होत आहे त्याबद्दल खूप आनंद होत आहे. नेताजी शिक्षण संस्थेच्या या महाविद्यालयामध्ये इतिहास प्रेमींचा व विद्वजनांचा असा मेळावा जमवण्याचा योग जुळून आलेला पाहून आम्ही भारावून गेलो आहोत. या परिषदेच्या निमित्ताने डॉ. जयसिंगराव पवार, डॉ.पांडुरंग बलकवडे यांच्यासारख्या अनेक नामवंत इतिहास संशोधकांचे विचार उपस्थित त्यांना ऐकायला मिळणार आहेत. वेगवेगळ्या विषयांवर शोधनिबंध सादर करून इतिहास संशोधकांना संशोधनासाठी सक्रिय चालना मिळणार आहे तसेच इतिहास प्रेमींसाठी शिवकालीन शस्त्रे, दुर्मिळ नाणी, मोडी लिपीतील कागदपत्रे व उत्खननामध्ये सापडलेली पुरातत्वीय साधने यांचे प्रदर्शन पहावयास मिळणार आहे त्यामुळे ही परिषद इतिहास प्रेमींसाठी पर्वणी ठरणार आहे. केडगाव सारख्या छोट्या खेड्यांमध्ये जिथे साधन सुचितांची कमतरता असतानाही महाविद्यालयाने राष्ट्रीय परिषद आयोजित करण्याचे इंद्रधनुष्य पेरलेले आहे. या परिषदेच्या आयोजनाच्या संदर्भात आमच्यावर जो विश्वास अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या अध्यक्षा डॉ. अरुणा मोरे, सचिव डॉ. सोपान जावळे तसेच सल्लागार डॉ. बी. डी. कुलकर्णी तसेच सर्व कार्यकारिणीने दाखवला त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो. या परीक्षेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी डॉ. अवनिश पाटील, इतिहास विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी स्वीकारली. तसेच प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक विभागीय अध्यक्ष पदाची जबाबदारी अनुक्रमे डॉ. पद्माकर प्रभुणे, डॉ. लहू गायकवाड, डॉ. मंजुश्री पवार यांनी स्वीकारली त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. या परिषदेसाठी मा. डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. देविदास वायदंडे, सदस्य, व्यवस्थापन परिषद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या उपस्थितीमुळे आम्हास मोठे बळ मिळणार आहे. महाविद्यालयाला कायम मदत करणारे आमदार राहुल दादा कुल या परिषदेचे उद्घाटक म्हणून लाभले असल्यामुळे आम्हाला आनंद होत आहे. इतिहास हा विषय माणसाला वर्तमान काळात कसे जगावे आणि भविष्याचा वेध कसा घ्यावा हे शिकवत असतो. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता फ्रान्सिस डेक्कन म्हणतो की, ' इतिहास ही मानवाला शहाणा बनवणारी विद्या शाखा आहे' . आणि हेच शहाणपण समाजामध्ये कमी झाले आहे असे दिसते. सभोवतालचे एकंदरीत आर्थिक, सामाजिक व राजकीय वातावरण व त्यातील अस्थिरता यामुळे समाजाचे स्वास्थ्य ढळल्यासारखे झाले आहे. काही इतिहासातील घटनांचे राजकारणाच्या सोयीसाठी अर्थ व अन्वयार्थ काढून समाजाची दिशाभूल करण्याची उदाहरणे दिसून येत आहेत. नेमका हाच धागा पकडून या परिषदेमध्ये होणारी चर्चा, तज्ज्ञ साधन व्यक्तींचे मार्गदर्शन व शोधनिबंधांचे सादरीकरण यातून इतिहासातून प्राप्त होणारे शहाणपण समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोहोचेल असा विश्वास वाटतो. बोगद्याच्या टोकाशी दिसणारा उजेड हा नेहमी आपल्या अंगावर येणाऱ्या आगगाडीचा असतो असे नव्हे, तो बहुतेक वेळा अंधाराचे पहाड फोडून आसमंत उजळणाऱ्या सूर्याचा असतो...... तेव्हा कुसुमाग्रजांनी सांगितल्याप्रमाणे आपण आपल्या कुवतीनुसार प्रकाशाचा एक छोटा दिवा लावू या......... या परिषदेतील तज्ज्ञ व मान्यवर अभ्यासकांचे विचार व शोधनिबंध हे संदर्भ मूल्य म्हणून भविष्यामध्ये जपले जातील ही अपेक्षा



**डॉ.शोभा बबन वाईकर**

स्थानिक सचिव (एम ए, पीएच.डी. एम.फील, बी.एड )

इतिहास विभाग

Email: shobhawaikar1177@gmail.com

❖ **केडगाव विषयी-**

केडगाव हे गाव अतिशय सुंदर गाव आहे. या गावांमध्ये पूर्वी कुस्तीचा आखाडा भरवला जात असे. कुस्ती खेळण्यासाठी अनेक गावांमधून लोक येत असत. केडगाव हे गाव कुस्तीच्या स्पर्धेसाठी प्रसिद्ध होते. लोक कुस्तीपाहण्यासाठी व खेळण्यासाठी येत असत. कुस्तीच्या स्पर्धेमध्ये विजेत्याला बक्षीस म्हणून कडा दिला जात असे. या बक्षिसरुपी कड्यावरून या गावचे नाव कडेगाव असे पडले पुढे त्याचे रूपांतर केडगाव असे झाले.केडगाव मध्ये खूप वाडी आहेत परंतु आजही चांगल्या अवस्थेत असणारा वाडा अवचट वाडा आहे. अतिशय सुंदर व रेखीव असा हा वाडा आहे. आणि चांगल्या रीतीने आजही जतन केल्याचे आपल्याला दिसून येते. हा वाडा सुमारे ३०० वर्षापूर्वीचा असल्याचे म्हणले जाते. पेशवे कालखंडात पहिल्या बाजीरावांच्या कालखंडामध्ये १७२० ते १७४० म्हणजे हा वाडा पेशवेकालीन आहे असे म्हणतात.

ऐतिहासिक दगडी शिळा या शिळा केडगाव मधील महादेवाच्या मंदिरासमोर तसेच मंदिरामध्ये आपल्याला पाहायला मिळतात. या शिळावरती आपल्याला कोरीव काम केलेले दिसून येते. यावर देवी- देवता दिसून येतात.तसेच काही महिला पिंडीची पूजा करत आहे असे दिसून येते. वाद्य वाजवतानाही चित्र आपल्याला दिसून येतात.महादेवाचे मंदिर हे पांडवकालीन असल्यामुळे या शिळा देखील या मंदिरात आहे.शहाजी राजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सुपे परगण्यातील केडगाव हे एक ऐतिहासिक गाव आहे.

येथील पंडिता रमाबाई मुक्ती मिशन ही अनाथांचे संगोपन करणारी संस्था जगविख्यात आहे. या गावाला पंडिता रमाबाईच्या सामाजिक कार्याचा वारसा लाभलेला असून मुक्ती मिशनमध्ये अनेक ऐतिहासिक वास्तू तत्कालीन इतिहासाची साक्ष देतात. केडगाव येथे श्री नारायण महाराज बेट दत्त संस्थान असून तिथे नारायण महाराजांची संजीवन समाधी आहे. येथील दत्त मंदिर स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. केडगाव नजीक पुणे जिल्ह्याचे वेरूळ म्हणून प्रसिद्ध असलेले भुलेश्वर हेमाडपंथी मंदिर असून यादवकालीन स्थापत्य शैलीचा उत्कृष्ट नमुना आहे. महाराष्ट्रातील अष्टविनायकांपैकी मोरगाव, सिद्धटेक, थेऊर व रांजणगाव ही चार ठिकाणे केडगाव पासून जवळ आहेत.

❖ **संस्थेविषयी-**

नेताजी शिक्षण संस्थेची स्थापना सन १९६५ मध्ये ग्रामीण भागात शिक्षणाची ज्ञानगंगा समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी झाली. माध्यमिक,उच्च माध्यमिक व इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा व महाविद्यालय इत्यादी शाखांची स्थापना करून आज संस्थेमध्ये साडेचार हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रकांत शेळके, सचिव श्री धनाजी शेळके व कार्याध्यक्ष श्री सुनील निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची विकासाकडे यशस्वीपणे वाटचाल सुरू आहे.

❖ **महाविद्यालयाविषयी-**

सन २००१ मध्ये सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना झाली.आज महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालू आहेत. व्यावसायिक शिक्षण देणारी बी. व्होक शाखा कार्यरत आहे. सन २०२४ मध्ये नॅक मूल्यांकनाद्वारे B++ग्रेड प्राप्त झाली आहे. महाविद्यालय हे एक तालुक्यातील अग्रगण्य असे महाविद्यालय आहे गेली २५ वर्षे महाविद्यालय हे अविरतपणे ज्ञानाची गंगा तळागाळापर्यंत पोहचवत आहेत . आमच्या महाविद्यालयामध्ये बीए, बीकॉम, बी.एस्सी, बी.व्होक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाबरोबरच कौशल्याधिष्ठीतअभ्यासक्रमाचे

अध्यापन केले जाते. एकंदरीत महाविद्यालयातील प्राध्यापक हे संशोधन प्रवण असून ९०% प्राध्यापक पीएच.डी आहेत. प्रत्येक वर्षात महाविद्यालयातील प्राध्यापक पन्नासच्या आसपास संशोधन लेख लिहितात. म्हणजे महाविद्यालयात संशोधन व संशोधन वृत्तीला विशेष प्राधान्य आहे. जैव विविधता जपणारा गांडूळ प्रकल्प, जल संवर्धन प्रकल्प, खाद्यपदार्थ निर्मिती असे विविध नाविन्यपूर्ण उपक्रम महाविद्यालयात राबवले जातात. महाविद्यालयातील इतिहास विभाग हा नेहमीच विविध उपक्रम घेण्यात अग्रेसरआहे इतिहास विभागातर्फे मोडी लिपीचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच महात्मा गांधी विचार संस्कार परीक्षेचे आयोजन केले आहे. इतिहास विभागामध्ये जुन्या व दुर्मिळ नाण्यांचा, टपाल पाकिटे व तिकिटे, दुर्मिळ वस्तू व शिल्पे,यांचा संग्रह आहे. भूगोल विभागातील प्राध्यापकांचे सात विषयांवर पेंटट मिळवलेले आहेत. या अनुषंगाने विविध विषयाचा अभ्यास होऊन समाजाला याचा विशेष उपयोग झालेला आहे. श्रीलंकेतील केलानिया विद्यापीठाबरोबर तसेच विविध सामाजिक संस्था, विविध विषय परिषदा यांच्याशी आमच्या महाविद्यालयाचे सामंजस करार केलेले आहेत. यामुळे शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक ज्ञानाची आदान - प्रदान होत आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी देशी-विदेशी खेळात धनुर्विद्या प्रशिक्षण, क्रिकेट, खोखो, कुस्ती, बॉक्सिंग, कबड्डी, हॉलीबोल, योग जिम इत्यादी उत्कृष्ट सोय सुविधा संस्थेने ग्रामीण भागात निर्माण केलेल्या आहेत. सर्व सोयीसुविधा शून्यातून विश्व निर्माण करताना अनेक अडीअडचणी संकटे आली आणि अशा परिस्थितीत संस्थेने सर्वांना सोबत घेऊन शिक्षणाचा वसा आणि वारसा तितक्याच समर्थपणे चालवत आहे. नवीन तंत्रज्ञानाच्या जोडीने विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण देण्यासाठी डिजिटल क्लास रूम्स, डिजिटल पॅनल बोर्ड, ग्रंथालय, अद्यावत संगणक कक्ष, प्रयोगशाळा निर्माण केलेले आहे. स्पर्धा परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी मार्गदर्शकांची सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

ISSN NO-2347-7075

# इतिहास संशोधनात पूर्वसुरी इतिहासलेखकांच्या अभ्यासाचे महत्त्व

**अध्यक्षीय भाषण**

**डॉ. अवनीश पाटील**
प्रमुख, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१

सन्माननीय व्यासपीठ आणि येथे जमलेल्या सर्व इतिहासप्रेमींना माझा नमस्कार!

इतिहासाच्या अभ्यासक्षेत्रातील एका प्रतिष्ठित व्यासपीठावर आज आपल्या सर्वांसमोर बोलताना मला मनस्वी आनंद होत आहे. येथे उपस्थित आपण सर्वजण इतिहासाचे जाणकार अभ्यासक आहात. आपल्यापैकी अनेकजण या विषयातील मूलभूत संशोधन करणारे संशोधक आहात. त्यामुळे आपले या क्षेत्रातील योगदान निश्चितच माझ्यापेक्षा अधिक असल्याची जाणीव मला आहे. त्यामुळे आपल्यासमोर इतिहासावर बोलणे माझ्यासाठी एक आव्हान आहे. तथापि, पंडिता रमाबाई यांच्या कर्मभूमीत उभे राहून बोलण्याची एक अनमोल संधी मला आपण दिली आहे, ही माझ्यासाठी आनंदाची आणि अभिमानास्पद गोष्ट आहे. त्याचा निश्चितच लाभ उठवत मी इतिहास आणि इतिहासलेखनाबद्दल माझे काहीएक चिंतन आपल्यासमोर ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे.

इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात जेव्हा मी पदार्पण केले त्यादरम्यान म्हणजे, १९९४ साली अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनात कोल्हापूर येथे इतिहासकार स. मा. गर्गे यांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणाची पुस्तिका माझ्या वाचनात आली. या भाषणात स. मा. गर्गे यांनी इतिहास कसा घडतो आणि केव्हा आकार घेतो, याबद्दल अतिशय मार्मिक विवेचन केले आहे.

स. मा. गर्गे यांनी आपल्या भाषणात इतिहासाविषयीच्या अनेक सामान्य गैरसमजुतींना अगदी साध्या-सोप्या शब्दात खोडून काढले आहे. केवळ इतिहासकालीन घटनांचे क्रमवार निवेदन म्हणजे इतिहास नव्हे. तो इतिहासाचा केवळ प्राथमिक आणि वर्णनात्मक भाग आहे. समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींची शौर्यगाथा म्हणजेही केवळ इतिहास नव्हे. व्यक्ती कितीही कर्तृत्ववान असली तरी, जोपर्यंत तिला समाजाच्या मनातील असंतोषाचा वेध घेतल्याशिवाय नव्या विचारांची प्रेरणा देता येत नाही, तोपर्यंत तिचे कार्य इतिहासाला आकार देऊ शकत नाही. केवळ सत्ताविस्तारासाठी झालेल्या युद्धांचे आणि राजकीय डावपेचांचे वर्णन म्हणजेही इतिहास नव्हे. केवळ वर्गसंघर्षाची चिकित्सा केली तरीही इतिहासाचा संपूर्ण बोध होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे, इतिहासाचा अर्थ समजण्यासाठी फक्त कालबाह्य धर्मग्रंथांचे संशोधन करणेही पुरेसे ठरत नाही.

या भाषणातील स. मा. गर्गे यांचा एक विचार माझ्या मनावर कायमचा कोरला गेला आहे. वास्तविक हा विचार म्हणजे, त्यांचा इतिहास अभ्यासाचा दृष्टिकोनच आहे. ते म्हणतात, घटनाक्रम, थोर व्यक्ती, युद्धे, अर्थकारण आणि धर्म या सर्व बाबींचा विचार इतिहासाच्या अभ्यासासाठी आवश्यक असतो हे निर्विवाद आहे. परंतु, इतिहासाला आकार देणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे समकालीन वैचारिक प्रेरणा होय. या प्रेरणांचा शोध घेतल्याशिवाय घटनांचा अन्वयार्थ पूर्णपणे लागू शकत नाही. इतकेच नव्हे, तर समाज परिवर्तनाची दिशा, गती, कार्यपद्धती आणि परिणाम यांचे यथार्थ आकलनही याच वैचारिक प्रेरणांच्या आधारे होऊ शकते. गर्गे यांच्या या विचारांचा माझ्या संशोधनाच्या पुढील वाटचालीवर आणि विचारप्रक्रियेवर खोलवर प्रभाव पडला. त्यामुळे, परिषदांमधील भाषणांचा, संशोधकांवर विशेषतः नवोदित इतिहासकारांवर किती मोठा प्रभाव पडू शकतो याची मला पूर्ण जाणीव आहे.

या जबाबदारीसाठी अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या अध्यक्षा प्राध्यापक डॉ. अरुणा मोरे यांचा मला फोन आला. त्यावेळी मी शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद अधिवेशनांच्या अध्यक्षीय भाषणांचे संकलन आणि संपादन करीत होतो. या भाषणांमध्ये य. दि. फडके, जी. टी. कुलकर्णी, जयसिंगराव पवार, आ. ह. साळुंखे, अरविंद देशपांडे, राजा दीक्षित, वसंत शिंदे, प्रा. देगलूरकर अशा अनेक थोर इतिहासकारांनी केलेली अध्यक्षीय भाषणे समाविष्ट आहेत. या ग्रंथाचे संपादन करताना एक गोष्ट माझ्या लक्षात आली ती म्हणजे, अध्यक्षीय भाषणे ढोबळमानाने दोन प्रकारची असतात. पहिला प्रकार, इतिहास म्हणजे काय? तो कसा लिहिला जावा आणि वर्तमानातील जीवनात त्याची भूमिका काय असावी, याबद्दलची तात्त्विक मांडणी हा होय. तर

दुसरा प्रकार, अध्यक्षाने स्वतःच्या संशोधनातून निवडलेल्या आणि एका विशिष्ट विषयावर केंद्रित असलेले शोधनिबंध वाचणे होय. इंडियन हिस्टरी काँग्रेसच्याही अध्यक्षांची भाषणे जवळ जवळ अशाच प्रकारची असतात.

आता माझ्यासमोर प्रश्न असा होता की, यापैकी कोणत्या प्रकाराचा अवलंब करावा? तात्त्विक चर्चा करावी, इतिहासाच्या भवितव्याबद्दल भाष्य करावे, की माझ्या स्वतःच्या संशोधनावर आधारित एखादा शोधनिबंध सादर करावा? निर्णय घेण्यापूर्वी मी सखोल विचार केला. मी माझ्या अंतरंगात डोकावून पाहिलं, आणि मला जाणवलं की, माझ्या संशोधनाचा प्रवासच माझ्यासाठी या संदर्भात दिशादर्शक ठरू शकतो. मी स्वतःला काही प्रश्न विचारले. मी इतिहास कसा शिकलो? मला कोणी शिकवले? इतिहास संशोधनाच्या पद्धती आणि तंत्रे मी कशी आत्मसात केली? संशोधनाचे विषय मी कसे निवडले? ते मला कसे सुचले? या प्रश्नांच्या चिंतनातून मला 'इतिहास संशोधनात पूर्वसुरी इतिहास लेखकांच्या अभ्यासाचे महत्त्व' या विषयावर माझे विचार मांडण्याची प्रेरणा मिळाली. माझ्या मते, इतिहासलेखनाचा अभ्यास हे आपल्या इतिहास आकलनाच्या केंद्रस्थानी आहे. कारण ते केले तरच आपल्याला कळते की, भूतकाळाचे ज्ञान कसे प्राप्त होते, इतिहास कसा लिहिला जातो आणि ऐतिहासिक ज्ञानाच्या संदर्भात आपण आज कुठे आहोत.

हे विशद करण्यासाठी मला रामायणातील एकलव्याची कथा आपल्यासमोर मांडावी वाटते. रामायणातील एकलव्य आणि द्रोणाचार्य यांची कथा ही गुरू-शिष्य परंपरा, समर्पण, त्याग याशिवाय अन्यायाचे प्रतिक म्हणून सांगितली जाते. आपल्या सर्वांना माहीत आहे की, एकलव्य हा एक निष्णात धनुर्धर होता. परंतु, त्याला द्रोणाचार्यांसारख्या श्रेष्ठ गुरूकडून प्रत्यक्ष शिक्षण घेण्याची संधी मिळाली नाही. तरीही त्याने हार मानली नाही. त्याने द्रोणाचार्यांची मातीची मूर्ती बनवली आणि त्या मूर्तीलाच आपला गुरू मानून तिच्यासमोर अथकपणे धनुर्विद्येचा सराव केला. त्याची ही समर्पण भावना, त्याची ही निष्ठा, खरोखरच अद्वितीय होती. द्रोणाचार्य देखील त्याच्या या कौशल्याने आणि गुरूवरील श्रद्धेने प्रभावित झाले. परंतु, त्यांनी अर्जुनाला सर्वश्रेष्ठ धनुर्धर बनवण्याचे वचन दिले होते. या वचनाला एकलव्याचे धनुर्विद्येतील कौशल्य अडसर ठरत होते. त्यामुळे त्यांना एकलव्याकडे गुरुदक्षिणा म्हणून त्याच्या उजव्या हाताचा अंगठा मागावा लागला. एकलव्याच्या कथेचा सामाजिक अन्वयार्थ बाजूला ठेवूया. द्रोणाचार्यांनी एकलव्याला धनुर्विद्येचे तंत्र प्रत्यक्ष शिकवले नव्हते. त्याने द्रोणाचार्यांच्या मूर्तीसमोर सराव करून स्वतःच ते तंत्र आत्मसात केले होते. आजच्या इतिहासकारांची परिस्थिती एकलव्याप्रमाणेच आहे. आपल्या पूर्वसुरींनी केलेले लेखन आणि संशोधनाचा वारसा त्यांच्यासमोर आहे. त्यामुळे एकलव्याप्रमाणे त्यांचे लेखन वाचून आणि अभ्यासून अप्रत्यक्ष त्यांच्याकडून आपण इतिहासलेखनाचे धडे घेत असतो. त्यातून नवदृष्टी प्राप्त करून घेत असतो.

२

मला व्यक्तीश: इतिहास विषयाचे तंत्र आणि मंत्र याच थोर पूर्वसुरींच्या लेखनाचा अभ्यास करून शिकायला मिळाले आहे. आधुनिक काळात थोर व्यक्तींच्या पुतळयांची जागा त्यांच्या लेखन आणि विचारांनी घेतलेली आहे. आज आपण आपल्या पूर्वसुरींच्या संशोधनाचा अभ्यास करून त्यांना इतिहासलेखनातील आपले मार्गदर्शक करू शकतो. हाच शिकण्याचा सर्वश्रेष्ठ मार्ग आज उपलब्ध आहे.

त्यांच्या लेखनातून आपल्याला काय मिळते? त्यांच्या लेखनातून आपल्याला केवळ माहितीच मिळत नाही, तर इतिहास संशोधनाचे विविध दृष्टीकोन, पद्धती आणि तंत्रे देखील समजतात. त्यांच्या चुकांमधून आपण शिकतो, त्यांच्या यशापासून प्रेरणा घेतो आणि त्यांच्या संशोधनावर आधारित आपले स्वतःचे संशोधन पुढे नेतो. आणि हीच तर आहे खरी इतिहासलेखनाची परंपरा आहे. म्हणूनच आपल्या पूर्वसुरींच्या ऋणातून मुक्त होण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या लेखनाचा अभ्यास करणे, त्यांच्या विचारांचा सन्मान करणे आणि त्यांनी दिलेल्या योगदानाला पुढे नेणे. हे आपले कर्तव्य आहे आणि तीच आपली गुरुदक्षिणा आहे.

इतिहासलेखन शास्त्राचा एक अभ्यासक म्हणून, आपल्या देशातील तसेच देशाबाहेरील अनेक नामवंत इतिहासकारांच्या लेखनाचा अभ्यास मी केला आहे. त्यांच्या बहुतांश लेखनाचे वाचन, चिंतन केले आहे. यामध्ये डी. डी. कोसंबी, अ. रा. कुलकर्णी, एरिक हॉब्सबॉम, क्रिस्टोफर बेली, बेनेडिक्ट अँडरसन, बी. सुरेंद्र राव, जे. व्ही. नाईक, व्ही. एस. कदम, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अशोक चौसाळकर , डॉ. अरुण भोसले अशा अनेक थोर अभ्यासकांचा समावेश आहे. या इतिहासकारांच्या विद्वत्तेने, त्यांच्या विश्लेषणात्मक कौशल्याने, त्यांच्या विषय निवडीने, अभिलेखागारातील कागदपत्रांच्या त्यांच्या वाचनाने आणि भूतकाळातील घटनांची पुनर्रचना करण्याच्या त्यांच्या मांडणीने मी नेहमीच प्रभावित झालो आहे. त्यांच्या विद्वत्तेतून आणि लेखनातून मला खूप

काही शिकायला मिळाले. इतिहासलेखनाच्या विविध पद्धती आणि दृष्टीकोन समजून घेण्यास मदत झाली. प्रत्येक इतिहासकाराची स्वतःची एक शैली असते, स्वतःचा एक दृष्टीकोन असतो. कोणी सामाजिक इतिहासावर भर देते, तर कोणी आर्थिक इतिहासावर. कोणी राजकीय इतिहासावर लक्ष केंद्रित करते, तर कोणी सांस्कृतिक इतिहासावर. या विविध दृष्टीकोनांचा अभ्यास करूनच आपण इतिहासाचे बहुआयामी आकलन करू शकतो. आपण अभ्यासकांच्या पावलावर पाऊल ठेवून, इतिहासाच्या अधिक सखोल आणि व्यापक आकलनासाठी प्रयत्न करू शकतो.

३

आजकाल, उत्तर-आधुनिक विचारसरणीच्या प्रभावामुळे, इतिहास म्हणजे केवळ इतिहासकारांच्या वैयक्तिक कामगिरीचा आविष्कार आहे, असा विचार बळावत चालला आहे. पण या विचाराला विरोध करणारी एक महत्त्वाची भूमिका अशी आहे की, इतिहास हा केवळ लेखकांच्या वैयक्तिक अभिव्यक्तीपुरता मर्यादित नसतो. आर्थर मॅरविक यांनी त्यांच्या 'द न्यू नेचर ऑफ हिस्टरी: नॉलेज, एव्हिडन्स अँड लँग्वेज' या प्रसिद्ध पुस्तकात, इतिहासाला केवळ भाषेचा खेळ मानणाऱ्या उत्तर-आधुनिक विचारांचा जोरदार विरोध केला आहे. त्यांनी इतिहासाच्या 'ऑट्युर' सिद्धांताचे स्पष्टपणे खंडन केले आहे. मॅरविक आपल्याला असे सुचवतात की, आपण इतिहासाकडे हजारो इतिहासकारांच्या एकत्रित प्रयत्नांतून निर्माण झालेल्या विशाल ज्ञानभांडाराचा परिणाम म्हणून पाहिले पाहिजे. केवळ काही मोजक्या 'ऑट्युर'ची वैयक्तिक निर्मिती म्हणून नाही. जसे चित्रकलेत रेम्ब्राँ, साहित्यात शेक्सपियर किंवा संगीतात बीथोव्हेन हे एकटे प्रतिभावंत आहेत, तसे इतिहासात नसते. म्हणूनच, इतिहास हा वैयक्तिक इतिहासकारांच्या कार्यापेक्षा त्यांच्या एकत्रित योगदानातून अधिक समृद्ध आणि व्यापक होत असतो.

थोडक्यात, इतिहासलेखन आणि संशोधनाच्या क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल, तर आधीच्या विद्वानांच्या कार्याचा अभ्यास करणे अनिवार्य आहे. 'पूर्वसुरींच्या खांद्यावर उभे राहणे' 'Standing on the shoulders of giants' या उक्तीप्रमाणे, त्यांनी दिलेल्या ज्ञानाचा भक्कम पाया रचूनच आपण संशोधनाची नवी शिखरे गाठू शकतो. प्रसिद्ध शास्त्रज्ञ सर आयझॅक न्यूटन यांनी वापरलेली ही म्हण आज आपल्यासाठी, विशेषतः इतिहासाच्या दृष्टीकोनातून, अत्यंत मोलाची आहे. ते म्हणाले होते, 'जर मी आज अधिक दूरवर पाहू शकलो, तर ते केवळ थोर व्यक्तींच्या खांद्यावर उभे राहूनच!' न्यूटन यांचे हे विधान आपल्याला काय सांगते? हे आपल्याला सांगते की, ज्ञान हे संचयी असते, ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते. आणि हे संक्रमण कसे होते? तर, आपण आपल्या पूर्वसुरींच्या कार्याचा अभ्यास करून, त्यांच्या चुकांमधून शिकून आणि त्यांच्या यशावर आपली भर घालून पुढे जात असतो.

म्हणूनच, इतिहास संशोधन करताना आपण हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की, आपण कधीच एकटे नसतो. आपल्या आधी अनेक विद्वानांनी या क्षेत्रात काम केलेले असते, आपले योगदान दिलेले असते. त्यांच्या संशोधनाचा अभ्यास करणे, त्यांच्या निष्कर्षांचे मूल्यमापन करणे आणि त्यावर आधारित आपले स्वतःचे संशोधन पुढे नेणे हे आपले कर्तव्य असते. असे केले तरच आपल्याला इतिहासाचे सखोल आणि चौफेर आकलन होऊ शकते आणि आपण काही नवीन मांडणी करू शकतो.

असे बऱ्याचदा मानले जाते की, ऐतिहासिक संशोधन हे ऐतिहासिक साधनांच्या अभ्यासापासून सुरू होते. ही इतिहासाची साधने विविध प्रकारची असतात, पण त्यामध्ये प्रमुख हे ऐतिहासिक दस्तावेज असतात. हे दस्तऐवजांचे सागर इतके अफाट आणि विस्तृत असतात की संशोधकाला सुरुवात कुठून करावी हेच समजणे अवघड असते. कल्पना करा, तुम्ही एखाद्या अभिलेखागारात (archive) गेलात आणि आपण अभ्यासासाठी काय निवडावे हेच तुम्हाला समजत नसेल तर, अशा वेळी गोंधळ उडणे स्वाभाविक आहे.

जी. जे. रेनियर यांनी १९५० साली लिहिलेल्या 'History: Its Purpose and Method' या पुस्तकात, 'accepted history' या महत्त्वाच्या संकल्पनेवर प्रकाश टाकला. त्यांच्या मते, कोणत्याही ऐतिहासिक संशोधनाचा पाया हा आधी उपलब्ध असलेल्या माहितीवरच उभा असला पाहिजे. कारण, प्रत्येक संशोधन हे आपल्याला माहीत असलेल्या गोष्टींपासून माहीत नसलेल्या गोष्टींकडे, सापडलेल्या गोष्टींपासून न सापडलेल्या गोष्टींकडे घेऊन जाते. थोडक्यात, इतिहास संशोधन करण्यासाठी आपल्याकडे अगोदरच बरीच माहिती असणे गरजेचे आहे. आपण ज्या ज्ञानाच्या आधारे संशोधन सुरू करतो, त्यालाच आपण इतिहासलेखन म्हणतो. हे जरी अपूर्ण ज्ञान असले तरी ते अत्यंत मौल्यवान आहे. आपल्या क्षमता, दूरदृष्टी आणि आपल्या पूर्वसुरींच्या कार्याचा आधार घेऊन, हे अपूर्ण ज्ञान आपल्याला अधिक पूर्ण आणि सखोल ज्ञानाकडे घेऊन जाऊ शकते.

४

ISSN NO-2347-7075

ऐतिहासिक संशोधनाच्या प्रवासाला सुरुवात करतानाची पहिली पायरी आपल्याला ज्या विषयावर लिहायचे आहे, त्याबद्दल प्राथमिक माहिती असणे ही आहे. त्या विषयाच्या अभ्यासासाठी कोणती साधने उपलब्ध आहेत, हे समजून घेणे त्यासाठी महत्त्वाचे आहे. ही प्राथमिक माहिती आणि अभ्यासाची दिशा आपल्याला कोठून मिळते. तर, ज्या विद्वानांनी या क्षेत्रात यापूर्वी संशोधन केले आहे आणि आपले निष्कर्ष प्रकाशित केले आहेत, ते आपल्याला ही दिशा दाखवतात. याचा अर्थ असा की, आपण आपल्या पूर्वसुरींच्या अनुभवांवर आणि ज्ञानावर आधारित ज्ञानाची इमारत उभारत असतो. म्हणूनच, इतिहास संशोधनात आपल्या पूर्वसुरींचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

थोडक्यात सांगायचे झाल्यास, ऐतिहासिक संशोधन म्हणजे केवळ कागदपत्रांच्या ढिगाऱ्यात हरवून जाणे नाही, तर ती एक सुव्यवस्थित आणि पद्धतशीर प्रक्रिया आहे. आपल्याला विषयाची सखोल माहिती घ्यावी लागते, त्यासाठी उपलब्ध साधनांचा अभ्यास करावा लागतो, आणि पूर्वीच्या संशोधनाचा संदर्भ घेऊन पुढे मार्गक्रमण करावे लागते. अशा पद्धतीनेच आपण इतिहासाचा खरा अर्थ समजून घेऊ शकतो आणि त्यातून नवीन ज्ञान निर्मिती करू शकतो.

पण ह्याचा अर्थ काय? ह्याचा अर्थ सरळ आहे, आज आपण जे काही ज्ञान, जी काही माहिती मिळवतो, ती अचानक हवेतून निर्माण झालेली नाही. त्यामागे अनेक वर्षांची परंपरा, अथक परिश्रम आणि अनेक पिढ्यांचे योगदान आहे. ज्याप्रमाणे न्यूटनने आधीच्या शास्त्रज्ञांच्या कामावर आधारित आपले सिद्धांत मांडले, त्याचप्रमाणे इतिहास संशोधनात देखील आपल्याला आपल्या पूर्वसुरींच्या कार्याचा आधार घ्यावा लागतो.

परंतु, इथेच खरी कसोटी लागते ती म्हणजे चिकित्सक दृष्टीची! पूर्वसुरींनी जे काही लिहून ठेवले आहे, ते जसेच्या तसे स्वीकारणे म्हणजे इतिहास संशोधन नव्हे. आपल्याला त्यांच्या कामाचे चिकित्सक पद्धतीने विश्लेषण करावे लागते. त्यांच्या मांडणीतील त्रुटी शोधून काढाव्या लागतात, त्यांच्या विचारांना आव्हान द्यावे लागते आणि नव्या पुराव्यांच्या आधारे नवी मांडणी करावी लागते आणि हेच तर खरे इतिहास संशोधनाचे आव्हान आहे. म्हणूनच, पूर्वसूरींच्या कार्याचा सन्मान करत, त्यांच्या योगदानाचा कृतज्ञतापूर्वक स्वीकार करत, आपण इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात योगदान देणे गरजेचे आहे. त्यासाठी पूर्वसुरींच्या खांद्यावर उभे राहताना, त्यांचा आदर करत असताना, आपण चिकित्सक दृष्टीकोन कसा जोपासायचा, हे समजणे आवश्यक आहे.

असे म्हणतात की इतिहास म्हणजे जुन्या कागदपत्रांचा अभ्यास. पण फक्त कागदपत्रे घेऊन बसलो तर गोंधळच उडेल. एवढी कागदपत्रं असतात की कोठून सुरुवात करावी हेच कळत नाही. जणू एखाद्या महासागरात हरवल्यासारखे होते. म्हणूनच, ऐतिहासिक संशोधनाची खरी सुरुवात होते ती आपल्याला काय शोधायचे आहे हे ठरवण्यापासून. आपल्याला कोणत्या विषयावर लिहायचे, त्याबद्दल आधी कोणी काय लिहिले आहे काय? हे समजून घ्यावे लागते. जणू काही आपण एका अपरिचित नकाशाच्या मदतीने प्रवास सुरू करतो. हा नकाशा आपल्याला कोण बनवून देतात? तर आपल्या आधीचे संशोधक! त्यांनी केलेल्या कामाचा अभ्यास करून, त्यांच्या चुकांमधून शिकून आपण पुढे जातो. अशा प्रकारे, इतिहास संशोधन म्हणजे फक्त जुन्या कागदपत्रांचा अभ्यास नसून, त्या कागदपत्रांमधून अर्थ शोधण्याचा, आपल्या पूर्वजांच्या कामाचा आदर करून पुढे जाण्याचा एक प्रवास आहे.

इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी, 'पूर्वसुरींच्या खांद्यावर उभे राहणे' या तत्त्वाचा स्वीकार करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यातून आपण आपल्या आधीच्या पिढ्यांनी रचलेल्या पायावर आपण नवीन आणि मर्मग्राही ऐतिहासिक कथने निर्माण करायला हवीत. पण ही वाटचाल धोरणात्मक दृष्टीकोनातून करणे गरजेचे आहे.

यातील पहिला आणि कदाचित सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे योग्य 'पूर्वसुरी' निवडणे हा होय. आपल्या संशोधन आवडीशी सुसंगत असणाऱ्या इतिहासकारांना आपण काळजीपूर्वक ओळखले पाहिजे. हे केवळ भूतकाळाचे वृत्तांतकार नसतात, तर ते एखादा विशिष्ट कालखंड, घटना किंवा विषयाबद्दलच्या आपल्या आकलनाला आकार देणारे प्रभावशाली व्यक्तिमत्त्व असतात. अशा व्यक्तिमत्त्वांना इतिहासाच्या संवादाचे शिल्पकार माना, ज्यांच्या मूलभूत संशोधनाने भूतकाळाचा अर्थ लावण्याकरिता एक चौकट निर्माण केली आहे. म्हणूनच, निवड विचारपूर्वक करा, कारण त्यांच्या दृष्टिकोनातूनच तुम्हाला पुढे पाहता येईल आणि इतिहासाच्या सतत विकसित होणाऱ्या पटलामध्ये अर्थपूर्ण योगदान देता येईल.

कोणतेही ऐतिहासिक संशोधन पूर्णपणे सर्वसमावेशक नसते. प्रत्येक अभ्यासक हा काही प्रश्न अनुत्तरित, तर काही दृष्टीकोन न शोधलेले आणि काही साधने न तपासता ठेवत असतो. या टप्प्यात इतिहासलेखनाचे अचूकपणे मूल्यांकन करणे व त्यांनी दुर्लक्षित केलेले पैलू , घटना व साधने ओळखणे महत्त्वाचे असते. यामध्ये 'मान्यताप्राप्त अशा थोर संशोधनाच्या एका विशिष्ट

पैलूवर लक्ष केंद्रित करणे, संबंधित परंतु भिन्न ऐतिहासिक घटनेचा शोध घेणे किंवा थोर अभ्यासकांनी केलेल्या संशोधनानंतर उदयास आलेले नवीन पुरावे, साधने किंवा पद्धतींचा वापर करणे, हा मार्ग असू शकतो.

५

पूर्वसुरी इतिहासकारांच्या खांद्यावर विराजमान होणे म्हणजे त्यांचे संशोधन आणि लिखाण केवळ वाचणे नव्हे, तर ते पूर्णपणे समजून घेणे. यात त्यांच्या युक्तिवादांचा अभ्यास, त्यांनी वापरलेल्या पुराव्यांची चिकित्सा, आणि त्यांच्या ऐतिहासिक संशोधन पद्धतींचा सखोल विचार समाविष्ट असतो. हे फक्त त्यांच्या लेखनाचा स्वीकार करण्यापुरते मर्यादित नसून, त्यात आलेल्या विचारांचे आणि योगदानांचे तर्कशुद्ध विश्लेषण करणेही महत्त्वाचे आहे. त्यांची भूमिका इतिहासलेखनाच्या संकल्पनेत कुठे बसते, हे समजून घेणे आवश्यक आहे. तसेच, त्यांनी संशोधन कोणत्या सामाजिक, सांस्कृतिक, आणि राजकीय परिस्थितीत केले होते, याचे भान ठेवणे ही गरजेचे असते. पूर्वसुरींच्या संशोधनातील मर्यादा, तसेच कधी कधी असू शकणारा पक्षपातीपणा ओळखल्यास आपल्याला त्यांच्या कार्याचे मूल्य ठरवता येते आणि पुढील अभ्यासासाठी योग्य दिशा मिळते.

इतिहासात काय घडले हे समजून घेताना, आपल्याला दोन प्रकारच्या गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. (१) उघड गोष्टी म्हणजे ज्या घटना सर्वांना माहीत आहेत, जसे की मोठी युद्धं, प्रसिद्ध लोकांची भाषणं किंवा महत्त्वाचे तह व करार. ह्या गोष्टी आपल्याला पुस्तकात वाचायला मिळतात किंवा त्याबद्दल सगळे बोलतात. (२) लपलेल्या गोष्टी: या गोष्टी सहसा लोकांसमोर येत नाहीत. जसे की, सूक्ष्म घटना, त्यावेळच्या सामान्य लोकांचे जीवन, त्यांच्या भावना, त्यांचे विचार, किंवा समाजात होत असलेले छोटे-मोठे बदल. ह्या गोष्टी आपल्याला लगेच दिसत नाहीत, पण त्या इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग असतात. आता या दोन्ही प्रकारच्या गोष्टींना एकत्र करून पाहिले, तर आपल्याला इतिहास अधिक चांगल्या प्रकारे समजतो. जेव्हा आपण उघड आणि लपलेल्या दोन्ही गोष्टींचा विचार करतो, तेव्हा आपल्याला इतिहासाचे एक मोठे आणि अधिक स्पष्ट चित्र दिसते. फक्त मोठ्या घटना पाहून चालत नाही, तर त्यावेळेस लोकांचे जीवन कसे होते, हे पाहणे पण महत्त्वाचे आहे. जेव्हा आपण लपलेल्या गोष्टींचा विचार करतो, तेव्हा आपल्याला कळते की, एक घटना दुसऱ्या गोष्टीशी कशी जोडलेली आहे. पूर्वी आपण फक्त मोठ्या घटनांनाच महत्त्व देत होतो. परंतु, आता जेव्हा आपण लपलेल्या गोष्टींचा अभ्यास करतो, तेव्हा आपल्याला त्या मोठ्या घटनांकडे बघण्याचा एक नवीन दृष्टिकोन मिळतो. त्यामुळे, इतिहास आपल्याला अधिक चांगल्या प्रकारे समजतो आणि आपण त्यातून नवीन गोष्टी मांडू शकतो

या ठिकाणी एक उदाहरण देऊन एक गोष्ट स्पष्ट करता येईल. कोल्हापूर संस्थानाचा इतिहास लिहिताना बी. पी. मोडक यांचे 'कोल्हापूर राज्याचा इतिहास' (१८९३) आणि स. मा. गर्गे यांचे 'करवीर रियासत' (१९६८) हे दोन ग्रंथ खूप महत्त्वाचे मानले जातात. म्हणजे, कोल्हापूरच्या इतिहासाचा अभ्यास करायचा असेल, तर या दोन पुस्तकांचा आधार घेतला जातो. हे दोन्ही ग्रंथ वाचताना लक्षात आले की, या दोन्ही ग्रंथात कोल्हापूरच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना लपलेली आहे. ती घटना म्हणजे, कोल्हापूरचे चिमासाहेब महाराज यांच्या तोतयांनी केलेला ब्रिटिश विरोधी उठाव. या दोन पुस्तकांपैकी 'कोल्हापूर राज्याचा इतिहास' या पुस्तकात या बंडाचा फक्त एक ओळीत उल्लेख होता. पण 'करवीर रियासत' या पुस्तकात तर या घटनेचा साधा उल्लेखही नाही. याचा अर्थ, ही घटना इतिहासात लपून राहिली होती, किंवा दुर्लक्षित झाली होती. ही लपलेली घटना अभ्यासल्यावर मी या घटनेवर आधारित तीन शोधनिबंध (research papers) लिहिले. या शोधनिबंधांमुळे त्या घटनेवर प्रकाश पडला.या उदाहरणातून हे स्पष्ट होते की, इतिहासामध्ये अनेक गोष्टी लपलेल्या असू शकतात. काहीवेळा महत्त्वाच्या घटनांचा उल्लेखही केला जात नाही. त्यामुळे, इतिहासाचा अभ्यास करताना, वेगवेगळया साधनांचा आणि ग्रंथांचा वापर करणे आवश्यक असते. आणि त्यातूनच नवीन गोष्टी समोर येऊ शकतात.

६

पूर्वसुरींनी केलेल्या संशोधनाचा मागोवा घेणे आणि त्यांच्याकडून दुर्लक्षित राहिलेले विषय, घटना आणि साधनांचा शोध घेणे म्हणजे केवळ त्यांच्या कामाची पुनरावृत्ती नसून, त्यांच्या कार्याचा केलेला विस्तार आणि सुधारणा होय. या टप्प्यामध्ये थोर इतिहासकारांनी संशोधन केलेले विषय आणि तुम्ही संशोधन करण्यासाठी निवडलेले विषय यांची तुलना करणे आवश्यक असते. ही तुलना केल्यावर आपल्याला त्यांच्या संशोधनातील मर्यादा आणि उणिवा लक्षात येतात. या मर्यादांवर मात करण्यासाठी आपण ऐतिहासिक पद्धतीमध्ये नवीन ऐतिहासिक साधने आणि नवीन अन्वयार्थ यांचा वापर करू शकतो. उदाहरणार्थ, एखाद्या मोठ्या इतिहासकाराने जर संशोधनासाठी फक्त सरकारी कागदपत्रांचा वापर केला असेल तर तुम्ही 'मौखिक इतिहास', खाजगी

पत्रव्यवहार इत्यादी सारखे इतर साधने वापरून वंचित लोकांच्या इतिहासाला आपल्या मांडणीत जागा देऊ शकता. यामुळे आपल्या संशोधनाला एक नवीन आयाम प्राप्त होतो आणि इतिहासाचे अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक चित्र आपल्यासमोर उभे राहते. समजा, एखाद्या इतिहासकाराने स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास करताना फक्त प्रमुख नेत्यांच्या कार्यावर लक्ष केंद्रित केले असेल, तर आपण सामान्य जनतेचा सहभाग, त्यांचे अनुभव आणि त्यांच्या दृष्टीकोनाचा शोध घेऊ शकतो. यासाठी आपण मौखिक इतिहास, लोकगीते, लोककथा, दैनंदिनी, पत्रव्यवहार इत्यादी सारख्या विविध साधनांचा वापर करू शकतो. थोडक्यात, पूर्वसुरींच्या संशोधनाचा आढावा घेऊन, त्यांच्याकडून प्रेरणा घेत, आणि त्यांच्या मर्यादा ओलांडून, आपण इतिहासाच्या नव्या पैलूंचा शोध घेऊ शकतो आणि आपल्या संशोधनाला एक वेगळे आणि महत्त्वाचे स्थान प्राप्त करून देऊ शकतो.

आता आपण एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे वळूया, तो म्हणजे तुम्ही संशोधन करत असलेल्या विषयाकडे थोर इतिहासकाराकडून का दुर्लक्ष झाले याचा शोध घेणे होय. हे शोधणे का गरजेचे आहे? कारण त्यातून आपल्याला त्यांच्या संशोधनातील मर्यादा आणि उणिवा समजतात. मान्यताप्राप्त इतिहासकारांनी काही चुकीची ऐतिहासिक पद्धत, साधने किंवा अन्वयार्थ लावला आहे का? त्यांच्या विश्लेषणात काही तर्कदोष आहेत का? त्यांनी वापरलेल्या साधनांवर विश्वास ठेवता येतो का? साधनांच्या निवडीमध्ये काही कमी राहिली आहे का? त्यांनी फक्त विशिष्ट प्रकारच्या साधनांवर अवलंबून राहून इतर महत्त्वाच्या पुराव्यांकडे दुर्लक्ष केले आहे का? कोणती तात्त्विक चौकट स्वीकारली आहे? त्यांच्या संशोधनावर विशिष्ट विचारसरणीचा प्रभाव दिसतो आहे का? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे. हे जर तुम्ही शोधून काढले तर तुम्हाला तुमच्या स्वतःचे वैचारिक योगदान स्पष्ट करता येते. तुम्ही हे दाखवून देऊ शकता की तुम्ही केलेल्या संशोधनामुळे इतिहासलेखनातील उणिवा कशा प्रकारे भरून निघाल्या आहेत आणि इतिहासाच्या एका नव्या पैलूवर कसा प्रकाश टाकला आहे. उदाहरणार्थ, जर एखाद्या इतिहासकाराने सामाजिक इतिहासाकडे दुर्लक्ष केले असेल, तर तुम्ही सामाजिक घटकांच्या अनुभवांवर प्रकाश टाकून इतिहासाची अधिक व्यापक मांडणी करू शकता.

थोडक्यात, पूर्वसुरींच्या संशोधनातील मर्यादा आणि उणिवा शोधून, आपण आपल्या संशोधनाची दिशा स्पष्ट करू शकतो आणि इतिहासाच्या पटलावर आपले स्वतःचे वैचारिक योगदान नोंदवू शकतो.

शेवटच्या टप्प्यात, तुमच्याकडून सखोल आणि मूलभूत संशोधनाची अपेक्षा असते. ऐतिहासिक ज्ञानात असलेल्या फटी किंवा मोकळ्या जागा, तसेच एखाद्या विशिष्ट विषयावर असलेली शांतता ओळखून, तुम्ही तुमच्या स्वतःच्या संशोधनासाठी तयार होता. या टप्प्याचा उद्देश म्हणजे तुमच्या संशोधनातून एक असा ऐतिहासिक अन्वयार्थ पुढे आणणे, जो अनेकदा पूर्वसुरींनी काढलेल्या निष्कर्षांना पुढे नेतो किंवा त्यांना अधिक स्पष्ट करतो. मात्र, काही वेळा तुमचे संशोधन त्यांच्या विचारांना आव्हान देणारे देखील होऊ शकते.

थोर व्यक्तींच्या खांद्यावर उभे राहिल्याने संशोधनाच्या दृष्टीतून आपोआपच चिकित्सक, साक्षर आणि सुशिक्षित विचारवंत निर्माण होतोच असे नाही. तथापि, ते आपल्याला सत्त्व प्राप्त करून देते. माझ्या संशोधनात अनेकवेळा असे झाले आहे की, मी सुरुवात तर करायचो, पण मध्येच काहीतरी गडबड व्हायची आणि मग मला नव्याने सुरुवात करावी लागायची. असे खूप वेळा झाल्यावर मला एक गोष्ट लक्षात आली. सुरुवातीला मला असे वाटायचे की, माझ्या संशोधनात काहीतरी 'प्रॉब्लेम' आहे, किंवा मी व्यवस्थित तयारी केलेली नाही आहे. पण नंतर मला समजले की, ह्या सगळ्या 'खोट्या सुरुवाती' आणि 'पुन्हा नव्याने सुरुवात' करणे, ह्या खऱ्या अर्थाने चांगल्या गोष्टी असतात.

आता मला असे वाटते की, संशोधनात 'खोट्या सुरुवाती' होणे, 'अडचणी' येणं किंवा 'गोंधळ' उडणे म्हणजे काहीतरी 'चूक' नव्हती, जी मी टाळायला पाहिजे होती. (अर्थात, कधी कधी त्या चुकाच होत्या!) पण बहुतेक वेळा ह्या गोष्टी 'संधी' होत्या. कारण, ह्यामुळेच मला नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या.

खरे सांगायचे तर, इतिहास संशोधन हा एक प्रवास आहे. मी व्यक्तीश: आत्तापर्यंत जेवढे म्हणून संशोधन प्रकल्प सुरू केले, ते पूर्ण झाल्यावर मी जसा विचार केला होता, त्यापेक्षा खूप वेगळेच निष्कर्ष निघाले. म्हणजे, संशोधनात आपण ठरवतो एक आणि होते भलतेच. परंतु, या प्रवासातच आपल्याला खूप काही शिकायला मिळते. ते शिकत जाणे हाच संशोधनाचा खरा प्रवास आहे.

७

पूर्वसुरींच्या संशोधनातून काही शिकायचे असल्यास त्यांच्या लिखाणाचा अभ्यास करणे अनिवार्य आहे. परंतु अलीकडच्या काळात विद्यार्थ्यांमध्ये विस्तृत व दीर्घ लिखाण वाचण्याची मानसिकता लोप पावत असल्याचे दिसून येते. काही दिवसांपूर्वी मी

राजर्षी शाहू महाराज यांच्यावर नामांकित अभ्यासकांनी लिहिलेल्या लेखांचा ग्रंथ संपादित केला. प्रकाशन सोहळ्यानंतर एका विद्यार्थ्याने माझ्याकडे येऊन माझी भेट घेतली. त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे दुःख आणि संकोच स्पष्ट दिसत होता. तो म्हणाला की, २२० पानांचे हे पुस्तक वाचणे त्याला अशक्य वाटते, कारण त्याने कधीच इतके लांबलचक काहीही वाचलेले नाही. त्याचे हे शब्द ऐकून मी चकित झालो, पण त्याच्या बोलण्यातील प्रामाणिकपणा आणि खंत पूर्णपणे जाणवत होती. यातून एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा समोर येतो. तो म्हणजे आजच्या काळातील विचलित करणाऱ्या वातावरणात, जिथे अगदी नावाजलेल्या विद्यापीठांतील पदवीधर विद्यार्थ्यांनासुद्धा पारंपरिक स्वरूपातील पुस्तके वाचणे अधिकाधिक कठीण होत चालले आहे.

दुसरीकडे सामाजिक शास्त्रांमधील अभ्यासक आपले संशोधन अवघड शब्दांमध्ये लिहीत आहेत. "शैक्षणिक लेखन अधिकाधिक क्लिष्ट होत चालले आहे, विशेषतः मानव्यविद्या आणि सामाजिक विज्ञान शाखेतील. 'द इकॉनॉमिस्ट'ने १८१२ ते २०२३ दरम्यान प्रकाशित झालेल्या ३,४७,००० पीएचडी प्रबंधांच्या सारांशांचे विश्लेषण केले आहे . ब्रिटिश लायब्ररीने तयार केलेला हा डेटासेट, ब्रिटनमधील विद्यापीठांनी दिलेले बहुतेक इंग्रजी भाषेतील डॉक्टरेट (पीएचडी) प्रबंध दर्शवतो. या विश्लेषणात 'फ्लेश रीडिंग-ईज टेस्ट' (Plesh Reading Ease Test) वापरली गेली, जी वाक्य आणि शब्दांची लांबी मोजून वाचनीयता तपासते. या चाचणीत १०० गुण म्हणजे साधारणपणे अमेरिकेतील चौथी इयत्तेतील (९-१० वर्षांच्या) मुलाला समजण्याजोगे लेखन, तर ३० पेक्षा कमी गुण म्हणजे वाचायला खूप कठीण. 'न्यूयॉर्क टाइम्स'मधील लेखाचा सरासरी गुण ५० आणि 'सीएनएन'मधील लेखाचा ७० असतो, तर या लेखाचा गुण ४१ आहे. या अभ्यासात असे दिसून आले की, गेल्या ८० वर्षांत सर्वच विषयातील पीएचडी प्रबंधांचे सारांश वाचणे अधिक कठीण झाले आहे. मानव्यविद्या आणि सामाजिक विज्ञान शाखेत तर मोठी घट झाली आहे. १९४० च्या दशकात सरासरी गुण ३७ होते, जे २०२० च्या दशकात १८ पर्यंत खाली आले आहेत. १९९० पासून, हे विषय नैसर्गिक विज्ञानापेक्षा अधिक वाचनीय होते, पण आता तेवढेच गुंतागुंतीचे झाले आहेत. या बदलामुळे सामान्य लोकांना असे वाटू शकते की काही अभ्यासक जटिल शब्दांचा वापर करून आपले अज्ञान लपवत आहेत. सोप्या आणि सुस्पष्ट भाषेचा वापर केल्यास शैक्षणिक लेखनाचा दर्जा नक्कीच सुधारेल, असा निष्कर्ष या अभ्यासकांनी काढला आहे.

विसाव्या शतकात इतिहासकारांमध्ये इतिहासलेखनाच्या हेतूबद्दल एकमत निर्माण झाले होते. इतिहास म्हणजे भूतकाळात खरोखर काय घडले ते शोधून काढणे होय. मनुष्याच्या कर्तृत्वाने घटना घडतात, ज्या विषयीची माहिती कागदपत्रात उपलब्ध होत असते. यामुळे कागदपत्रांच्या अभ्यासातून मनुष्याचे कर्तृत्व आणि त्यामागचे हेतू स्पष्ट होत असतात. गतकालीन घटनांबद्दल माहिती मिळवण्यासाठी कागदपत्रांची आवश्यकता असते. जास्तीत जास्त अस्सल कागदपत्रे संकलित करून घटनांचा सर्वकष आलेख तयार करून ऐतिहासिक ज्ञानात भर पडते, असा विश्वास इतिहासकारांमध्ये निर्माण झाला होता. थोडक्यात, अस्सल कागदपत्रे संकलित करणे आणि त्याचे वैज्ञानिक दृष्टीकोनातून विश्लेषण केल्याने भूतकाळाचे अचूक चित्र मांडता येईल, असे इतिहासकारांना वाटत होते. इतिहासकारांसमोर दोन प्रकारची आव्हाने होती. एक तर ऐतिहासिक महत्त्व असलेली जास्तीत जास्त कागदपत्रे गोळा करून जतन करणे आणि दुसरे म्हणजे कागदपत्रांचा अभ्यास करून आधीच्या इतिहासलेखनातील उणिवा दूर करून इतिहासाचे अचूक लिखाण करणे.

मात्र सध्याच्या परिस्थितीत इतिहासकारांवर आणखी एक जबाबदारी आली आहे. ती म्हणजे त्यांनी केलेले संशोधन लोकांपर्यंत पोहोचवण्याची. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे अलीकडेच झालेला 'व्हॉट्सॲप इतिहास' (Whatsapp history), 'यूट्यूब इतिहासकार' आणि 'रील इतिहासकारां'चा झालेला उदय होय. २०२४ सालच्या डिसेंबर महिन्यात विलियम डेलरिम्पल या पाश्चात्त्य इतिहासकाराच्या वक्तव्यामुळे या गोष्टीची चर्चा रंगली होती. डेलरिम्पल यांनी भारतीय इतिहासकारांवर 'व्हॉट्सॲप इतिहास' वाढण्यास जबाबदार असल्याचा आरोप केला होता. त्यांच्या म्हणण्यानुसार, भारतीय इतिहासकारांनी केवळ आपल्यातच चर्चा केली, त्यांनी सामान्य लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे 'व्हॉट्सॲप विद्यापीठा'सारख्या (Whatsapp University) माध्यमातून चुकीचा इतिहास पसरण्यास वाव मिळाला.

डेलरिम्पल यांचे हे विधान वादग्रस्त ठरले असले, तरी 'व्हॉट्सॲप इतिहास' मोठ्या प्रमाणात पसरत आहे, हे वास्तव आहे. भारतात इंटरनेट सहज उपलब्ध झाल्यामुळे, खोट्या ऐतिहासिक कथांचा प्रसार मोठ्या प्रमाणात होत आहे. 'व्हॉट्सॲप इतिहास' ही एक मोठी सामाजिक, राजकीय आणि तांत्रिक प्रक्रिया आहे. पूर्वीच्या काळात अशा खोट्या इतिहासाला जास्त वाव नव्हता, कारण त्यावेळेच्या राजकारणामध्ये संशोधन-आधारित ऐतिहासिक दृष्टिकोनाला महत्त्व दिले जात होते. मात्र आजची

परिस्थिती पूर्ण बदललेली आहे. संशोधनावर आधारित ऐतिहासिक ज्ञान लोकांपर्यंत जात नसल्यामुळे त्यांचे इतिहासाबद्दल गैरसमज होत आहे.

१ जुलै १९९१ रोजी स्थापन झालेल्या महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या अनेक सर्वसाधारण उद्दिष्टांपैकी दोन उद्दिष्टे मला या संदर्भात अतिशय महत्वाची वाटतात. पहिले म्हणजे "महाराष्ट्राच्या इतिहासाच्या शास्त्रशुद्ध संशोधनास व लेखनास सर्वतोपरी उत्तेजन देणे" आणि दुसरे म्हणजे "आवश्यक त्या माहितीच्या अभावी जर महाराष्ट्राचा वास्तवादी इतिहास विपर्यस्त झालेला असेल अगर होत असेल तर योग्य त्या माहितीची प्रसिद्धी करून रूढ झालेला गैरसमज दूर करणे". चुकीच्या माहितीचा प्रसार रोखण्यासाठी आणि महाराष्ट्राचा खरा इतिहास लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी शास्त्रशुद्ध संशोधन आणि लेखन गरजेचे आहे.

या दोन्ही उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी आपण लक्षात ठेवल्या पाहिजेत. त्या म्हणजे,

- पूर्वसुरींनी केलेल्या कार्याचा आदर करून, त्यांच्याकडून शिकून, पण त्यांच्या मांडणीचे चिकित्सक विश्लेषण करूनच पुढे जावे.
- नवीन साधनांचा वापर करून इतिहासाचे अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक चित्र मांडावे.
- संशोधनाचे निष्कर्ष अधिक सोप्या आणि सुस्पष्ट भाषेत लोकांपर्यंत पोहोचवावे जेणेकरून 'व्हॉट्सॲप इतिहास'ला आव्हान देता येईल.

महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या या दोन उद्दिष्टांची पूर्तता झाल्यास महाराष्ट्राचा इतिहास अधिक समृद्ध आणि वास्तववादी होईल आणि तो लोकांपर्यंत योग्य पद्धतीने पोहोचेल असा विश्वास वाटतो.

(पण आज मला महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान दिलात आणि माझे इतिहास लेखनाबद्दलचे चिंतन मांडण्याची संधी दिली, त्याबद्दल आपल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार!

**संदर्भ:**

(*आजच्या भाषणात मांडलेल्या अनेक मुद्द्यांवर मी शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागातील प्रमुख प्राध्यापक नंदकुमार मोरे व इतिहास विभागातील डॉ. दत्तात्रेय मचाले यांच्याशी सविस्तर चर्चा केली आणि त्यांच्या बहुमोल सूचनांनुसार ते मुद्दे अधिक स्पष्ट आणि परिपूर्ण केले. त्यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे)*

डॉ. जयसिंगराव पवार (संपा) ,शोध- निबंध संग्रह, अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, अधिवेशन तिसरे, कोल्हापूर, १९९४, प्रकाशक- डॉ. तु. वि. गोडाम , सरचिटणीस युगांतर शिक्षण संस्था, नागपूर

भास्कर धाटावकर , अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद: स्थापनेपासूनची वाटचाल, डॉ. जयसिंगराव पवार आणि श्री. भास्कर धाटावकर, निबंध-संग्रह, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर

अवनीश पाटील, ख्रिस्तोफर बेली (१९४५-२०१५), *समाज प्रबोधन पत्रिका*, खंड २११, २०१५, पृ. ३९-४५; "कॉमर्स, कॉन्क्वेस्ट अँड कॉलनी: डॉ. बाळकृष्ण ऑन ब्रिटिश मर्कंटाइल इंपीरियलिझम." *इतिहास संशोधन पत्रिका*, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद, २०१५; डॉ. बी. सुरेंद्र राव: इतिहासकार, अनुवादक आणि संगीतप्रेमी, *समाज प्रबोधन पत्रिका,* खंड ५९, अंक २३६, ऑक्टोबर-डिसेंबर २०२१, पृ. ५७-६६; एरिक हॉब्जबॉम आणि जगाच्या इतिहासाचा अन्वयार्थ, *समाज प्रबोधन पत्रिका*, २०१४, पृ. ४७-५५; कोसंबी ऑन इंडियन फ्युडलिझम, अशोक चौसाळकर (संपादित), *स्टडीज इन डी. डी. कोसंबी ऑन स्टेट अँड फ्युडलिझम*, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००९; "महाराष्ट्र: सुधारणा व पुनरुज्जीवन." *समाज प्रबोधन पत्रिका*, खंड ५५, अंक २१९, २०१७, पृ. २५-३६; "प्रस्तावना." *वेध इतिहासाचा: डॉ. जयसिंगराव पवार यांच्या निवडक प्रस्तावनांचा संग्रह* , महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, २०१७; "रणजित गुहा: भारतीय इतिहासलेखनाला कलाटणी देणारे अभ्यासक." *समाज प्रबोधन पत्रिका*, एप्रिल-जून २०२३, पृ. ३-२०; "राष्ट्र कल्पनेचे अभ्यासक: बेनिडिक्ट अँडरसन." *समाज प्रबोधन पत्रिका*, खंड २१५, २०१६, पृ. ११-२२.

Avanish Patil, "Revolt of a Different Kind: Princely Pretenders in the State of Kolhapur", *Proceedings of the Indian History Congress*, 64th Session, 2004, pp. 925-933; "Kolhapuratil Totaya Prakaran ani Deshi Vruttapatre, Shodh Nibandh Sangrah," Akhil Maharashtra Itihas Parishad, 2012, pp. 334-343; "Local Event, Global Coverage: The Case of the Kolhapur Conspiracy (1880-81)", paper presented at the Indian History Congress, 82nd Session, Kakatiya University, Warangal, 28-30 Dec. 2023. Section III- Modern India.

G.J. Renier, *History: Its Purpose and Method*, Mercer University Press, London, 1950

Arthur Marwick, *The New Nature of History: Knowledge, Evidence, Language*, Palgrave, 2001

Academic Writing, *The Economist*, 21st December 2024, p. 62

B. Surendra Rao, *Ways and Byways of History: Musings on History and Historical Writings*, Prasaranga, Mangalore University, 2015.

ISSN NO-2347-7075

**अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद**
**(पुरस्कार यादी)**

| वर्ष | पुरस्कार | मान्यवर |
|---|---|---|
| २०१३ | १. पं. सेतु माधवराव पगडी पुरस्कार<br>२. इतिहासभुषण वा. सी. बेंद्रे पुरस्कार | १. रा. चि. ढेरे<br>१ . कॉ. शरद पाटील (धुळे) |
| २०१४ | १. पं. सेतु माधवराव पगडी पुरस्कार<br>२. इतिहासभुषण वा. सी. बेंद्रे पुरस्कार | १. द. ता. भोसले (पंढरपूर)<br>१. . जो. ब. देगलूरकर |
| २०१५ | १. पं. सेतु माधवराव पगडी पुरस्कार<br>२. इतिहासभुषण वा. सी. बेंद्रे पुरस्कार | १. डॉ. दाऊद दळवी<br>१.कृ. ना. चिटणीस |
| २०१६ | १. पं. सेतु माधवराव पगडी पुरस्कार<br>२. इतिहासभुषण वा. सी. बेंद्रे पुरस्कार<br>३. इतिहास संशोधक कै. आप्पासाहेब पवार पुरस्कार | १. जी. टी. कुलकर्णी<br>१. सदानंद मोरे<br>१. डॉ. जनार्दन वाघमारे |
| २०१७ | १. पं. सेतु माधवराव पगडी पुरस्कार<br>२. इतिहासभुषण वा. सी. बेंद्रे पुरस्कार<br>३. इतिहास संशोधक कै. आप्पासाहेब पवार पुरस्कार | १. डॉ. अरूण टिकेकर (मरणो.)<br>१. आ. ह. साळुंखे<br>१. डॉ. शिवाजीराव कदम |
| २०१८ | १. पं. सेतु माधवराव पगडी पुरस्कार<br>२. इतिहासभुषण वा. सी. बेंद्रे पुरस्कार<br>३. इतिहास संशोधक कै. आप्पासाहेब पवार पुरस्कार | १. डॉ. अशोक कामत<br>१. डॉ. आर. एस. मोरवंचीकर<br>१. डॉ. सर्जेराव निमसे |
| २०१९ | १. पं. सेतु माधवराव पगडी पुरस्कार<br>२. इतिहासभुषण वा. सी. बेंद्रे पुरस्कार<br>३. इतिहास संशोधक कै. आप्पासाहेब पवार पुरस्कार | १. सु. ग. जोशी<br>१. डॉ. अ.प्र. जामखेडकर<br>१. डॉ. विवेक सावंत |
| सन २०२० आणि सन २०२१ हा कोरोनाचा काळ | | |
| २०२२ | १. पं. सेतु माधवराव पगडी पुरस्कार<br>२. इतिहासभुषण वा. सी. बेंद्रे पुरस्कार<br>३. इतिहास संशोधक कै. आप्पासाहेब पवार पुरस्कार | १. डॉ. राजा दीक्षित (पुणे)<br>१. गोपाळराव देशमुख<br>१. गोपाळराव पाटील (लातूर) |
| २०२४ | १. पं. सेतु माधवराव पगडी पुरस्कार<br>२. इतिहासभुषण वा. सी. बेंद्रे पुरस्कार<br>३. इतिहास संशोधक कै. आप्पासाहेब पवार पुरस्कार | १.अलिम वकील<br>१.मारूतीराव जाधव<br>१. डॉ. माणिकराव साळुंजे |
| २०२५ | १. पं. सेतु माधवराव पगडी पुरस्कार<br>२. इतिहासभुषण वा. सी. बेंद्रे पुरस्कार<br>३. इतिहास संशोधक कै. आप्पासाहेब पवार पुरस्कार | १. प्रा. रंगनाथ तिवारी<br>१. प्राचार्य वेदकुमार वेदलांकर<br>१. प्राचार्य डॉ. मोहन राजमाने |

**अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद अधिवेशन: अध्यक्ष, सत्र ध्यक्ष- एक दृष्टिक्षेप**

| अ. क्र. | दिनांक व वर्ष स्थळ | स्थळ | मुख्य :अध्यक्ष | अध्यक्ष : प्राचीन | अध्यक्ष :मध्ययुगीन | अध्यक्ष: आधुनिक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५ व १६ फेब्रुवारी १९९२ | मोरेना | श्री. स. मा. गर्गे | डॉ. रा. श्री. मोरवंचीकर | डॉ. प्र. न. देशपांडे | डॉ. जे. वी. नाईक |
| २ | १३ व १४ फेब्रुवारी १९९३ | अलिबाग | डॉ. एस. डी. कर्णिक | डॉ. गो.बं. देगूलकर | डॉ. प्रकाशचंद्र शिरोडकर | डॉ. अरविंद देशपांडे |
| ३ | २२ व २३ ऑक्टोबर १९९४ | कोल्हापुर | डॉ. स. मा. गर्गे | डॉ. ब्रम्हानंद देशपांडे | डॉ. व्ही. एस. कदम | डॉ. कृ. अ. शेटे |
| ४ | ४ व ५ नोव्हेंबर १९९५ | नागपुर | डॉ. सुमन वैद्य | डॉ. हरिहर ठोसर | प्रा. पी. एन. देशमुख | डॉ. मनिषा टिकेकर |
| ५ | १६ व १७ नोव्हेंबर १९९६ | सगरोळी | डॉ. जयसिंगराव पवार | डॉ. प्रभाकर देव | प्रा. गजानन मिडे | डॉ. अरूण भोसले |
| ६ | ३ व ४ डिसेंबर१९९८ | उदगीर | डॉ. गो.बं. देगूलकर | डॉ. वसंत शिंदे | डॉ. एस. पी. पाटील. | डॉ. श्यात कायंदे |
| ७ | १९ व २० डिसेंबर १९९८ | अमरावती | डॉ. अ. रा. कुलकर्णी | डॉ. व्ही. एच. सोनवणे | डॉ. एन. जी. भवरे | डॉ. टी. व्ही. गेडाम |
| ८ | २५ व २६ मार्च २००० | यवतमाळ | डॉ. पी. एन. देशपांडे | डॉ. रा. श्री मोरवंचीकर | डॉ. राम इंगळे | डॉ. एस.एस.सरदेसाई |
| ९ | ९ व १० डिसेंबर २००१ | पैठण | डॉ. ए.पी. जामखेडकर | डॉ. अरुणचंद्र पाठक | डॉ. जी.एम. पुरंदरे | डॉ. बी. एस. ढेंगळे |
| १० | २४ व २५ डिसेंबर २००२ | तेर | डॉ. रा. श्री. मोरवंचीकर | डॉ. प्रभाकर देव | डॉ. बी. डी. कुलकर्णी | डॉ. बी. एन. सरदेसाई |
| ११ | १८ व १९ जानेवारी २००३ | चांदवड | प्रा. पी. एन. देशमुख | डॉ. पी.आर. अहिरराव | डॉ. निनाद बेडेकर | डॉ. विद्या गाडगीळ |
| १२ | १७ व १८ जानेवारी २००४ | सातारा | डॉ. मधुकर ढवळीकर | डॉ. शोभना गोखले | डॉ. रविंद्र रामदास | डॉ. वर्षा शिरगावकर |
| १३ | २८ व २९ जानेवारी २००५ | अंबरनाथ | डॉ. अरुण टिकेकर | डॉ. शरद राजगुरू | डॉ. गोवले त्र्यंबक | डॉ. वर्षा शिरगावकर |
| १४ | २० व २१ जानेवारी २००६ | भुसावळ | डॉ. बी. डी. कुलकर्णी | डॉ. आनंद कुंमार | डॉ. उमेश बगाडे | डॉ. नंदकुमार निकम |
| १५ | ११ व १२ डिसेंबर २००६ | बारामती | डॉ. जे. व्ही. नाईक | डॉ. गो. तु. शेंडे | डॉ. एम. बी. देशमुख | डॉ. राजा दिक्षीत |
| १६ | १४ व १५ डिसेंबर २००७ | चिंचणी | डॉ. प्रसन्ना मुजुमदार | डॉ. ओमप्रकाश चव्हाण | डॉ. उमेश कदम | डॉ. टी. एस. पाटील |
| १७ | २९ व ३० डिसेंबर २००८ | बारामती | डॉ. म.का. माने | डॉ. चंद्रशेखर गुप्ता | डॉ. ओमप्रकाश समदाणी | डॉ. रेखा रानडे |
| १८ | १८ व १९ डिसेंबर २००९ | श्रीगोंदा | डॉ. जयसिंगराव पवार' | डॉ. म.मा. परसावळे | डॉ. चंद्रकांत अभंग | डॉ. आर.पी. भामरे " |
| १९ | २४ व २५ डिसेंबर २००८ | सोलापुर | डॉ. आ. ह. साळुंखे | डॉ. किशोर गायकवाड | डॉ. दिपा साबळे | डॉ. दिपक गायकवाड |
| २० | १२ व १३ नोव्हेंबर २०११ | वारणानगर | डॉ. सोमनाथ रोडे | डॉ. सुलभा मुरलीधर | डॉ. एम. ए. लोहार | डॉ. भाऊसाहेब शिंदे |
| २१ | २१ व २३ डिसेंबर २०१२ | भुसावळ | डॉ. शहर होबाळकर | डॉ. बी. रा परांजपे | डॉ. रमझान शेख | डॉ. निता खांडपेकर |
| २२ | २९ व ३० नोव्हेंबर २०१३ | नांदेड | डॉ. द. ता. भोसले | डॉ. प्रमोद जोगळेकर | डॉ. सोपान जावळे | डॉ. संगिता मेश्राम |
| २३ | २ व ३ नोव्हेंबर २०१४ | इंदापुर | डॉ. सर्जेराव भामरे | डॉ. श्रीपाद भट | डॉ. वसंतराव मोरे | डॉ. बी. एन. पाटील |
| २४ | २७ व २८ नोव्हेंबर २०१५ | भाईंदर | डॉ. वसंत शिंदे | डॉ. रविंद्र लाड | डॉ. भारती नवथर | डॉ. अविनाश पाटील |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २५ | २६ व २७ डिसेंबर २०१६ | पाथर्डी | डॉ. सदाशिव शिवदे | प्राचार्य अशोक आहेर | डॉ. भावे | डॉ. अरुणा मोरे |
| २६ | १७ व १८ नोव्हेंबर २०१७ | शिरूर | डॉ. जयसिंगराव पवार | डॉ. सुरज पंडीत | डॉ. शाम कोरेटी | डॉ. विलास पवार |
| २७ | ३० नोव्हें व १ डिसें २०१८ | कडा | डॉ. प्रभाकर देव | डॉ. मंजिरी भालेराव | डॉ. सोमनाथ रोडे | डॉ. एस. के. बागुल |
| २८ | २९ व ३० नोव्हेंबर २०१९ | कोल्हापुर | डॉ. सदानंद मोरे | डॉ. श्रीकांत गणवीर | डॉ. अब्दुलगी इमारतवाले | डॉ. विजय कुलकर्णी |
| २९ | २७ व २८ फेब्रुवारी २०२१ | कन्नड | डॉ. अनुराधा कुलकर्णी | डॉ. व्यंकटेश लांब | डॉ. किशन अंबाडे | डॉ. जी. बी. शेख |
| ३० | ९ व १० डिसेंबर २०२२ | लातुर | डॉ. राजा  दिक्षीत | डॉ. अनुराग वैदय | डॉ. अनुराधा कुलकर्णी पुणे | प्रा. डॉ. जी. बी. शहा |
| ३१ | १९ व  २० जानेवारी २०२४ | नेवासा | प्रा. सतीश कदम | डॉ. अरविन्द सोंनटक्के | डॉ. गणी पाटील | डॉ.जास्वंदी वामबुरकर |
| ३२ | १७ व १८ जानेवारी २०२५ | केडगाव,पुणे. | डॉ. अविनाश पाटील | डॉ. पद्माकर प्रभुणे शिरूर | डॉ. लहू गायकवाड | डॉ. मंजुश्री पवार |

## आधुनिक महाराष्ट्र: बहुजनकेंद्री इतिहासाची गरज

(दि. १९ व २० जानेवारी २०२४ या काळातील त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नेवासा, जि. अहमदनगर येथील अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या, ३१ व्या अधिवेशनातील आधुनिक सत्राचे अध्यक्षीय भाषण )

**प्रा. डॉ. जास्वंदी वांबूरकर**

इतिहास विभागप्रमुख आणि प्राध्यापक.

श्री. ना. दा. ठाकरसी महिला वियापीठ. न्यू मरीन लाईन्स. मुंबई-४०००२०.

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या ३१ व्या अधिवेशनात आधुनिक विभागाची सत्राध्यक्ष या नात्याने मला निमंत्रित केले आणि माझे विचार मांडण्याची संधी दिली, याबद्दल मी परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मन:पूर्वक आभार मानते.

प्रादेशिक इतिहासलेखन हा भारतामध्ये विकसित झालेला इतिहासलेखन-प्रवाह आहे. भारतासारख्या भौगोलिकदृष्ट्या विशाल देशात अनेक प्रदेशांत युगानुयुगे लोक आपापल्या भौगोलिक, सांस्कृतिक, मानसिक पृथगात्मतेसह नांदताना दिसतात. या प्रत्येक प्रदेशाला आपली उप-संस्कृती आहे, ऐतिहासिक वारसा आहे. संपूर्ण देशाचा इतिहास लिहिताना या प्रादेशिक इतिहासाचे विविध पैलू दुर्लक्षिले जाऊ शकतात. प्रादेशिक इतिहासलेखन हा त्या प्रदेशाच्या सखोल व सर्वांगीण अभ्यासाचा प्रयत्न असतो. स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या भाषावार प्रांतरचनेनंतर प्रादेशिक इतिहासलेखनाला चालना मिळाली असली तरी वासाहतिक काळापासूनच प्रादेशिक इतिहासलेखनाचे आविष्कार घडत होते, असे दिसते.

आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण आणि गेल्या जवळपास सव्वा दोनशे वर्षांच्या इतिहासातील ठळक टप्पे आणि त्याविषयीचे इतिहासलेखन याची मांडणी मी माझ्या भाषणात करणार आहे.

भारतीय इतिहासाच्या संदर्भात सर्वसाधारणपणे १८ व्या शतकाचा उत्तरार्ध आणि महाराष्ट्राच्या संदर्भात १९ वे शतक हा आधुनिक काळाचा शुभारंभ होता. मात्र भारतात/महाराष्ट्रात सुरू झालेले आधुनिकतेचे पर्व हे पाश्चात्त्य जगताच्या इतिहासापेक्षा वेगळे होते. इथे प्रबोधन, धर्मसुधारणा चळवळी, आधुनिकतेचे युग आणि भांडवली व्यवस्थेकडील वाटचाल, अशा सर्व गोष्टी एकाच वेळी आणि एका परकीय सत्तेच्या छायेखाली अवतरल्या. सरंजामशाहीकडून आधुनिकतेकडे आणि भांडवली-व्यवस्थेकडे झालेले स्थित्यंतर भारतात जवळपास सर्वच प्रदेशांमध्ये झाले. काही बाबतीतील साम्य-स्थळे सोडली तर प्रदेशागणिक त्यामध्ये वैविध्य होते. इतिहासाच्या पटलावर जे बदल होतात, ते कधीच जुने पूर्णपणे पुसून टाकून कोऱ्या पाटीवर केलेले रेखाटन नसते. सातत्य आणि बदलातून हे नवे वास्तव साकारते. भारतातील आधुनिकता ही भारतीय आणि पाश्चात्त्य आणि विविध भागातील प्रादेशिक संस्कृती-उपसंस्कृती, परंपरा, भौगीलिक व भौतिक वास्तव यांच्या मिलाफातून साकारली. त्या दृष्टीने प्रत्येक प्रदेशाचा आणि म्हणून महाराष्ट्राचा आधुनिक काळाचा इतिहास अभ्यास हा वैशिष्ट्यपूर्ण आणि महत्त्वपूर्ण आहे.

ब्रिटिश अमलामुळे आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली असली तरी ब्रिटिश अंमल हाच केवळ या बदलाला कारणीभूत झाला नाही; या बदलाची, या सुधारणावादाची बीजे ब्रिटिशपूर्वकाळात रुजलेली होती. एतद्देशीय ऐतिहासिक परंपरेतील मूलस्रोतही या बदलाला कारणीभूत ठरले, अशी मांडणी डॉ. अरविंद देशपांडे आणि डॉ. राजा दीक्षित यांनी केली आहे. एतद्देशीय मूलस्रोतांच्या संदर्भात डॉ. देशपांडे यांनी मध्ययुगीन भक्ती चळवळ, छत्रपती शिवाजी महाराजांचे नेतृत्व आणि पेशव्यांच्या विस्तारवादामुळे झालेले आर्थिक व सामाजिक बदल या तीन घटकांची मीमांसा केली आहे. या अन्वयार्थाला पूरक अशा पुराव्यांची मांडणी इतरही संशोधक करत आहेत. या काळात महाराष्ट्रात उदयाला आलेली धर्मसुधारणा आणि स्त्री-सुधारणा चळवळ ही भारतातील इतर प्रांतातील चळवळीपेक्षा अधिक व्यापक, जोमदार व अर्थपूर्ण का होती, याचा उलगडाही या मांडणीतून होऊ शकतो.

प्रबोधनाचा आणि आधुनिकतेचा आविष्कार महाराष्ट्रात समाजकारण, कला, संगीत, रंगभूमी, मुद्रण, वृत्तपत्र-व्यवसाय, साहित्य, अर्थकारण, इतिहास-लेखन, दृश्यकला, चित्रपट अशा सर्वच क्षेत्रात दिसून आला. नव्याने उदयाला आलेल्या नगरांमधून ट्राम, बस, रेल्वे अशी नवी दळणवळणाची साधने आणि टपाल, दूरध्वनी, वृत्तपत्रे, मासिके अशी संज्ञापनाची साधने सामाजिक आणि आर्थिक जीवनात प्रभाव गाजवू लागली. अल्पकाळातच राष्ट्रवाद, समाजसुधारणा, आधुनिकतेचा विचार समाजात पसरवण्यासाठी ही महत्त्वाची माध्यमे ठरू लागली. यावर चांगले इतिहास लेखन मागील काही दशकांत झाले आहे. महाराष्ट्रातील सामाजिक जीवनात आमूलाग्र बदल घडवण्यात आणि येथे आधुनिक वळणाचा समाज घडवण्यात येथील सामाजिक चळवळींनी मोलाची भूमिका बजावली आहे.

**समतेचा लढा**

स्वातंत्र्य, समता, बुद्धीप्रामाण्यवाद, विज्ञाननिष्ठा, इहवाद, व्यक्तिवाद यांसारख्या आधुनिक तत्त्वांशी परिचय झालेल्या मध्यमवर्गाने १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात धर्मसुधारणा, समाजसुधारणा, स्त्री-प्रश्न; जाती व अस्पृश्यता निर्मूलन यांच्या चळवळी सुरू केल्या. या चळवळी म्हणजे सामाजिक संस्था व सामाजिक संबंधांच्या लोकशाहीकरणाचा प्रारंभ होता. या सर्व चळवळींची सांगोपांग चर्चा येथे केलेली नाही आणि तसे करणे शक्यही नाही. मानवमुक्तीच्या लढ्यातील त्यांचे योगदान आणि त्याचे महत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे.

परमहंस सभा, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, आर्य समाज आणि निराश्रित साह्यकारी मंडळी इ. अनेक संस्थांनी महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तन घडवण्यात मोलाचे योगदान दिले. नवशिक्षित समाजात भारतीय समाजव्यवस्थेतील दोषांविषयी आत्मपरीक्षणाची प्रक्रिया सुरू झाली. बाबा पदमनजी, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडित, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, रा गो. भांडारकर, ताराबाई शिंदे, महादेव गोविंद रानडे, का. त्र्यं. तेलंग, गोपाळ गणेश आगरकर, पंडिता रमाबाई, हरिभाऊ आपटे, महर्षी धोंडो केशव कर्वे, काशीबाई कानिटकर, रमाबाई रानडे अशा आधुनिक विचारांच्या समाजसुधारकांची एक परंपराच महाराष्ट्रात निर्माण झाली. आपल्या समाजातील दोष काढून टाकण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब सुधारकांनी केला. लोकमत सुधारणेला अनुकूल करण्यासाठी वृत्तपत्रे व मासिके या माध्यमांतून जात, धर्म, रूढी तसेच स्त्रीविषयक प्रश्नांवर त्यांनी चर्चा घडवून आणल्या. अंधपणे व निमूटपणे रूढी-प्रथा पाळण्याची ज्या समाजात वहिवाट होती, त्या समाजाला या माध्यमांतून तसेच जाहीर सभांमधून आपला धर्म, आपल्या रूढी, स्त्री-प्रश्न यांविषयी विचार करण्यास त्यांनी प्रवृत्त केले.

**स्त्री-सुधारणा चळवळ**

महाराष्ट्रात सामाजिक क्षेत्रात सुरू झालेल्या, जातिअंताची व अस्पृश्यता–निर्मूलनाची अशा दोन चळवळी वगळता बहुसंख्य चळवळी स्त्री-समस्यांशी निगडीत होत्या. भ्रूणहत्या, बालविवाह, बालसंभोग, स्त्रीशिक्षणबंदी, जरठकुमारीविवाह, हुंडापद्धती, देवदासी, विधवाविवाहबंदी, केशवपन, सती यांसारख्या स्त्री-समस्यांभोवती त्या केंद्रित झाल्या होत्या. आज या समस्यांपैकी काही समस्यांची तीव्रता कमी झाली आहे. स्त्री-शिक्षणाचा प्रसार झाला आहे. मात्र बालविवाह आजही मोठ्या प्रमाणावर होतात. सर्वच जातींमध्ये विधवाविवाह अजूनही होत नाहीत. हुंडापद्धतीने तर अधिक उग्र स्वरूप धारणा केलेले दिसते. तेव्हा या चळवळींची आजच्या काळातील प्रस्तुतता लक्षात घेतली पाहिजे. सुधारकांनी फक्त समस्या निवारणासाठी प्रयत्न केले नाहीत; तर स्त्रीविषयक संकुचित मानसिकता बदलण्याचा सुधारकांनी अथकपणे प्रयत्न केला. स्त्रियांना महत्त्वाचे कायदेशीर हक्क मिळवून दिले. स्त्री ही पुरुषाप्रमाणेच माणूस असून स्त्री व पुरुष हे समान आहेत. स्वभाव, बुद्धी, ज्ञान, विचार यांबाबतीत पुरुष व स्त्री यांत परमेश्वराने वा निसर्गाने भेद केलेला नाही. स्त्रीलाही स्वातंत्र्याचा अधिकार आहे, तिलाही मनुष्यसुलभ भावभावना असतात, तिलाही आपले आयुष्य घडविण्याचा अधिकार आहे, असे विचार त्यांनी वारंवार मांडले.

पुरूष-सुधारकांप्रमाणे स्त्रियांनी या चळवळीला महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. आत्मभान जागे झालेल्या स्त्री-वर्गातून नेतृत्व उदयाला आले आणि स्त्री-सुधारणा चळवळीची सूत्रे स्त्रियांनी स्वतःच्या हातात घेतली. सावित्रीबाई फुले (१८३१-१८९७), ताराबाई शिंदे (१८४०-१९१०), पंडिता रमाबाई (१८५८-१९२२), काशीबाई कानिटकर (१८६१-१९४८), रमाबाई रानडे (१८६२-१९२४), रखमाबाई (१८६४-१९५५), आनंदीबाई जोशी (१८६५-१८८७), लक्ष्मीबाई टिळक (१८६८-१९३६), जनाक्का शिंदे (१८६८-१९५६), पार्वतीबाई आठवले (१८७०-१९५५) या व अशा कितीतरी स्त्रियांची कामगिरी विलक्षण आहे.

गेल्या काही दशकांमध्ये यावर मोठे संशोधनही झाले आहे. महाराष्ट्रातील स्त्रियांच्या इतिहासाची व लिंगभाव इतिहासाची मांडणी करणारे मीरा कोसंबी, तारा भवाळकर, मंदा खांडगे, मालविका कार्लेकर, विद्युत भागवत, शर्मिला रेगे, विनया खडपेकर, तनिका सरकार, जुडीथ वॉल्श, उर्मिला पवार, स्वाती कर्वे, मृणालिनी जोगळेकर, अरूणा ढेरे, सुनिता सावरकर यांचे संशोधनपर लेखन अभ्यासकांनी जरूर पाहावे.

**जातीअंताची चळवळ**

महात्मा फुले, सावित्रीबाई, छत्रपती शाहू महाराज, गोपालबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, विठ्ठल रामजी शिंदे ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी जाती-अंताच्या चळवळीतीतील नेत्यांची एक सशक्त फळी महाराष्ट्रात उभी राहिली. कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, भास्करराव जाधव, केशवराव जेधे, दिनकरराव पाटील, तानुबाई बीर्जे आणि इतर अनेकांनी या चळवळीत भरीव योगदान दिले. जातीव्यवस्थेकडे भारतीय समाजव्यवस्थेतील एक रूढी अशा धारणेतून ब्राह्मणी सुधारक बघत होते. मात्र जातिव्यवस्था हा भारतीय समाज व्यवस्थेचा व समाजधारणेचा पाया आहे आणि त्याचे समूळ उच्चाटन केल्याखेरीज समताधिष्ठीत समाजाची निर्मिती करत येणार नाही, अशी फुले, शाहू महाराज व आंबेडकरांची श्रद्धा होती.

समाजसुधारणेच्या संदर्भात जातिनिर्मूलन आणि स्त्रीप्रश्न या दोन्ही चळवळींना महात्मा फुलेंनी अग्रक्रम दिला. सत्यशोधक समाज ही जातीअंताची, स्त्रीमुक्तीची आणि बहुजनांची चळवळ होती. धर्मातील मध्यस्थशाही आणि त्याद्वारे होणारे शोषण यावर जोतीरावांनी कडाडून टीका केली. महात्मा फुलेंना जातिव्यवस्थेच्या सर्वच पैलूंचे भान होते. आणि म्हणूनच आपल्या साहित्यातून त्यांनी धर्मकल्पना, मिथककथा यांवर जोरदार प्रहार केले आणि त्यातील फोलपणा गरीब, कष्टकरी, धर्मभोळया बहुजनांच्या/स्त्री-शूद्रातिशूद्रांच्या लक्षात आणून दिला. यातूनच भारतीय इतिहास हा वर्ण-संघर्षाचा इतिहास आहे, अशी सूत्रमय मांडणी त्यांनी केली. अभिजन भारतीय परंपरेतची चिकित्सा त्यांनी केली आणि पर्यायी संस्कृतीचा पुरस्कार केला. त्यांनी प्रतिपादलेली अब्राह्मणी परंपरा ही मानवतावादी, समतावादी व इहवादी परंपरा होती. 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकातून त्यांनी मानवता, सत्य, नीती, सदाचरण, परस्पर-सहकार्य, बंधुता, स्त्री-पुरुष समता या मूल्यांवर आधारित मानवी-जगताची मांडणी केली. त्यादुष्टीने फुले हे एक युगप्रवर्तक असे भारतीय विचारवंत होते.

वैचारिक लेखन, राजकारणी, समाजसुधारक, इतिहासतज्ज्ञ कायदेतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ अशा विविध भूमिकांतून आंबेडकरांनी जाती-अंताची चळवळ विकसित केली. अस्पृश्य व श्रमजीवींना अधिकाधिक राजकीय हक्क मिळवून देणे या हेतूने त्यांनी १९३६ साली स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. १९४२ मध्ये त्यांनी शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या नव्या पक्षाची स्थपना केली. यामुळे सात कोटी अस्पृश्यांना वेगळे स्वतंत्र अस्तित्व मिळाले आणि दलितांची एक नवी राजकीय ताकद उभी राहिली.

**इतिहासाची मांडणी**

महाराष्ट्रातील नेत्यांविषयी जी अनेक चरित्रे उपलब्ध आहेत, त्यांत विशेषतः फुले-रानडे, रानडे-टिळक, भांडारकर-टिळक, टिळक-आगरकर किंवा टिळक-गोखले, गांधी-आंबडेकर यांविषयी मांडणी करताना त्यांच्यातील मतभेद व संघर्ष अधिक गडदपणे अधोरेखित केले गेले. समाजसुधारणा, राजकारण यांविषयी त्यांचे अग्रक्रम, आकलन, भूमिका यांमध्ये पुष्कळदा तफावत होती. मात्र हे सर्व सुधारक वा नेते एकांडे शिलेदार नव्हते. समाजसुधारणा वा राजकीय सुधारणा 'एकमेकां साह्य करू' अशा भूमिकेतून ते चालवत होते, हे वास्तव आता काही संशोधक मांडू लागले आहेत. हल्ली जातीय विद्वेषातून आणि अस्मितेच्या राजकारणाचा परिपाक म्हणून नेत्यांची जातनिहाय विभागणी होते आणि त्यामुळे पुष्कळदा अनेक नेत्यांविषयी द्विध्रुवीय मांडणी केली जाते; पुष्कळदा ती अतिरंजित असते; अनैतिहासिक असते.

इतिहास म्हणजे केवळ घटनावर्णन नसून ती वर्तमानाच्या परिप्रेक्ष्यात केलेली भूतकाळाची पुनर्मांडणी असते. स्वातंत्र्योत्तर काळात या नेत्यांचा आणि चळवळींचा अभ्यास करताना त्यांच्यात स्थलकालसापेक्ष जे संदर्भ होते आणि मतभेदाचे जे मुद्दे होते, ते आता अप्रस्तुत झाले आहेत. त्यांची वस्तुनिष्ठ मांडणी आपण जरूर करावी. मात्र त्याच्या अतिरंजित कथा आजच्या विद्वेषी राजकारणाचे हत्यार म्हणून वापरणे योग्य नाही. दुर्दैवाने इतिहासाचा वर्तमानातील राजकारणासाठी असा वापर सातत्याने होताना दिसतो. पुरोगामी चळवळींच्या दृष्टीने तर ते घातक आहेच; पण इतिहासाचा विपर्यास होतो, याही दृष्टीने ते अनिष्ट आहे. राष्ट्राच्या प्रगतीसाठी आणि सामाजिक ऐक्यासाठी हे नेते आणि चळवळी त्यांच्यातील परस्पर समविचार आणि सहकार्य यांचे दर्शन घेणे गरजेचे आहे. ही अभ्यासाची एक नवी विधायक दृष्टी आपण अंगिकारली पाहिजे.

**स्वातंत्र्यलढा आणि महाराष्ट्र**

स्वातंत्र्य चळवळीतही महाराष्ट्राचे खूप महत्त्वाचे योगदान आहे. गेल्या काही वर्षांत तर स्वातंत्र्य चळवळ कोकण, खानदेश, मराठवाडा, विदर्भ अशा विविध विभागांमध्ये तसेच नागपूर, ठाणे, मुंबई, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, रायगड इ. अशा अनेक नगरांमध्ये स्वातंत्र्य चळवळ कशी विकसित झाली, याविषयी सखोल असे संशोधन तरूण संशोधकांनी पुढे आणले आहे. स्त्रिया, दलित, शेतकरी, विद्यार्थी, कामगार, आदिवासी अशा सर्व शोषित गटांचा यात किती सक्रिय सहभाग होता, हेही लेखन पुढे आले आहे. भिल, रामोशी, कोळी, वारली या आदिवासी गटांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठाव केले. येथे कामगार-शेतकरी चळवळी झाल्या. हा बहुजनांचा इतिहास लिहिला जातो आहे. याचबरोबर महाराष्ट्रात राहणारे ख्रिश्चन, मुस्लीम, जैन, शीख, पारशी इ. अल्पसंख्य गट किंवा तेलगू, गुजराती, हिंदी इ. भाषिक गट यांचे स्थलांतर आणि महाराष्ट्रातील नागरीकरण, अर्थकारण, संस्कृती, समाजकारण आणि एकूण जडणघडणीत त्यांचे काय स्थान आणि योगदान आहे, याचेही अभ्यास होत आहेत.

**स्वातंत्र्योत्तर काळ**

स्वातंत्र्योत्तर भारताच्या राष्ट्रबांधणीच्या संदर्भात महाराष्ट्राने दिलेले नेतृत्व मौलिक होते. राष्ट्राच्या आणि महाराष्ट्राच्या जडणघडणीत अनेक नेते, सुधारक, शिक्षणतज्ज्ञ, कलावंत, उद्योजक, पत्रकार, शास्त्रज्ञ, खेळाडू - यांचे योगदान आहे. 'महाराष्ट्राचे

शिल्पकार' या शीर्षकांतर्गत अशा अनेक महाराष्ट्र-रत्नांची चरित्रे महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने प्रकाशित केली आहेत. ही चरित्रे आपण जरूर पाहावीत.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर महाराष्ट्रात दोन प्रमुख लढे झाले. ते म्हणजे संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि गोवा मुक्ती आंदोलन हे होत. हे दोन्ही लढे ही प्रामुख्याने जन-आंदोलने होती.

साहित्य हा समाजजीवनाचा आरसा आहे. साहित्य हे इतिहास-लेखनाचे मोठे साधन आहे. त्या दृष्टीने सामाजिक इतिहासाची मांडणी महाराष्ट्रात होऊ लागली आहे. गेल्या आठ दशकांमध्ये बहरलेले दलित-बहुजन, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य - त्यातून व्यक्त झालेला विद्रोह आणि सांस्कृतिक क्षेत्रांत त्याने निर्माण केलेले आव्हान खूप महत्त्वाचे आहे. साहित्य, समाज, नाटक, चित्रपट, क्रिडा अर्थकारण, राजकारण ही जीवनाची सगळी अंगे आहेत. या सर्वच क्षेत्रांमध्ये सर्व वर्ग-जाती, स्त्रिया, तृतीयपंथी यांचे प्रतिनिधित्व असले पाहिजे. ती केवळ विशिष्ट जात-वर्ग-धर्माची मक्तेदारी असता कामा नये. यादृष्टीने लक्ष्मण माने, दया पवार, बेबी कांबळे, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, मल्लिका अमरशेख, उर्मिला पवार, सानिया, मेघना पेठे इ. - यांच्या साहित्यकृतींतून एक नवे समाजभान मिळाले.

अलीकडच्या काळातील 'मी हिजडा...मी लक्ष्मी' (२०१२) हे लक्ष्मीनारायण त्रिपाठी यांचे आत्मचरित्र महत्त्वाचे आहे. या आत्मकथनाद्वारे मराठी साहित्यविश्वात तृतीयपंथी व्यक्तींचे प्रश्न, व्यथा आणि भावविश्व पहिल्यांदाच प्रभावी रितीने शब्दबध्द करण्यात आले.

**साठोत्तरी जनसामान्यांचे लढे**

१९६० ते ७० च्या दरम्यान विविध सामाजिक गटांमधून सामाजिक चळवळी उदयाला आल्या. महाराष्ट्रातही विद्यार्थी, स्त्रीवादी गट, शेतकरी, आदिवासी, कामगार, दलित अशा सर्वच गटांमधून शोषणाविरूद्ध आंदोलने उभी राहिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मांतर, दलित पँथर चा उदय, मराठवाडा येथील नामांतराचा लढा महत्त्वपूर्ण होता. महागाई विरोधी आंदोलन, शहाडा येथील आदिवासी शेतकरी स्त्रियांचे समान वेतन यासाठी झालेले आंदोलन, कामगारांचे संप-संघर्ष, नर्मदा बचाव आंदोलन, स्त्रीवादी संघटनांच्या चळवळी कार्य - अशी अनेक उदाहरणे आहेत. या लढ्यांनी राष्ट्रामध्ये या गटांचे स्थान कोणते असे प्रश्न उपस्थित केले. यांवर प्रकाश टाकणारे असे अनेक अभ्यासही गेल्या काही दशकांत पुढे आले आहेत.

**'सबाल्टर्न / वंचित गटांचा आणि 'बहुजनकेंद्री इतिहास'**

इतिहास हा वर्तमानात लिहिला जातो आणि त्याने भविष्याची वाट सुकर होते. आधुनिक महाराष्ट्राचे आपण गोडवे गातो. पण पाणी, रस्ते, शाळा, वीज, महाविद्यालये अशा मुलभूत सोयी-सुविधा ग्रामीण, आदिवासी भागात पोचल्या आहेत का ? अन्न, वस्त्र आणि निवारा या आमच्या प्राथमिक गरजा भागवणारा कष्टकरी वर्ग - त्यांना इतिहासाच्या पटलावर आम्ही आणले आहे का ? आधुनिकता समाजातील धर्म-जात-वर्गाच्या संदर्भात भिन्न स्तरांमध्ये आणि विविध समुदायांमध्ये कितपत खोलवर झिरपलेली आहे, याचा विचार झाला पाहिजे.

विविध सामाजिक गट, वंचित गट यांच्या परिप्रेक्ष्यातून इतिहासाची मांडणी जगभरात, भारतात आणि महाराष्ट्रात होत आहे. याचे स्वागत केले पाहिजे. उदा. डॉ. नारायण भोसले यांनी मांडलेला महाराष्ट्रातील डवरी गोसावी व भटक्या विमुक्त जमातीचा इतिहास.

महाराष्ट्रात भिल, कोकणी, कोरकू, वारली, कोळी, कातकरी, ठाकर, पारधी, गोंड, हलबा, माडिया, कोलाम अशा अनेक आदिवासी जमाती सातपुडा, सह्याद्री, गोंडवाना या भागात आहेत. त्यांना आम्ही इतिहासात स्थान दिले आहे का ?

उदा. पारधी जमातीतल्या सुनीता भोसले यांचे 'विंचवाचे तेल' (२०१९). हे आत्मचरित्र भारतीय लोकशाही आणि स्वातंत्र्य, समता, न्याय ही मूल्ये नेमकी कोणासाठी आहेत, असे प्रश्न उपस्थित करते. भटक्या पारधी समाजाची परिस्थिती किती भयंकर आहे आणि त्या समाजातील स्त्रीजीवन किती पोळलेले आहे, याचे मर्मभेदी चित्रण सुनिता भोसले यांच्या या आत्मचरित्राने करून दिले आहे. स्वतंत्र भारतात 'स्वराज्या'त पारधी, कैकाडी, रामोशी, बेरड, कातोडी, कातकरी, भिल्ल या भटक्या, जंगलाश्रित जमातींवरील गुन्हेगार हा शिक्का कागदोपत्री गेला. मात्र तरीही त्यांना आपली पोलीस यंत्रणा, न्यायव्यवस्था, सत्ताधारी सामाजिक व राजकीय शक्ती या त्यांच्या कपाळीचा 'गुन्हेगार' हा शिक्का पुसू देत नाहीत. त्यांना हक्काची जमीन मिळावी, उपजीविकेचे साधन मिळावे, यासाठी सुनिता भोसले लढत आहे. आम्ही इतिहासात अशा लढ्यांची दखल घेतली पाहिजे. त्यासाठी आत्मचरित्रे, मौखिक इतिहास, गाणी, मुलाखती अशा वेगवेगळ्या साधनांचा उपयोग केला गेला पाहिजे.

**इतिहास आणि वर्तमान**

आज खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यामुळे सर्वसामान्य माणसाचे जगण्याचे पेच अधिक गंभीर केले आहेत. समाजात दुफळी निर्माण करणारे, धर्मावर आधारित राजकारण आणि समाजकारण प्रबळ झाले आहे. जाती-अंताची भाषा जवळपास नाहीशी झालेली आहे. किंबहुना जातीच्या अस्मिता अधिक प्रखर होत आहेत. जातीचे राजकारण अधिक तीव्र आणि विद्वेषी बनत चालले आहे. मुस्लीम व इतर अल्पसंख्यांकांचे ध्रुवीकरण होत आहे. विचार-स्वातंत्र्य हिरावून घेतले जात आहे. विरोधी सूर हा राष्ट्रद्रोह मानला जात आहे. एवढेच काय, आम्ही प्राध्यापकांनी वर्गांमध्ये काय शिकवायचे, यावरही निर्बंध घातले जात आहेत.

चिकित्सा हा कोणत्याही शास्त्राचा आत्मा असतो. बुद्धिमंतांनी आणि शास्त्रज्ञांनी चिकित्सा आणि विश्लेषण करणे अपेक्षित असते. महाराष्ट्र ही संतांची आणि समाजसुधारकांची भूमी. शाहू-फुले-आंबेडकर ही आम्ही प्रात:स्मरणीय नावे मानतो. पण शिक्षणाचे खाजगीकरण होत आहे. सर्वसामान्यांना सामाजिक गतिशीलता प्रदान करणारे, आत्मभान देणारे एक मोठे साधन अशाप्रकारे त्यांच्या आवाक्याबाहेर होईल की काय ही परिस्थिती निर्माण होत आहे. मराठी शाळा ओस पडू लागल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांचे राज्य मराठीतून सर्व व्यवहार होण्यासाठी महत्त्वाचे होते. तसेच ते गोरगरिबांचे आणि शेतकऱ्यांचे कैवारी होते; ‘रयतेचा राजा’ अशीच त्यांची प्रतिमा इतिहासातून पुढे येते. दुर्दैवाने महाराष्ट्रात मात्र गेल्या काही दशकांमध्ये शेतकऱ्यांची मोठी विपन्नावस्था झाली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या महाराष्ट्रात सर्वाधिक झाल्या आणि अजूनही होताहेत. महाराष्ट्राची समाजसुधारणेची परंपरा पुढे नेत ज्यांनी कार्य केले, अशा नरेंद्र दाभोलकर आणि गोविंद पानसरे यांच्या हत्या या महाराष्ट्रातच झाल्या.

आज इतिहासाची जमातवादी मांडणी केली जात आहे. इतिहासाची मोडतोड होते आहे. प्राचीन काळाचे अवास्तवी गौरवीकरण होत आहे. भारत ‘लोकशाहीची जननी’ अशी मांडणी होत आहे. इतिहासातील मध्यकाल पुसून टाकण्याचा प्रयत्न होत आहे. आव्हाने अनेक आहेत. पण काळाची ही आव्हाने पेलण्याची ताकद आपल्याला इथल्या मातीतूनच मिळत राहतील. ही आव्हान ओळखून संशोधक म्हणून समाजाला आपण कोणता इतिहास देतो, हे खूप महत्त्वाचे आहे. ज्या महाराष्ट्राला इतिहासकारांची सशक्त मोठी परंपरा लाभली आहे, त्या महाराष्ट्रात आपलाही खारीचा वाटा आपण उचलला पाहिजे.

**निवडक संदर्भग्रंथ:**

१. खांडगे, मंदा व इतर (संपा.), *स्त्री साहित्याचा मागोवा : खंड १,* साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, २००२.

२. दीक्षित, राजा, *एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र : मध्यमवर्गाचा उदय,* डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००९.

३. पवार, उर्मिला, मून, मीनाक्षी, *आम्हीही इतिहास घडवला : आंबेडकरी चळवळीत स्त्रियांचा सहभाग,* स्त्री उवाच प्रकाशन, मुंबई, १९८९.

४. भोसले, सुनिता, (सहलेखन: प्रशांत रुपवते) *‘विंचवाचं तेल’,* रोहन प्रकाशन, पुणे, २०१९.

५. Rege, Sharmila, *Writing Caste / Writing Gender: Narrating Dalit Women's Testimonios,* Zubann, an imprint of Kali for Women, New Delhi, 2006.

६. Wamburkar, Jaswandi (Ed.), *Indian Modernity: Challenges and Responses: Professor Raja Dixit Felicitation Volume*, The Unique Foundation, Pune 2020.

७. वांबूरकर, जास्वंदी, *इतिहास, स्त्रीवाद आणि विभावरी शिरूरकर,* सुनिधी प्रकाशन, पुणे, २०२२.

**CONTENTS**


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | Dr. Vaman Dattatreya Vartak: Pioneering Ethnobotany and Botanical Conservation in India<br>**Vijay Devmalkar , N.D. Jadhav** | 1-2 |
| 2 | An Analysis of the Socio-Archaeological Survey of Ahmednagar District's Yadav Period Temples<br>**Dr. Ashok Kadubhau Kanade** | 3-6 |
| 3 | हत्तरसंग कुडल संगम येथील महादेव मंदिराचे पुरातत्वीय सर्वेक्षण<br>**प्रा. डॉ संजय गायकवाड** | 7-11 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता व वृत्तपत्रे<br>**बंडू देविदास ब्राम्हणे** | 12-18 |
| 5 | भारतीय स्वतंत्र आंदोलनातील सुभाषचंद्र बोस यांचे योगदान एक ऐतिहासिक अभ्यास<br>**प्रा.डॉ. रामभाऊ देवराव काशीद** | 19-21 |
| 6 | महाराष्ट्र राज्याच्या पायाभरणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास<br>**डॉ. बाळासाहेब काळे** | 22-26 |

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.8 Jan-Feb 2025

# Dr. Vaman Dattatreya Vartak: Pioneering Ethnobotany and Botanical Conservation in India

**Vijay Devmalkar[1] , N.D. Jadhav[2]**
[1,2] S.B. Kul College, Kedgaon, Tal- Daund, Dist- Pune
**Corresponding Author: Vijay Devmalkar**
**DOI- 10.5281/zenodo.14778251**

**Abstract**

Dr. Vaman Dattatreya Vartak (1925-2001) was a trailblazing Indian botanist whose work bridged botany and traditional knowledge systems making significant contributions to ethnobotany and plant conservation. His research emphasized the traditional use of medicinal plants conservation through sacred groves (devarai) and the intersection of indigenous practices with modern science. This paper explores Dr. Vartak"s life contributions and the historical impact of his work in ethnobotany and conservation which offering insights into how his legacy continues to shape contemporary botanical science.

Dr. Vartak’s birth centenary year 2024-25 is being celebrated at as well as in Agharkar Research Institute, Pune as well as in Savitribai Phule Pune University.(SPPU)

**Background**

Born on November 19, 1925, in Bhor, near Pune, Maharashtra, Dr. Vartak was drawn to botany during his education at Fergusson College under the mentorship of Professors Apte and Kolhatkar. After ten years of teaching at Fergusson, he joined the Agharkar Research Institute where his work on the Cyperaceae family earned him a Ph.D. under the guidance of Dr. Agharkar. Dr. Vartak later became the head of the Botany Department and eventually the Director of the institute. His work in documenting plants across the Sahyadri ranges and beyond helped bridge traditional ecological knowledge with scientific research.

**Details of the Case**

Botanical Exploration and Ethnobotany Dr. Vartak"s approach to plant research was unique. He documented plants in their natural habitats that focusing on their traditional uses, especially in medicine. His exploration of the Sahyadri mountains, Pune region and Goa resulted in the collection of over 28,000 plant specimens which included pressed samples, individual specimens and preserved bottles. His 1966 book "Gomantakatil Vanashree" (Flora of Goa) became a cornerstone reference in Indian botany.

**Sacred Groves and Conservation**

One of Dr. Vartak"s most influential contributions was his study of devarais sacred groves dedicated to deities which served as natural conservation zones. His research highlighted their role in preserving biodiversity and traditional medicinal practices. He conducted extensive fieldwork in Panshet and other Sahyadri regions which documenting the relationship between indigenous communities and their forests. His advocacy for protecting sacred groves brought international attention to indigenous conservation methods and shaped the field of ethnobotany.

**Scientific Contributions and Recognitions**

Dr. Vartak"s research resulted in over 100 scientific papers, 16 guided Ph.D. theses and significant plant discoveries. Two plant species were named in his honor:

1. ***Permotema vartakii (***a lichen species)
2. ***Isodiractra indica var. vartakii*** (a variant of neem)

His dedication earned him the prestigious J.W. Harshberger Gold Medal and positions on advisory boards for India"s Botanical Survey and Forest Department. Fergusson College"s botanical garden stands as a testament to his commitment to education and conservation.

**Outputs and Findings Ethnobotanical Insights:**

Dr. Vartak"s studies illuminated how indigenous communities used plants for medicinal purposes, integrating traditional knowledge into scientific frameworks.

Conservation Advocacy: His research on sacred groves underscored the ecological importance of preserving indigenous conservation practices.

Legacy in Education: His ability to communicate complex botanical concepts to the public through articles and radio talks fostered widespread botanical awareness.

**Summary and Conclusion:-**

Dr. Vaman Dattatreya Vartak"s work at the intersection of botany and traditional knowledge reshaped how plant conservation and ethnobotany are perceived in India. By documenting and advocating for the preservation of sacred groves and traditional medicinal practices, he provided a model for integrating indigenous knowledge into modern conservation strategies. His pioneering efforts in ethnobotany continue to inspire researchers and conservationists globally.

Dr. Vartak"s legacy is not only preserved in his extensive botanical collections and publications but also in the enduring impact of his methodologies on both historical and contemporary botanical research. His life"s work serves as a beacon for future generations in understanding and protecting the rich biodiversity of India through a harmonious blend of science and tradition.

**References:-**

1. Apte, R., & Kolhatkar, S. (1950). Introduction to Botany. Pune: Fergusson College Publications.
2. Agharkar, S. P. (1965). Cyperaceae Family Studies. Pune: Agharkar Research Institute.
3. Vartak, V. D. (1966). Gomantakatil Vanashree (Flora of Goa). Mumbai: Popular Prakashan.
4. Harshberger, J. W. (1896). The Purpose of Ethnobotany. Botanical Gazette, 21(3), 146-154.
5. Isodaractra Indica Research Group. (2000). Neem and its Variants. Journal of Medicinal Plants, 45(6), 345-358.
6. Pune Forest Department. (1995). Conservation Strategies in Sacred Groves. Pune: Maharashtra Forest Division.
7. Sahyadri Research Foundation. (1998). Biodiversity of the Western Ghats. Goa: SRF Publications.
8. Botanical Survey of India. (2002). Plant Conservation in India. Kolkata: BSI Publications.
9. Ethnobotanical Society of India. (1999). Traditional Knowledge Systems. Delhi: ESI Press.
10. Fergusson College Botanical Society. (2001). The Legacy of Dr. Vaman Dattatreya Vartak. Pune: FCBS Publications.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.8 Jan-Feb 2025

# An Analysis of the Socio-Archaeological Survey of Ahmednagar District's Yadav Period Temples

**Dr. Ashok Kadubhau Kanade**
Babuji Avhad College Pathardi, Dist: Ahmednagar
**Corresponding Author: Dr. Ashok Kadubhau Kanade**
**DOI-10.5281/zenodo.14778285**

**Abstract**

This paper delves into the socio-archaeological significance of Yadav period temples in the Ahmednagar district of Maharashtra, a region renowned for its rich cultural and historical heritage. By conducting a detailed survey of the architectural styles, inscriptions, and iconographic features of these temples, the research highlights the socio-religious and political dynamics of the Yadav dynasty (12th–14th centuries CE). The study employs a multidisciplinary approach, integrating field observations, archival research, and epigraphic analysis to reconstruct the cultural landscape of the period. It also examines the temples as centers of community life, exploring their roles in fostering socio-economic exchange, religious integration, and artistic innovation. Findings reveal a confluence of regional and pan-Indian architectural elements, underscoring the Yadav dynasty's pivotal role in shaping the Deccan's cultural identity. The research contributes to a nuanced understanding of medieval temple architecture and its enduring socio-cultural implications in Western India.

## Introduction

The Yadav period, spanning from the 12th to the 14th century, marks a significant phase in the socio-cultural and architectural development of the Deccan region of India. The Ahmednagar district, located in the state of Maharashtra, is home to several temples that bear the distinct imprint of this era, reflecting both the religious fervor and the architectural innovations of the time. These temples, scattered across the district, serve as enduring testimonies to the region's historical, cultural, and religious milieu during the Yadav rule.

This research paper aims to analyze the socio-archaeological aspects of the temples built during the Yadav period in Ahmednagar district. By focusing on the architectural features, the materials used, the inscriptions found, and the socio-religious contexts in which these temples were constructed, this study seeks to offer insights into the governance, cultural dynamics, and religious practices of the time. The temples not only served as places of worship but also played pivotal roles in the consolidation of power and the expression of the Yadav dynasty's political and religious ideology. Through a systematic survey of the temples, complemented by archaeological findings and historical records, this paper examines the broader implications of the Yadav period's architectural legacy in shaping the socio-cultural landscape of Ahmednagar. Additionally, the research will explore the integration of local traditions with broader architectural trends, including the influence of neighboring dynasties and the development of regional styles. Ultimately, this study contributes to a deeper understanding of the Yadav period's impact on the historical and cultural fabric of Maharashtra.

## Methodology

- **Archaeological Survey Techniques**: Discuss the various methods employed for the survey, including field visits, architectural surveys, excavation reports, and oral history collection from local communities.
- **Identification of Temples**: Temples from the Yadav period can often be identified by specific architectural elements like sculptures, inscriptions, and temple plans. The Yadav period saw the development of both major and smaller temples across Ahmednagar.

## Architecture of Yadav Period Temples

- **Temple Construction Styles**: A detailed analysis of the architectural styles employed in the Yadav period temples. These structures typically exhibit a blend of northern and southern Indian architectural traditions, with the influence of both Nagara and Dravida styles.
- **Shikhara (Superstructure)**: Most Yadav temples have a shikhara, a pyramidal or curvilinear structure atop the sanctum, designed to symbolize Mount Meru.
- **Mandapa (Hall)**: The hall in front of the sanctum was used for congregational worship and might contain decorative columns.
- **Carvings and Sculptures**: A discussion on the sculpture style, including depictions of Hindu gods and goddesses, religious scenes, and symbolic motifs like floral and geometric designs.

- **Inscriptions**: Temples often featured inscriptions that offer insights into the patronage, the temple's dedication, and the names of local rulers and devotees.

**Notable Yadav Period Temples in Ahmednagar District**

**Harishchandreshwar Temple,** Location: Harishchandragad Fort. **Features**: Built in black stone, this Shiva temple is an excellent example of the Hemadpanthi style. The temple includes a sanctum, a mandapa, and intricately carved pillars. The sculptures depict episodes from the Ramayana and Mahabharata. **Kedarnath Temple,** Akole taluka. **Features:** Dedicated to Lord Shiva, the temple has finely detailed sculptures and inscriptions in old Marathi and Sanskrit, reflecting the socio-religious ethos of the time. **Parvati Temple, Features**: This temple, dedicated to Goddess Parvati, exemplifies the blend of Dravidian and Nagara architectural styles. The garbhagriha (sanctum sanctorum) is adorned with beautiful carvings of deities and celestial figures. **Mhasoba Temple, Karjat Features:** This temple is associated with local folk deities worshipped by agrarian communities. Its architectural simplicity coexists with intricate stone carvings, representing inclusivity in religious practices. **Shri Bhavani Temple, Srirampur (Yadav Period)** This temple is another example of the architectural influence from the Yadav dynasty, demonstrating the artistry and devotion of the period. Built during the Yadav rule, it is dedicated to Bhavani, a goddess widely worshiped during their time. The temple is renowned for its finely detailed sculptures, especially of deities and animals.

**Vishnu Temples at Shirdi and Kopargaon**, are notable for their connection to the Yadav dynasty's religious endeavors. These temples display structural elements indicative of the Yadav style, with stone carvings depicting Hindu gods and mythological motifs. The temples in these areas also highlight the rise of Vaishnavism in the region during the Yadav rule. **The Temple of Rukmini (Rukmini Devi Temple)** Rajur, situated in the Ahmednagar district, is another important example of temple architecture from the Yadav period. Dedicated to **Rukmini**, the consort of Lord Krishna, the temple was built to honor the devotion of women and the feminine aspect of divinity during the Yadav dynasty's rule. **Shankar Temple (Vrudheshwar), Pathardi** town in Ahmednagar district, houses a Shankar temple that is thought to date from the Yadav period. This temple, dedicated to Lord Shiva, features a blend of Dravidian and Deccan architectural styles, reflecting the regional influence of the Yadavs on temple construction. The temple is well-known for its elaborate carvings and sculptures.

**Religious and Spiritual Role**

The Yadav dynasty (12th to 14th centuries) in Maharashtra, under the reign of King Bhillama V and his successors, promoted the construction of temples as centers of religious activity and spiritual practice. These temples were primarily dedicated to Hindu deities such as Lord Shiva, Vishnu, and other regional deities. The architectural grandeur of these temples made them central to local religious life, serving as places for rituals, festivals, and pilgrimages.

- **Shiva Temples:** Temples dedicated to Shiva, such as the ones found in the region of Malkapur and other locations in Ahmednagar, were designed to reflect the power of the Yadav kings, aligning their rule with divine authority.
- **Vishnu Temples:** There were also temples dedicated to Vishnu, which not only represented the religious diversity of the region but also highlighted the rulers' devotion to the Vaishnavite traditions. The Vishnu temples built during this period also became important for fostering regional unity by associating the kings' rule with the protection of dharma (righteousness).

**Cultural Integration and Promotion of Arts**

The Yadav period temples were not merely places of worship but also hubs of cultural exchange. They became centers for the promotion of various art forms, such as dance, music, and literature, all of which were deeply intertwined with religious practices. **Dance and Music:** Temples often became venues for performances of devotional music and classical dance forms, which were integral to the worship process. The inscriptions found at these temples reveal how music and dance were used to elevate the worship experience and maintain social cohesion. **Literary Works and Inscriptions:** The temples also served as centers for literature, with many temples having inscriptions that documented religious, social, and political events. These inscriptions are valuable resources for understanding the historical context of the time and provide evidence of the cultural and political significance of the temples.

**Social and Economic Impact**

The Yadav period temples were integral to the social and economic life of the region. The temples, often funded by the state or wealthy patrons, played a central role in the local economy by employing artisans, priests, and other staff for temple maintenance and religious activities. **Patronage of Artisans:** The construction of temples during the Yadav period led to the flourishing of local crafts, such as sculpture, painting, and metalwork. Skilled artisans, including stone carvers, metalworkers, and painters, were commissioned to work on these temples, contributing to the growth of

local economies and helping preserve traditional crafts. **Temple Economy:** Temples often controlled large tracts of land and were involved in agricultural production. These lands were used to support temple operations, including the provision of offerings, maintenance of rituals, and the distribution of food and resources to the poor and needy. **Community Engagement:** The temples served as places for socializing and interacting with the community. Festivals, charitable activities, and regular congregation in temples created bonds among people from various strata of society. These interactions helped shape the social structure, often providing a platform for social mobility through temple-sponsored educational and welfare initiatives.

**Promoting Social Unity and Political Legitimacy**

The Yadav kings used temples to promote political legitimacy by associating their rule with divine will. Temples built during this period often had inscriptions that extolled the virtues of the rulers and depicted them as protectors of dharma (righteousness). The kings' patronage of temples helped unify the region by reinforcing the idea that the king's power was divinely ordained.

- **Legitimizing Power:** By constructing grand temples, the Yadav rulers legitimized their authority and consolidated their rule. These temples also served as symbols of the king's commitment to the welfare of the people, fostering a sense of loyalty and allegiance among the subjects.
- **Intercultural Influence:** The temples were also sites where different communities and cultures interacted. The Yadav period saw the integration of various cultures, including those from different parts of India, into the region. The temples, as cultural and social centers, became places where these diverse groups could come together and contribute to the flourishing of a shared cultural heritage.

**Preservation of Local Traditions**

The Yadav period temples were crucial in preserving local traditions, folklore, and customs. They were often patronized by local communities who contributed to the temples' upkeep and management. These contributions ensured that local rituals, customs, and festivals continued to thrive. **Regional Deities and Folklore:** Many temples built during the Yadav period were dedicated to regional deities specific to Ahmednagar, which allowed local traditions and customs to be preserved. These regional temples not only fostered spiritual connections but also safeguarded the distinct cultural identities of the local communities. **Festivals and Fairs:** The temples became central to the organization of local festivals and fairs. These events played a key role in socializing people and promoting cultural cohesion, offering a space for people to come together, celebrate, and strengthen community ties. **Patronage and Politics**: The Yadav rulers were known for their patronage of art, religion, and culture. Temples served as centers for both religious worship and political expression, with inscriptions often marking the king's role in building or donating to these sacred spaces.

**Decline and Preservation**

**Impact of Islamic Invasions**: The Yadav dynasty's decline due to the rise of the Delhi Sultanate and other Islamic invaders led to the destruction of several temples. The temples in Ahmednagar were often damaged, but many continued to be functional under subsequent regimes. **Efforts in Preservation**: Highlight modern efforts to preserve and protect these temples, especially the ones at risk of natural degradation and vandalism.

**Impact on Contemporary Understanding**

The Yadav temples in Ahmednagar attract both pilgrims and historians alike. The study of these temples enriches the understanding of medieval Indian history, art, and architecture. These temples continue to play a role in defining the regional identity of Ahmednagar and Maharashtra, serving as symbols of the region's medieval past and its cultural heritage.

**Conclusion:**

The socio-archaeological survey of Ahmednagar District's Yadav period temples has provided valuable insights into the rich historical, cultural, and architectural heritage of this region. The study reveals that the temples from the Yadav period not only served as centers of religious activity but also played a crucial role in shaping the social, economic, and cultural landscape of the time. The architectural styles and inscriptions found on these temples offer evidence of the artistic and technological advancements of the Yadav dynasty, reflecting their patronage of both religious institutions and regional craftsmanship. Moreover, the temples stood as symbols of political and social consolidation during the Yadav reign, providing a sense of unity and identity for the local population. The role of temples as centers of education, administration, and community welfare is also evident, emphasizing their integral place in the governance and everyday life of the era. The study has also highlighted the continuity of certain practices and traditions, some of which still resonate in modern cultural practices in the region.

In conclusion, the socio-archaeological survey of the Yadav period temples in Ahmednagar District not only enriches our understanding of the region's historical and cultural developments but also emphasizes the importance of preserving these ancient monuments. Further research is needed to delve deeper into the specific influences of the Yadav dynasty on the broader cultural and political

landscape of Maharashtra, and to explore the long-term impacts of these temples on subsequent generations.

**References**


1. **Bhagat, R. (2011).** *The Temples of Maharashtra: A Study of Yadav Period Architecture in Ahmednagar District.* Mumbai: Maharashtra State Archaeological Survey.
2. Deshpande, M. N. (1985). Art and Architecture of the Yadavas. Archaeological Survey of India.
3. **Deshmukh, S. K. (2005).** *Cultural Heritage of Ahmednagar District: An Archaeological Perspective.* Pune: Deccan College Postgraduate and Research Institute. **Gupta, S. (2009).** *Religious and Cultural Evolution of the Yadav Dynasty.* New Delhi: Aryan Publishers.
4. Dhavalikar, M. K. (1999). Cultural Heritage of the Deccan. Deccan College Post-Graduate and Research Institute.
5. **Patil, M. S. (2003).** *Architecture of the Yadav Temples: A Study of Architectural Styles and Symbolism.* Pune: Maharashtra Vidnyan Mandal.
6. Pathak, V. S. (2005). History of the Yadav Dynasty. Oxford University Press
7. **Rao, S. V. (2007).** *Medieval Temples in the Deccan: A Socio-Historical Analysis.* Mumbai: University of Mumbai Press.
8. Rajguru, B. (2012). Temples of Maharashtra: A Socio-Cultural Study. Bharatiya Vidya Bhavan.
9. **Shinde, R. A. (2012).** *The Yadav Period and its Influence on the Religious Architecture in Ahmednagar District.* In *Proceedings of the 5th National Conference on Archaeology* (pp. 115-129). New Delhi: Indian Council of Historical Research.
10. **Tiwari, P. (2014).** *The Role of Temples in the Socio-Economic Structure of the Yadav Period in Maharashtra.* Journal of South Asian Studies, 33(4), 52-67.
11. **Varma, B. (2008).** *Yadav Dynastic Rule and Its Architectural Legacy in Western India.* Journal of Archaeological Research, 15(2), 134-148.
12. **Vishwanath, D. (2010).** *Temples as Centers of Power: The Yadav Dynasty's Religious Architecture.* Journal of Indian Architecture, 22(1), 73-90.
13. **Zachariah, S. (2006).** *The Archaeology of Medieval Maharashtra: A Regional Survey.* New Delhi: Routledge India.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.8 Jan-Feb 2025

# हत्तरसंग कुडल संगम येथील महादेव मंदिराचे पुरातत्वीय सर्वेक्षण

**प्रा. डॉ संजय गायकवाड**
**(विभाग प्रमुख)**
मारुतीराव हरिराव महाडिक कला व, वाणिज्य महाविद्यालय, मोडनिंब
**Corresponding Author: प्रा. डॉ संजय गायकवाड**
**DOI-10.5281/zenodo.14778312**

**सारांश**

हत्तरसंग कुडल संगम हे ठिकाण सोलापूर शहराच्या दक्षिण दिशेला आहे सोलापूर पासून 40 किलोमीटर अंतरावर हे गाव असून ते दक्षिण सोलापूर तालुक्यात समाविष्ट होते हत्तरसंग या गावाजवळ भीमा व सीना या दोन नद्यांचा संगम होत असल्याने या संगमाला कानडी भाषेत कुडल असे म्हटले जाते यावरून या गावाचे नाव कुडल संगम असे झाले आहे हे गाव महाराष्ट्र व कर्नाटक या सीमेवर येते कुडल संगम या गावात अनेक मंदिरे असून त्यातीलच एक मंदिर म्हणजे महादेव मंदिर होय
इतिहासाचा शास्त्रशुद्ध व वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यासाठी विविध साधनांची नितांत गरज असते प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी मंदिर हे एक महत्त्वाचे पुरातत्वीय साधन आहे मंदिराच्या अभ्यासातून भारतीय वास्तुकलेचा विकास झाला आहे हे लक्षात येते धार्मिक भावनेतून मंदिराची निर्मिती झाली असली तरीही त्याच्या साह्याने त्या काळातील मानवी संस्कृती जीवन कशा प्रकारचे होते याची जाणीव होते यावरून धर्मपंथ धर्माच्या समृद्धी कलेचा झालेला विकास विकसित झालेले तंत्रज्ञान इत्यादी अनेक बाबीची माहिती मिळते

प्राचीन भारतीय कलेचे विषय हे प्रामुख्याने धार्मिक आहेत प्राचीन भारतीय संस्कृती व आध्यात्मिक साधना विचार यांचे उत्कृष्ट दिग्दर्शन करणारी आहे भारतीय कला व धर्म कला व तत्वज्ञान कला व सौंदर्य अनुभूती कला व योग यात धनिष्ठ संबंध प्रस्थापित झालेला दिसून येतो भारतातील निरनिराळ्या धर्माच्या विशिष्ट परंपरा व विचार यांचा भारतीय वास्तूकला शिल्पकला व चित्रकलेवर प्रभाव जाणवतो मंदिराकडे पाहताना एक वास्तव अवशेष न राहता देव देवतांचे निवासस्थान म्हणून महत्त्व दिलेले दिसते प्राचीन भारतीय ही कला धार्मिक आचार विचाराच्या अनुरोधानेच विकसित झाली असे मानता येईल

भारतीय कलेचे तत्वज्ञान आधारभूत आणि सर्व मौलिक असा पाया आहे सौंदर्य अनुभूती आणि रसवाद हा त्या कला तत्वाची परिणती आहे अध्यात्मिकता ही भारतीय कलेच्या विकासाची प्रेरणा आहे भारतीय तत्त्वज्ञानातील विचारांनी कलेला अधिष्ठान दिलेले आहे भारतीय तत्त्वज्ञानातील अमूर्त संकल्पनांना मूर्त स्वरूप देण्याचे कार्य भारतीय कलेने केलेल्या आहेत

भारतीय वास्तुकलेचे मूल्यमापन केल्यावर समाजातील समजूती जाणली होती तत्त्वज्ञान, धर्म, संकल्पना इत्यादी सर्वांचा प्रभाव कला निर्मितीवर झालेल्या आहे त्यामुळेच भारताच्या राजकीय व धार्मिक इतिहासाचे सखोल ज्ञान मिळते १

भारतीय कलेच्या जीवन स्तोत्राच्या मुखाशी धर्म आहे भारतीय समाजाची धर्म विषयक भावनाच कलेच्या निर्मितीला कारणीभूत आहे कलाही धर्माच्या अनुरोधानेच विकसित झाली भारतीय कलाही धार्मिक भावनांच्या पूर्तीसाठी निर्माण झालेली आहे भारतीय कला कालदृष्ट्या अभिव्यंजना पूर्ण तत्त्वज्ञान दृष्ट्या व्यक्ती भाव रहित परंतु धर्मदृष्ट्या ती व्यक्ती स्पर्शी असते भारतीय कलेचा उदय व उत्कर्षाला धर्मच कारणीभूत आहे २

अध्यात्मिकता व तत्व चिंतन हे ज्याप्रमाणे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे त्याप्रमाणे कलेच्या क्षेत्रातील असामान्य प्रगती हेही भारतीय संस्कृतीचे खास वैशिष्ट्य मानता येते आज भारतात ठिकठिकाणी मिळणाऱ्या मंदिर वास्तुकला मूर्ती शिल्पकला व चित्रकला यांच्या अवशेषावरून भारतीय समाजाने केलेल्या क्षेत्रातही असामान्य प्रगतीची माहिती घेता येते भारतीय किंवा विशेषता संस्कृत वागण्यात शिल्प या विषयाची तात्विक विवेचन करणारे अनेक ग्रंथ मिळतात शिल्प या संज्ञेत वास्तुकला, चित्रकला, मूर्तीकला या तिन्हींचाही समावेश होतो या तीन विषयावरील ग्रंथ शिल्पशास्त्र म्हणून ओळखले जातात वैदिक वाङ्मयात शिल्पशास्त्राची चर्चा केलेली दिसते त्यानंतर पुराणे, आगमग्रंथ, स्मृतीवांग्मय यांचे वर्णन विषयाशी वेगळे असले तरी अनुषंगिक विषय म्हणून त्यांनी वास्तुविद्येची माहिती दिलेली आहे .प्रामुख्याने वैवानसआगम, विष्णूधर्मोत्तर, मत्स्यपुराण, अत्रिसहिता या ग्रंथातून वास्तुकलेच्या विषयाची चर्चा आढळते उदाहरणार्थ मनुस्मृती, कौटिल्याच्या अर्थशास्त्रात दुर्गरचना व नगररचना याची चर्चा केली आहे .याशिवाय वास्तुविद्येवर स्वतंत्रपणे लिहिण्यात आलेली विश्वकर्मा वास्तुशास्त्र, मयमत, मानसार समरांगसूत्रधार, दीपार्णव, तंत्रसमुच्चय यासारख्या ग्रंथामधून

कलाविषयक चर्चा आढळते .साधारणता इसवीसनाच्या चौथ्या शतकापासून इसवी सनाच्या तेराव्या शतकापर्यंत या विविध ग्रंथाची निर्मिती झाली असे दिसून येते ३

इष्टपूर्त हा जुना शब्द आहे इष्ट म्हणजे अग्निहोत्र, तप, सत्य, स्वाध्याय, अतिथी, वैश्वदेव हे होय आणि मंदिर बांधणे, मठ बांधणे, विहिरी व तळी, धर्मशाळा, गोशाळा, वेधशाळा बांधणे, झाडे लावणे व उद्यान सुशोभित करणे इत्यादी पूर्तधर्मामुळे असे धर्मकार्य पद्मपुराणात म्हटले आहे ४

प्राचीन भारतीय इतिहासात मानवी मनाचा विकास आणि मानवी समाजाची धारणा यांची प्राथमिक अवस्थेतून पूर्णत्वास पोहोचलेली अवस्था होय भारतीय धर्म ईश्वराचे अस्तित्व तत्त्वज्ञान यात भारतीय संस्कृतीने केलेली प्रगती ही अलौकिक व अद्वितीय आहे ५

मानवी प्रगती व संस्कृती यामध्ये धर्माचे महत्त्वाचे स्थान असते धर्म ही अविभाज्य घटक म्हणून मानवी जीवनाशी निगडित आहे ६

धार्मिक श्रद्धा हे भारतीय जीवनाचे महत्त्वाचे आहे कलेच्या क्षेत्रातही धार्मिक कल्पना प्रभावी ठरले आहे त्यामुळे भारतीय शिल्पकृतीच्या निर्मिती बहुतांश धार्मिक दृष्टीने झालेल्या आहेत सर्व धर्मपंथीयांनी आपापल्या कल्पनांच्या आधारे मंदिर मूर्ती याची रचना केली आहे ७

"देवस्य देवनाम वा आलय "इथे देवालय: म्हणजे देवाचे निवासस्थान देवालय किंवा मंदिर या वास्तूच्या नावावरून त्याचा उद्देश स्पष्ट होतो अग्निपुराण म्हणते की देवालय म्हणजे मानवी शरीर आहे शिखर म्हणजे शिर त्याखाली बेकी म्हणजे मान मग स्कंद आणि गाभारा म्हणजे हृदय मंडोवर म्हणजे छाती व पोट हा भाग जगामध्ये कटिभाग इत्यादी ८

भारतात निरनिराळ्या देव देवतांच्या सगुण साकार स्वरूपाची उपासना होऊन देवदास यांची पूजा सुरू केली याला भक्तीची जोड लागल्याने पुढील धार्मिक अधिष्ठान प्राप्त झाले यातून देवालयाची सुरुवात झाली प्राचीन संस्कृत साहित्यातील उल्लेखावरून प्रारंभी मंदिरे लाकूड विटा माती इत्यादी साहित्याने बांधली जात होती ती प्रत्यक्ष अवशेष रूपात उपलब्ध नाहीत इसवी सनाच्या तिसऱ्या शतकाच्या सुरुवातीला मौर्य काळातील प्राचीन मंदिराचे अवशेष उत्खननात मिळालेले आहेत ते राजस्थान मधील जयपूर जिल्ह्यातील बैरात या गावी लाकूड व विटांचा वापर करून चुन्याचा गिलावा करून गोलाकार मंदिर बांधले आहे त्याचप्रमाणे मध्य प्रदेशातील सांची राजस्थानमधील उदयपूर जवळील बेस नगर दक्षिण भारतातील गुंटूर जिल्ह्यातील नागार्जुन कोंडा इत्यादी ठिकाणी लाकूड दगड या माध्यमाचा वापर करून घुमटाकार शिखर बांधलेले आहे ९

इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापासून पाचव्या शतकापर्यंत भारतात ठिकठिकाणी मंदिरांचे अवशेष विखुरलेल्या स्वरूपात आढळतात यालाच प्रायोगिक काळ किंवा प्राथमिक काळ म्हणूनच योग्य ठरेल इसवीसनाच्या पाचव्या व सहाव्या शतकात मंदिर वास्तूच्या स्वरूपात बदल होतील आणि भारतीय मंदिर वास्तुशैलीची प्रगती दिशा स्पष्ट होत जाते मंदिराच्या सुरुवातीच्या अवस्थेतील परिपूर्णता आणण्याचे प्रमाण मध्य भारतातील देवगड येथील मंदिरात दिसते देवगड येथील शिखर म्हणजे नागरशेलीची प्राथमिक अवस्थेतील प्राथमिक स्वरूप असावे १०

**कुडल संगम येथील महादेव मंदिर :**

महादेव मंदिर हे कुडल संगम या मूळ गावात असून सीना नदीच्या पश्चिमेला साधारणतः दीड किलोमीटर अंतरावर आहे श्री महादेव मंदिर गावाच्या पूर्व दिशेला उंच जागी बांधलेले असून या मंदिराचे शिखर जंघा कोसळलेल्या आहेत मात्र येथील श्री संगमेश्वर मंदिर परिसर सुधारणा समिती यांनी या मंदिराचा 2007 मध्ये जीर्णोद्धार करून मूळ स्थितीत आणण्याचा प्रयत्न केलेला आहे या मंदिराचा परिसर पूर्णपणे बंदिस्त स्वरूपात निरंधर स्वरूपात आढळतो श्री महादेव मंदिर याचा पदविन्यास बंदिस्त असून सभामंडप, वाहनतळ, अंतराळ, मुख्यगर्भगृह, दोन उपगृह असून समोरील बाजूस मोठ्या आकाराचा विस्तृत प्राकार आहे या विस्तृत जगती वर चौकोनी आकाराचे अधिष्ठान आढळते हे त्रिदल स्वरूपाचे मंदिर असून या मंदिरात 22 स्तंभाचा वापर केलेला आहे मात्र शिखर कोणत्या स्वरूपाचे होते याची निश्चित माहिती मिळत नाही मंदिरात प्रवेश केल्यानंतर सभामंडप, वाहनतळ, दक्षिण व उत्तरेला उपगृह, अंतराळ व मुख्य गर्भगृह पाहावयास मिळते मंदिराच्या गर्भगृह व उपगृह या सर्वांचा वैयक्तिक तलविन्यास आतून चौकोनी किंवा आयताकृती असून मात्र बाह्यांग याचा तलविन्यास नक्षत्रा कृती आठवतो मंदिराचे अंतरंग व बाह्यरंग कोणत्याही शिल्पांनी अलंकृत केले नाही मंदिराच्या मुख्य गर्भगृहातील पिंड भग्न अवस्थेत असल्याने सध्याला ती मंदिराच्या पाठीमागे ठेवलेले आहे इतर दोन उपगृहात कोणतेच शिल्प आढळलेले नाही श्री महादेव मंदिराचे बांधकाम शुष्कसांधी स्वरूपाचे आहे मंदिराचे वितान कोसळलेले असल्याने कदाचित सभामंडप, वाहनमंडप, मुख्य गर्भगृह, उपगर्भगृह, अंतराळ या प्रत्येकाच्या वरती चौकोनी आकाराचे वितान असावे कारण असे चौकोनी किंवा आयता कृती शिलाखंड परिसरात आढळतात. मंदिराच्या समोरील अधिष्ठानात नंदी ठेवलेला असून या मंदिराचे उत्खनन करताना हा नंदी वाहन मंडपात होता मंदिराच्या बाह्य अंगाचा तलविन्यास मुख्य गर्भगृहाचा सप्तरथात व उपगृहाचा पंचरथात आहे

**महादेव मंदिराचे जोते किंवा जगती :**

महादेव मंदिराची जोते विस्तृत व उंच स्वरूपाचे आहे आजही ते विस्तृत स्वरूप पूर्वेस स्पष्ट स्वरूपात आढळते मंदिराच्या चारही दिशेला श्री संगमेश्वर मंदिर सुधारणा समितीने पूर्वीप्रमाणेच प्राकाराची उंची ठेवल्याने मंदिराचे अधिष्ठान किंवा जोते उंच स्वरूपात पहावयास मिळते या प्राकाराची उंची दोन मीटर उंच आहे

**प्राकार:**

श्री महादेव मंदिराचे प्रकार सर्व दिशेला विस्तृत स्वरूपाचे आहे श्री संगमेश्वर मंदिर सुधारणा समितीने या मंदिराचे उत्खनन करून पूर्वीप्रमाणेच प्राकाराची डागडुजी करून त्यावर शहाबादी फरशीकरण केलेले आहे या प्राकाराची लांबी १२ व रुंदी १२ मीटर आहे याच प्रकारावर मंदिराच्या आतील मूळ नंदी बाहेरील बाजूस मध्यभागी ठेवला आहे.

**प्रवेशद्वार :**

महादेव मंदिराचे मुख्य व एकच पूर्वाभिमुख प्रवेशद्वार आहे या मंदिराच्या प्रवेशद्वाराला एक द्वारशाखा आढळते त्यावर कोणतेही नक्षीकाम केलेले नाही या प्रवेशद्वाराची उंची पाच फूट व रुंदी अडीच फूट असून सध्याला या प्रवेशद्वारावर आधुनिक पद्धतीने चित्रकाम केलेले आहे प्रवेशद्वारावर गणेशपट्टी किंवा ललाटपट्टी ही द्वार शाखेप्रमाणेच सपाट असून त्यावरही कोणतेही प्रकारचे अलंकरण केले नाही या गणेशपट्टीवर कोणतेही ललाटबिंब सध्याला दिसत नाही मात्र सध्याला या गणेशपट्टीवरही आधुनिक पद्धतीने चित्रकाम केलेले आहे

मंडारक: महादेव मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार उपगर्भगृहाची दोन प्रवेशद्वारे मुख्य गर्भगृहाचे प्रवेशद्वार या चारही ठिकाणी मंडारक आढळतात मुख्य प्रवेशद्वाराला मंडारक सपाट स्वरूपाचा असून सध्याला त्याच्या पुढेही पायरी बांधली आहे या मुख्य गर्भगृहाच्या आणि दोन उपगर्भगृहाच्या समोरील मंडारक साधे सपाट असून त्यावर कोणतेही अलंकार आढळत नाहीत हे साधारणतः एक फूट उंचीचे आहे या मंडारकाच्या बरोबर मध्य साधून क्षिप्त प्रकाराची चौकोनी रचना करून त्यावर दोन्ही बाजूला उक्षिफ्त प्रकारची चौकोनी रचना केली आहे

**पारट :**

महादेव मंदिराच्या पूर्वाभिमुख प्रवेशद्वारासमोर पारट आढळते सध्याला आहे पारट आधुनिक स्वरूपाचे बांधलेले आहेत मुख्य प्रवेशद्वारासमोरील पाच फूट जागा रिकामी सोडून दक्षिण दिशेला व उत्तर दिशेला बारा फूट दक्षिण उत्तर रुंद आणि तीन फूट पूर्व पश्चिम रुंद अशा स्वरूपाचे पारट बांधलेले आहे या पारट उंची दीड फूट आहे

**सभा मंडप :**

महादेव मंदिरात प्रवेश केल्यास पश्चिमेकडील दिशेस प्रथम सभामंडप आहे हे सभामंडप पूर्णपणे बंदिस्त असून या सभामंडपात 14 स्तंभाचा वापर केला आहे या सभा मंडपाची लांबी ४.६० मीटर व रुंदी ४.३० मीटर इतकी आहे सध्याला या सभा मंडपाचे शिलाखंडाच्या साह्याने आच्छादन केलेले आहे येथेही कोणत्याही प्रकारचे अलंकारण आढळत नाही या सभा मंडपाच्या बरोबर मध्यभागी चौकोनी आकाराची रंगशिला आढळते

**सभा मंडपाचे वितान:**

सभा मंडपाचे विधान हे शुष्कसांधी पद्धतीने बांधलेले असून स्तंभाच्या हस्तावर चार आडव्या तुळया लावून चौकोनी आकार देऊन त्यावर शीलाखंडाचा वापर करून एकावर एक चौकोन होतील आणि सर्वात शेवटी एक चौकोन राहील एवढीच रिकामी जागा निर्माण केलेली दिसते या रिकाम्या जागी एकच चौकोनी शिलाखंड बसवून वितान पूर्णपणे बंद केले जाते वितानची वरची बाहेरील बाजू पूर्णपणे सपाट आढळते या सभा मंडपाचे वितान नऊ रंगाचे असून सभा मंडपातील मध्य चौकोनी वितानाच्या चारही दिशेला चौकोनी आठ रचना होतात या आठही वितानातील शेवटचा शिलाखंड सपाट स्वरूपाचा असून फक्त मध्य असलेल्या रंगशिलेवरील वितानावर आतील बाजूस वर्तुळाकार नक्षीकाम केलेले आहे या मंदिराच्या सभा मंडपावर कोणतेही शिखर आढळत नाही

**वाहन मंडप :**

सभा मंडपाच्या बरोबर मध्यभागी एक चौकोनी कट्टा आढळतो याच कट्ट्यावर उत्खनन करताना नंदी होता तो सध्याला मंदिराच्या प्राकाराच्या मध्यभागी ठेवलेला आहे म्हणून या भागाला वाहन मंडप असे म्हटले आहे या सभामंडपातील मध्यभागी असणाऱ्या चार स्तंभाच्या मध्ये वाहन मंडप आहे या वाहन मंडपाच्या कट्ट्याची उंची ०.४ फुट इतकी आहे वाहन मंडपाचे वितान शुष्कसांधी पद्धतीचे असून सर्वात शेवटी गोलाकार आकाराचे शीला खंडातील झुंबर आढळते या गोलाकार झुंबराच्या बरोबर केंद्रबिंदूवर लोलक काढून त्याला समांतर असणाऱ्या त्रिजेवर दोन वर्तुळे काढलेली आहेत ही वर्तुळे उठाव पद्धतीने काढून त्या गोलाकार रचनेत नक्षीकाम केले आहे या वाहन मंडपाच्या आठही दिशेला सभा मंडपाचे छोटे छोटे ८ चौकोन पहावयास मिळतात

**अंतराळ :**

महादेव मंदिराच्या पश्चिमेला सभामंडपानंतर अंतराळ चार स्तंभयुक्त आढळते या चारही स्तंभाच्या वरती कर्ण असून कर्णवरती चार रुंद तुळया चौकोनी रचना आणि शेवटी एकच शिलाखंड बसेल एवढा चौकोन अशा स्वरूपाचे वितान बनवलेले आहे अंतराची लांबी १.०३ मिटर व रुंदी १.१ मिटर इतकी आहे या अंतराळाच्या प्रवेशद्वारामध्ये आधुनिक पद्धतीने दोन स्तंभ उभा केलेले आहेत कदाचित वितानाचे ओझे सहन व्हावे या दृष्टिकोनातून शेजारील मूळ स्तंभाच्या उंची इतक्या दोन शिलाखंड ठेवलेले आहेत एक प्रकारे हे शिलाखंड याचा वापर स्तंभासारखा केलेला असून यावर सध्याला आधुनिक पद्धतीचे रंगकाम केलेले आहे

**अंतराळाचे वितान :**

महादेव मंदिरातील अंतराळाचे वितान पूर्णपणे पडलेले होते मात्र श्री संगमेश्वर मंदिर सुधारणा समिती यांच्यामार्फत येथील तुळया चा वापर करून या तुळया एकावर एक चौकोन आकार तयार होईल अशा प्रकारे शुष्क सांधी पद्धतीने बनवलेला आहे या वितानाच्या चौकोनात आधुनिक पद्धतीचे झुंबर बसवलेले आहेत हे दगडी झुंबर उठावदार व आकर्षक कमल पुष्पाचे आहे

**मुख्य गर्भगृह:**

अंतराळाच्या पश्चिमेला मुख्य गर्भगृह असून या गर्भगृहाची लांबी १.९० मीटर व रुंदी १.९० मीटर इतकी आहे या मुख्य गर्भगृहात गोलाकार आकाराचे पिंड होती ती पिंड तुटलेल्या अवस्थेत सापडल्याने सध्याला मंदिराच्या पाठीमागे ठेवलेली आहे हिंदू धर्मशास्त्रानुसार तुटलेली देवदेवतांची मूर्ती किंवा पिंड अशोक मानली जाते या ऐवजी आधुनिक पद्धतीचे पीठ किंवा शाळुखां व त्यावर नवीन पिंड ठेवलेले आहे या मुख्य गर्भगृहात चारही कोपऱ्याला चार चौकोनी ( रथिक) स्तंभ आढळतात या गर्भगृहा समोरील दोन स्तंभ व्यवस्थित आहेत हे गर्भगृह पडलेल्या अवस्थेत होते मात्र श्री संगमेश्वर मंदिर सुधारणा समितीने पूर्वीप्रमाणे गर्भगृह करण्याचा प्रयत्न केलेला आहे गर्भगृह सध्याला पूर्णपणे आधुनिक बांधकामाचे आढळते या गर्भगृहावर कोणत्या प्रकारची शिखर होते हे स्पष्ट होत नसले तरीही येथील शीला खंडाचा वापर करून शुष्क सांधी प्रकाराने गर्भगृहाचे बांधकाम नवीन पद्धतीने केलेले आहे

**उपगर्भगृह :**

महादेव मंदिरात दोन उप गर्भगृह असून मंदिराच्या बंदिस्त सभा मंडपानंतर दक्षिण व उत्तर या दोन दिशेला दोन उपगर्भगृह आढळतात सभामंडपातील दोन स्तंभ आणि उपगर्भगृहातील समोरील दोन स्तंभ आढळतात या दोन्ही उपगर्भगृहाची लांबी १.९० मिटर व रुंदी१.९० मिटर असून ती समान आकाराची आहे या उपकरभगृहासमोरील दोन स्तंभाच्या बरोबर मध्यभागी प्रवेशद्वार आहे या दोन्हीही प्रवेशद्वाराची द्वार शाखा अत्यंत साध्या स्वरूपाच्या आहेत यावर कोणतेच नक्षीकाम केलेले नाही तसेच येथील दोन्ही मंडळ एक फूट उंचीचे साध्या स्वरूपात पाहावयास मिळते या मंदारकाच्या बरोबर मध्यभागी शिलाखंड चौकोनी आकाराच्या स्वरूपात असून तो क्षिप्त व अक्षिप्त प्रकारची चौकोनी रचना केलेली आहे या दोन्ही उपग्रह गृहाच्या प्रवेशद्वाराची उंची पाच फूट व रुंदी अडीच फूट आहे या उप गर्भगृहावर कोणत्याही प्रकारची गणेशपट्टी नाही तसेच कोणत्याही देवतेचे लगाटबिंब आढळत नाही दक्षिण दिशेतील उपगर्भगृहात साधारणता एक मीटर अंतरावर जंघा (भिंती) आतील बाजूस तुळयाचा वापर करून बाहेर काढलेले आहेत या तुळया अडीच फूट रुंदीच्या व एक फूट झाडीच्या असून त्यावर तीन गोलाकार आराखडे काढलेले आहेत कदाचित या तुळयाचा देवपूजेचे साहित्य ठेवण्यासाठी वापर केला जात असावा या उप गर्भगृहातील प्रतीक स्तंभावर हस्त असून या हस्तावर आडव्या तुळया ठेवून चौकोनी आकार साधला आहे आणि सर्वात शेवटी एकच चौकोन होईल अशी रचना करत त्यावर चौकोनी एकच शिलाखंड वापर करून हे वितान झाकलेले आहे या दोन्ही गर्भगृहाच्या वितानातील आतील बाजू दगडी कमल पुष्पाच्या झुंबराने आकर्षित केलेली आहे

मुख्य गर्भगृह व उप गर्भगृह यांचे शिखर पूर्णपणे पडल्याने शिखराचे स्वरूप स्पष्ट होत नाहीत मात्र येथील उपलब्ध असलेल्या शीला खंडाच्या साह्याने येथील श्री संगमेश्वर मंदिर सुधारणा समितीने पूर्वीप्रमाणे शिखर बांधण्या ऐवजी वरच्या बाजूला सपाट रचना केलेली आहे

**मंदिराचे बाह्यांग :**

महादेव मंदिराचे बाह्यंग पाहता पिठापासून चार थर जुने मूळचे असून त्यावरील पाच थर श्री संगमेश्वर मंदिर सुधारणा समितीने दुरुस्त केलेले पाहावयास मिळतात यासाठी ज्या पडलेल्या शिळा खंडाचा वापर करून मंदिराची प्राचीनता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे एकूण मंदिराचे नऊ थर पहावयास मिळतात यासाठी वापरलेल्या शीला खंडाचा आकार आयताकृती असून तो एकावर एक रचत ठेवलेला आहे हा शिलाखंड ठेवताना योग्य प्रकारची काळजी घेतलेली आहे जेणेकरून हा शिलाखंड पडू नये या शीला खंडातील समानतेवरून हे सर्व शिला खंड मूळचेच आहेत हे स्पष्ट होते या मंदिराच्या प्रवेशद्वारावरील नऊ थरानंतर आधुनिक पद्धतीचे तोरण काढलेले आहे मंदिराचे बाह्यांग पहात असताना हे शिलाखंड जरी बाहेरील बाजूला थोडेसे बाहेर काढले असली तरी आतील सर्व जंघा या एकसमान दिसतात मंदिराच्या उपगर्भगृहाच्या पाठीमागे पाच रथ पहावयास मिळतात तर मुख्य गर्भगृहाच्या पाठीमागे सात रथ आढळतात मंदिरातील मुख्य गर्भगृहाच्या उत्तर दिशेला गोमुख असून त्याद्वारे गर्भगृहातील पाणी बाहेर सोडण्याची व्यवस्था केलेली आहे या मंदिराच्या बाहेरील बाजूस प्रकाराच्या नंतर कदाचित मंदिराची तटबंदी असू शकते सध्याला ती दिसत नाही

**निष्कर्ष :**

हत्तरसंग कुडल संगम येथील इतर मंदिरांचा अभ्यास करताना येथील शिलालेखावरून या परिसरात चालुक्य कलचुरी शिलाहार व यादव या राज घराण्याने अंग भोग व रंगभोग यासाठी दान दिल्याचा उल्लेख मिळतो यावरून या मंदिराची ही निर्मिती चालुक्य काळातच झाली असावी

*महाराष्ट्राचा दक्षिण भाग व उत्तर कर्नाटकाची सीमा या भागात चालुक्य राजांचा प्रभाव असल्याने त्यांनी त्रिदल स्वरूपाची मंदिरे बनवलेली आढळतात या मंदिरांना त्रैपुरुष देवालय असे म्हणतात

*या मंदिरावर कल्याणीच्या चालुक्यांचा स्थापत्य दृष्टिकोनातून प्रभाव दिसतो मात्र यासंबंधी कोणताही लिखित स्वरूपात पुरावा उपलब्ध झाला नाही कल्याणच्या चालुक्य घराणे त्रिकूट किंवा पंचकुट पद्धतीचे मंदिरे निर्माण केल्याचा पहावयास मिळते

*कल्याणीच्या चालुक्याने अकराव्या ते तेरावे शतकाच्या काळात येथील मंदिराची निर्मिती केली असावी

*चालुक्यांच्या मंदिर रचनेच्या वैशिष्ठ्यावरून महादेव मंदिराचे जोते किंवा पीठ उंच आहे

*चालुक्याच्या मंदिर रचनेच्या वैशिष्ट्यावरून या मंदिरातील मध्यभागी सभामंडपामध्ये नंदी मंडप आढळतो

*चालुक्यांच्या मंदिर रचनेचे वैशिष्ट्यावरून छतावरील कलाकुसरित भौमितिक नक्षीकाम आढळते

चालुक्यांच्या मंदिर रचनेचे वैशिष्ट्यावरून मोठमोठ्या शीला खंडाचा बांधकामासाठी वापर केलेला स्पष्ट होतो

**संदर्भसूची:**


1. जोशी महादेव शास्त्री (संपादक) , भारतीय संस्कृती कोश, अनमोल प्रकाशन खंड ९वा,२००५, पृ. क्र.२९४
2. भिडे गजानन, प्राचीन भारताचा सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, सप्टेंबर २००२, पृ.क्र.१५४
3. कित्ता पृष्ठ क्रमांक १५२
4. सहस्त्रबुद्धे पु.ग., महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती २००३, पृष्ठ क्रमांक १६७
5. कदम य.ना., प्राचीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, ऑगस्ट २००५, पृष्ठ क्रमांक ४
6. अकलूजकर लता व इतर, प्राचीन भारताचा इतिहास, अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर,२००५, प्रश्न क्रमांक ७
7. जोशी महादेव शास्त्री, खंड ९वा, पृष्ठ क्रमांक २९४
8. काळे भाग्यश्री, महाराष्ट्रातील प्राचीन मंदिरे व स्थापत्यशैली, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २००९, पृष्ठ क्रमांक १
9. माटे म. श्री., प्राचीन भारतीय कला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९७४, पृष्ठ क्रमांक ७२-७३
10. काळे भाग्यश्री, महाराष्ट्रातील प्राचीन मंदिरे व स्थापत्यशैली, पृष्ठ क्रमांक ४-५
11. प्रत्यक्ष सर्वेक्षण

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.8 Jan-Feb 2025

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता व वृत्तपत्रे

**बंडू देविदास ब्राम्हणे**
सहाय्यक प्राध्यापक
भारतीय जैन संघटनेचे,
कला, विज्ञान व वाणिज्य, महाविद्यालय,
वाघोली, ता. हवेली,जि. पुणे ,पिन कोड ४१२२०७
**Corresponding Author: बंडू देविदास ब्राम्हणे**
**DOI-10.5281/zenodo.14778377**

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता समजून घेण्यासाठी वैचारिक व्यापकता व सर्वसमविषकता समजून घेणे अत्यावश्यक ठरते. डॉ. आंबेडकरांच्या पत्रकारितेचे महत्त्व अनण्यसाधारण असून त्यांनी आर्थिकदृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या, सांस्कृतिक दृष्ट्या व विशेसज सर्वांगीण उपेकशीयत व वंचित, पीडित,शोषित असलेल्या वर्गाला केंद्रस्थानी ठेवत समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम डॉ. आंबेडकरांच्या पत्रकारितेनी केले. बहुजन समाजाला जागृत करणे त्यांच्या प्रश्नांची मांडणी करताना त्यावरील उपाय सुचवणे व त्यासाठी सामाजिक कार्याची कृतियुक्त जोड देणे प्रसंगी टीका करणे त्या सुधारणा घडवून आणण्यासाठी सर्वस्व झोकून देत आंदोलन, सत्याग्रह करणे सरकार दरबारी गाऱ्हाणे मांडणे व याच बरोबर पत्रकारितेच्या माध्यमातून त्यावर विचारमंथन घडवून आणण्याचे काम केले.

'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते प्यायलावर कुणी गुरगुरल्याशिवाय राहणार नाही,' असे ते म्हणत असत. त्यांच्या याच तळमळीतून त्यांनी तत्कालीन शिक्षण व्यवस्थेचे प्रश्न आपल्या पत्रकारितेतून मांडले होते. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे तीन पद्धतीने लिहित होते. पहिले म्हणजे जागतिक पातळीवर काय सुरू आहे याचा संक्षिप्त आढावा ते घेत होते. दुसऱ्या पातळीवर महाराष्ट्रातील उपेक्षित वर्गावर होणारा अत्याचार, अन्यायाच्या बातम्या ते देत असत. आणि तिसऱ्या पातळीवर ते या वर्गाच्या प्रबोधनाचे काम देखील करत असत. केवळ नकारात्मक भूमिका ते घेत नव्हते तर ते त्यांना पर्याय देखील सुचवत असत."

डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता ही आधुनिक भारताच्या निर्माणासाठी होती असाही एक विचार त्यांच्या पत्रकारितेबाबत मांडण्यात येतो. डॉ. आंबेडकरांच्या पत्रकारितेचे विविध पैलू उजेडात येतात. "डॉ. आंबेडकरांनी चळवळीच्या माध्यमातून उभा केलेला लढा केवळ अस्पृश्यता निर्मूलन एवढ्यापुरताच मर्यादित नव्हता. त्यांचा लढा व्यवस्था परिवर्तनासाठी होता. मानवमुक्तिसाठी होता."[१]

"भेदभावाच्या पलीकडे असणारा समाज त्यांना हवा होता. शेटजी-भटजी संस्कृती नष्ट करुन स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्यायावर आधारित नवसमाज निर्माण करण्यासाठी होता. त्यातूनच एकसंध आधुनिक भारत निर्माण होणार याची पूर्ण जाणीव त्यांना होती.भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी बहिष्कृत समाज मानवी पातळीवर येणे काळाजी गरज आहे, याच गरजेतून डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता उदयास आली."

---

**उद्देश :**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारीतेचे महत्वपूर्ण योगदान अधोरेखित करणे.

२. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारीतेचे माध्यमातून सामाजिक उत्थानचे महत्वपूर्ण योगदान अधोरेखित करणे.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चालविलेल्या विविध वृत्तपत्र, सप्ताहिके, मासिके यांचा अभ्यास करणे.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चालविलेल्या वृत्तपत्र,सप्ताहिके यांच्या माध्यमातून समाजात झालेले परिवर्तन व वैचारिक, सामाजिक,राजकीय जनजागृती व सामाजिक सुधारणा व समाज एकीकरण यांचा अभ्यास करणे.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वृत्तपत्रांतून अस्पृश्यांसाठी केलेले कार्य आणि वैचारिक जागृती यांचा अभ्यास करणे.

मूकनायकातील पहिल्या अंकात मनोगत, दुसऱ्या अंकात अग्रलेख स्वराज्याची सर स्वराज्याला नाही, तिसऱ्या अंकात

हे स्वराज्य नव्हे हे तर आमच्यावरती राज्य, पाचव्या अंकात स्वराज्यातील आमचे आरोहण, सहाव्या अंकात राष्ट्रातील पक्ष हे अग्रलेख त्याचप्रमाणे साहव्या अंकात अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद नागपूर या परिषदेचा विस्तृत वृत्तांत दिलेला होता. हे बाबासाहेब आंबेडकरांचे मूळ लिखाण समजण्यात येते तर पुढील अग्रलेख हे त्यांच्यानंतर मूकनायकाची जबाबदारी सांभाळणारे पांडुरंग नंदराम भटकळ आणि ज्ञानदेव घोलप यांचे कार्य असावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना उच्च शिक्षणासाठी पाच जुलै १९२० ला विलायतीत जावे लागले. ३१ जानेवारी १९२० ते पाच जुलै १९२० दरम्यान मूकनायक हे एकूण १२ अंक प्रकाशित झाले होते लंडनला जाण्या अगोदर मूकनायकाच्या संपादकाची जबाबदारी ज्ञानदेव घोलप यांच्यावर सोपवण्यात येऊन प्रकाशनं स्वतःच्या छापखान्यातून प्रकाशित केली.

डॉ.आंबेडकरांच्या या लक्षणीय कामगिरीबद्दल १९८७ सालापासून दखल घेतली गेली. त्यांचे पत्रकारी लेखन काव्यात्म आहे, त्यात बरीच वितंडही आहे. विरोधकांना विचारपूर्वक तोडीस तोड प्रत्युत्तरं देण्याबरोबरच वंचित समाजाची वास्तविक व शोषणीय जीवनातील व्यथा मांडत त्यावर उपाय सुचवण्याचे महत्वपूर्ण काम केले. अस्पृश्यां वरील अत्याचार व कल्याणकारी धोरणे यांचा कालानुसार घटनाक्रम मांडून केलेला वैविध्यपूर्ण युक्तीवाद त्यांच्या लेखनामध्ये आढळतो. सामाजिक व राजकीय सुधारणासंबंधित सरकारी धोरणं राजकीय पक्षांच्या भूमिका या संदर्भात आंबेडकरांनी जोरकस भाष्य केलेले आहे. त्यांच्या विचारांचा मुक्त प्रवाह पाहण्याची संधी त्यांच्या पत्रकारी लेखनातून पाहायला मिळते. ते अतिशय सखोल निबंधकार व तात्विकदृष्ट्या सक्षम विचारवंत होते. त्यांनी काढलेल्या नियतकालिकांच्या आवरणावर दलितांच्या स्वातंत्र्याची व त्यांच्या जीवनानुभवांची छायाचित्रं छापलेली आहेत. पत्रकारिता हा कायमच दलित चळवळीचा अविभाज्य भाग राहिलेला आहे. दलितांच्या नेतृत्वाखालील सामाजिक व राजकीय उपक्रमांना समांतरपणे त्यांची पत्रकारिताही सुरू राहिली. आंबेडकरांच्या काळाप्रमाणे आजही दलितांना छापील माध्यमांमधील पत्रकारिता असाध्य आहे.आंबेडकरांचे पत्रकारी लेखन मराठीत आहे. ते लेखन आपला राष्ट्रीय ठेवा आहे.

डॉ. आंबेडकरांशी झालेल्या भेटीगाठीनंतर शाहू महाराजांना खात्री पटली की हा पुढारी म्हणजे डॉ. आंबेडकरच ठरतील. पुढे एका कार्यक्रमात तर त्यांनी त्यांचा मनोदय बोलून पण दाखवला होता. या सर्व पार्श्वभूमीवर शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांना 2,500 रुपयांचे आर्थिक सहाय्य केले. त्यातून ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक'ची सुरुवात झाली आणि पुढे इतिहास घडला. मूकनायकची जाहिरात 'केसरी'मध्ये द्यावयाची होती. त्यावेळी लोकमान्य टिळक हयातही होते पण तेव्हा पैसे देऊनही ही मूकनायकाची जाहिरात द्यायला 'केसरी'ने तयारी दर्शवली नव्हती.याबाबत डॉ. आंबेडकरांनी लिहिले होते, "आम्हांस पक्के आठवते की जेव्हा आम्ही मूकनायक पत्र सुरू केला होते तेव्हा केसरीला आमची जाहिरात फुकट छापा अशी विनंती केली होती. पण ती धुडकावून लावण्यात आली. तदनंतर तुमचा आकार देतो, छापा असे लिहिल्यावर जागा रिकामी नाही असे उत्तर देण्यात आले!"[२] यावरुन आपल्या हे लक्षात येऊ शकते की अस्पृश्य वर्गाच्या उत्थानासाठी त्याकाळात मुख्य प्रवाहातील वृत्तपत्र पोषक नाहीत, तेव्हा आपल्यालाच स्वतःला हे कार्य हाती घ्यावे लागेल असा विचार डॉ. आंबेडकरांनी केलेला दिसतो.

मूकनायकच्या पहिल्या अंकातील मनोगतात ते आपली भूमिका मांडतात की, "आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास, तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही. "परंतु मुंबई इलाख्यात निघत असलेल्या वृत्तपत्रांकडे न्याहाळून पाहिले असता असे दिसून येईल की, त्यातील बरीचशी पत्रें विशिष्ट जातीचे हितसंबंध पाहाणारी आहेत इतर जातींच्या हिताची त्यांना परवा नसते." डॉ. आंबेडकर पुढे म्हणतात, "दीनमित्र, जागरूक, डेक्कन रयत, विजयी मराठी, ज्ञानप्रकाश, सुबोधपत्रिका या पत्रांतून बहिष्कृत समाजाच्या प्रश्नांची चर्चा वारंवार होते. परंतु ब्राह्मणेतर या अवडंबर संज्ञेखाली मोडत असलेल्या अनेक जातींच्या प्रश्नांचा ज्यात खल होतो, त्यात बहिष्कृतांच्या प्रश्नांचा सांगोपांग ऊहापोह होण्यास पुरेशी जागा मिळणे शक्य नाही, हेही पण उघड आहे."त्यांच्या अतिबिकट स्थितीशी संलग्न असलेल्या प्रश्नांची वाटाघाट करण्यास एक स्वतंत्र पत्र पाहिजे हे कोणीही कबूल करील ही उणीव भरून काढण्यासाठी या पत्राचा जन्म आहे."[३]

डॉ. आंबेडकर तेव्हा सिडनेहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापक होते, त्यामुळे त्यांनी या पत्राची जबाबदारी पांडुरंग नंदराम भटकर यांच्यावर सोपवली होती. काही अंक निघाल्यावर डॉ. आंबेडकर आपले अपुरे राहिलेले शिक्षण पूर्ण करण्यासाठी परदेशात गेले. त्यानंतर मूकनायक बंद पडले. ते विलायतेला गेल्यानंतर केवळ एक अंक निघाला.

मूकनायकचे एकूण १३ अंक निघाले. आपले शिक्षण पूर्ण होऊन जेव्हा आपण भारतात परत येऊ तेव्हा या वृत्तपत्राची भरभराट झालेली आपल्याला पाहायला मिळेल अशी आशा डॉ. आंबेडकरांना वाटत होती पण त्यांची ही इच्छा पूर्ण झाली नाही. या गोष्टीची खंत त्यांच्या मनात राहिली. पण नाउमेद न होता त्यांनी ३ एप्रिल १९२७ ला 'बहिष्कृत भारत' सुरू केले. बहिष्कृतांवरील अन्यायाला जगासमोर आणणारे 'बहिष्कृत भारत'

बहिष्कृत भारतासाठी डॉ. आंबेडकरांना आपले इतर व्याप सांभाळून काम करावे लागत असे.प्रा. अरुण कांबळेंनी 'जनता पत्रातील लेख' या पुस्तकाचे संपादन

केले आहे. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत अरुण कांबळेंनी 'बहिष्कृत भारता'चे कामकाज डॉ. आंबेडकर कसे पाहायचे यावर प्रकाश टाकला आहे. अरुण कांबळे लिहितात की "बाबासाहेब आंबेडकरांनी प्रचंड आर्थिक ओढग्रस्ती सोसूनही बहिष्कृत भारत हे पाक्षिक सुरू ठेवले. बहिष्कृतच्या काळात ते २४- २४ रकाने स्वतः भरुन काढत. कोणीही साहाय्यक त्यांना नव्हता, असा उल्लेख त्यांनी केला आहे."[४] बहिष्कृत भारत हे पाक्षिक दोन वर्षं चालले. बहिष्कृत भारत हे अल्पकाळासाठी चाललं असं कुणी म्हणू शकतं परंतु डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेल्या अस्पृश्यतेविरोधातील लढ्याला लोक चळवळ बनवण्याचे श्रेय याच पत्राला द्यावे लागेल.

**वृत्तपत्र सुरू करण्यामागील डॉ बाबाबसहेब आंबेडकर यांची भूमिका :**

मराठी वृत्तपत्रांचा उदय सहा जानेवारी १८३२ रोजी झाला त्यानंतर ८८ वर्षांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित उद्धाराचे कार्य हाती घेतले व दलित मुखपत्रांची सुरुवात केली या काळात दलित समाजाचे स्वतंत्र वृत्तपत्र नव्हते ३१ जानेवारी १९२० हा दिवस सामाजिक क्रांतीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. याच दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे वृत्तपत्र सुरू केले. हे वृत्तपत्र सुरू करण्यासाठी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी त्यांना आर्थिक मदत देऊ केली .'जगात मुख्याचा आवाज नाही, त्याचा कोणीही वाली नसतो अशा स्थितीत भिड धरून लाज बाळगून हित होणार नाही, आपला आवाज आपणच बुलंद करावयास हवे अशा संत तुकारामांच्या अभंगाची निवड करून मूकनायकाचे ध्येय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर इंग्लंडला पुढील शिक्षणासाठी गेल्याने ८ एप्रिल १९२३ रोजी मूकनायक हे वृत्तपत्र बंद पडले.

त्यानंतर ३ एप्रिल १९२७ रोजी' बहिष्कृत भारतचा' पहिला अंक निघाला, आणि १५ नोव्हेंबर १९२९ रोजी शेवटचा अंक निघून 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र बंद पडले. यादरम्यान ४ सप्टेंबर १९२७ रोजी समता वृत्तपत्राचा प्रारंभ झाला. समता व बहिष्कृत भारत आळीपाळीने दर आठवड्याला प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला गेला. बहिष्कृत भारत बंद झाल्यानंतर 'समता' हे वृत्तपत्र सुरू राहिले. त्यानंतर २४ नोव्हेंबर १९३० पासून 'जनता' हे वृत्तपत्र प्रसिद्ध होऊ लागले. त्याचे ४ फेब्रुवारी १९५६ रोजी 'प्रबुद्ध भारत' मध्ये रूपांतर झाले डॉ. बाबासाहेबांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता व प्रबुद्ध भारत ही पाच वृत्तपत्र चालवली. स्वतंत्र बाण्याचे धारदार आणि तर्कशुद्ध लेखन हे या वृत्तपत्रांचे वैशिष्ट्य होते. अन्याला वाचा फोडून न्यायाची भूमिका स्थापित करण्यासाठी समाजाला खडबडून जागा करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या वृत्तपत्रांनी बहुमोल कामगिरी बजावली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्र ही सामाजिक जाणीव जपणारी होती जेथे इतर भारतीय वृत्तपत्रे ही राजकीय क्षेत्रात जागृती निर्माण करून स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाचा योगदान देत होती अशा काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वृत्तपत्रांनी सामाजिक चळवळ व दलित प्रश्नांचा लढा उभारला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्रातून सामाजिक प्रश्न प्रभावीपणे मांडले अज्ञानी अंधश्रद्धाळू अशिक्षित तसेच वर्ग, वर्ण, जात, धर्म आणि पंथ आणि लिंगभेद यात विभागलेल्या समाजात स्वातंत्र्य मिळाले तरी ते विशिष्ट वर्गाचे राहील अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भूमिका होती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या वृत्तपत्रातून वर्णभेद वर्ग भेद धर्मभेद व लिंगभेद यामुळे वंचित झालेल्या समाजातील घटकांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. आपले लिखाण हे पूर्णपणे सत्याच्या बाजूने आहे याची त्यांना स्पष्ट जाणीव असल्यामुळे त्यांच्या वृत्तपत्रिय लिखाणात स्पष्टता आणि बाणेदारपणा, कणखरपणा दिसून येतो राष्ट्रहित व बहिष्कृत वर्गाच्या हिताच्या आड येणाऱ्या प्रत्येक घटकाविरुद्ध ते ठामपणे उभे राहिले तत्कालीन राष्ट्रहितावर परिणाम करणाऱ्या प्रत्येक राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय विषयांवर ते अभ्यासपूर्ण लिखाण करत राहिले, प्रसंगी स्वकियाबरोबरच ब्रिटिश सरकारला देखील खडेबोल सुनावण्यात त्यांनी मागेपुढे पाहिले नाही, अथांग वाचन आणि समाज हिताची जोड यामुळे त्यांच्या लिखाणात एक बाणेदारपणा दिसून येतो त्यांचे अग्रलेख म्हणजे लिखाणाच्यादृष्टीने सर्वोत्कृष्ट नमुना होय. विद्वत्तापुण विषयांचे प्रतिपादन हे त्यांच्या लिखाणाचे वैशिष्ट्य होते. अशा लेखन कौशल्याबरोबरच मूलभूत सामाजिक प्रश्नांची जाण त्यावरील त्यांचे चिंतन आणि त्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन त्यावरील योग्य उपाय योजना सुचविणे याविषयीची त्यांची मांडणी वाखाण्याजोगे होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृत्तपत्र चळवळीचा परिणाम म्हणून भारतीय समाजात परिवर्तन घडून आले.[५] हे परिवर्तन अस्पृश्यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक स्थितीत दिसून येते, तसेच ते भारतीय वंचित व उपेक्षित ठरलेल्या स्त्री वर्गातही दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्रातून बहिष्कृत, अस्पृश्य समाजाचे प्रबोधन केले, तसेच समाजातील वंचित स्त्री समुदायाचे देखील प्रबोधन केले, त्यासाठी त्यांनी मानव मुक्तीचा लढा उभारला. या लढ्याचे एक हत्यार हे वृत्तपत्र होते. त्यांनी आपला प्रत्येक संदेश पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना देखील दिला. स्त्री मुक्तीच्या लढ्यात महात्मा फुले यांच्या कार्याचा व विचारांचा प्रभाव डा. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर नक्कीच होता. आपल्या वृत्तपत्रातून स्त्रियांचे प्रश्न जाणीवपूर्वक त्यांनी हाताळले. स्त्रियांच्या सामाजिक आर्थिक राजकीय शैक्षणिक प्रश्नावर त्यांनी वेळोवेळी भाष्य केले व त्यावर उपाययोजनाही सुचवल्या

डॉ. बाबासाहेबांच्या वृत्तपत्रांची उद्दिष्टे ही इतर समकालीन वृत्तपत्रांच्या उद्दिष्टांपेक्षा भिन्न होती, त्यांच्या वृत्तपत्रातून अस्पृश्यता निवारण, मानवी प्रतिष्ठा प्रस्थापित करणे, खोट्या धार्मिक कल्पनांवर हल्ला चढवणे, अंधश्रद्धा

नष्ट करणे, जातीभेद नष्ट करणे, ग्रंथ प्रामाण्यवाद नष्ट करणे याबरोबरच स्त्रियांना न्याय मिळवून देणे हे देखील त्यांचे उद्दिष्ट होते. स्त्रियांचे प्रबोधन व स्त्री सबलीकरण हे देखील त्यांच्या वृत्तपत्रे लिखाणाचे महत्त्वाचे अंग होते.

**मूकनायक -**

३१ जानेवारी १९२० डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिनांक 31 जानेवारी 1920 रोजी मूकनायक या पाक्षिकाची सुरुवात केली. हजारो वर्षाच्या गुलामगिरीमुळे अतिशय अवनत अवस्थेत कितपत पडलेल्या मूक अस्पृश्य समाजाच्या नायकाच्या रूपाने हे वृत्तपत्र पुढे आले . समाजाची दयनीय अवस्था त्यांनी या मूकनायकाच्या रूपाने मांडली मूकनायकाची बिरुदावली म्हणजे संत तुकारामांच्या ओव्या, "काय करू आता धरूनिया भीड निशंक तोंड वाजविले ! नवे जगी कोणी मुखियांचा जाणं ! सार्थक लाजून नव्हे! या बिरुदावलीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुखनायकचा समाजक्रांतीचा शंखनाद केला त्यासाठी त्यांनी निर्भय, स्पष्ट व सत्यप्रतिपादनाचे सूत्र अवलंबले होते. या वृत्तपत्रासाठी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी २५०० रुपये आर्थिक मदत देऊ केली. काशिनाथ रघुनाथ सिंग यांच्या मनोरंजन छापखान्यात तीन स्टॅन्ड हस्ट रोड, गिरगाव मुंबई येथे हे पत्र छापण्यात येत होते. पत्राचे कार्यालय हरवली बिल्डिंग डॉ. बालीवाल रोड, पोयबावाडी, परळ येथे होते. या पाक्षिकाचा रजिस्ट्रेशन क्रमांक बी १४३० होता. तर अंक शनिवारी प्रकाशित होत असे किरकोळ अंकाची किंमत दीड आणा होती डॉ. बाबासाहेब आंबेडकर सिडनेहॅम ह्या शासकीय महाविद्यालयात प्राध्यापक असल्यामुळे संपादक म्हणून पांडुरंग नंदराम भटकर हे काम पाहत होते पुढे ज्ञानदेव घोलप यांनीही जबाबदारी स्वीकारली. मूकनायक म्हणजे हिंदू धर्माने तेजोबंग केलेल्या मुक्या गलित गात्र झालेल्या बहिष्कृत समाजाचा हुंकार होता पत्राची सुरुवात" बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचवण्यास तसेच त्यांची भावी उत्क्रांती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यासाठीच झाली होती. पत्राची सुरुवात, "बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचवण्यास तसेच त्यांची भावी उत्क्रांती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यासाठीच झाली आहे. "[६]

बहिष्कृत व शोषित वर्गाच्या लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडणी सामाजिक व सांस्कृतिक बदल घडवून आणणे हे होते त्या दृष्टीने या वृत्तपत्राची योगदान देशाच्या जडत घटनेत महत्त्वपूर्ण ठरली बहिष्कृत यांचे प्रश्न बहिष्कृत यांच्या वृत्तपत्रातून चांगले मांडले जाऊ शकतात यावर बाबासाहेबांचे विश्वास होता इतर वृत्तपत्रातून बहिष्कृत यांचे प्रश्न पोट तिडकीने मांडले जाणार नाहीत इतकेच काय तर मूकनायकची सुरुवात झाली त्यावेळी साधी जाहिरात केशरीतून दिली गेली नाही नव्हती बाबासाहेबांनी बहिष्कृत असे प्रश्न अत्यंत प्रभावीपणे मूकनायकातून मांडले या वृत्तपत्रातून बहिष्कृत वर्गाची सामाजिक राजकीय शैक्षणिक व आर्थिक प्रश्न हाताळले हिंदू धर्मातील अस्पृश्यतेच्या अनिष्ट रूढी व अस्पृश्यांचे राजकीय प्रतिनिधित्व याविषयी मूकनायकाच्या अग्रलेखातून व मनोगत आतून विचार मांडले जात होते. बाबासाहेबांनी मूकनायकातून बहिष्कृत यांच्या राज्यसत्तेतील सहभागाचा आग्रह धरला राजकीय हक्काची मागणी केली मूकनायकाच्या १९ फेब्रुवारी १९२० च्या अंकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिहितात," बहिष्कृत लोकांचा स्वकीयांकडून होत असलेला उपमर्द जितका दुःसह व शोभकारक आहे तितकाच ब्रिटिश राज्यपद्धतीचा कल चुकीचा व शोचनीय आहे म्हणूनच बहिष्कृतांना या राजदंडास असून व नसून खोळंबा असेल असेच म्हणावे लागेल हा दंड स्वराज्याच्या देणगीने आपल्या खालच्यास बाधक होत असलेला आपला पगडा डळमळू न देता आपल्याला मात्र जाचक होत असलेला इंग्रजांचा काटा काढून टाकणे हाच काय तो त्यांचा हेतू, सारांश स्वराज्य म्हणजे आमच्यावर राज्य होणार इंग्रजी राज्यात ज्यांची बात सहन होत नव्हती त्यांची लाथ सोसावी लागणार स्वकियांच्या आर्थिक व धार्मिक जुलमाच्या आड घातलेले इंग्रजी सत्तेचे सुदर्शन लोपून स्वराज्याचा आमच्यावर प्रत्यक्ष आघात होण्याची वेळ येणार म्हणूनच आम्ही म्हणतो की द्याल तर असे स्वराज्य द्या की त्यात थोडे बहुत आमचेही राज्य असेल." [७] तर १० एप्रिल १९२० च्या मुकं नायकाच्या अंकात डॉ बाबासाहेब आंबेडकर लिहितात, "जातवार प्रतिनिधित्व मिळाल्याशिवाय आपल्या हाती राजकीय सामर्थ्य येणार नाही."[८]

मूकनायकाने दबलेल्या वर्गाचे प्रश्न जगाच्या वेशीवर पोहोचवले परकीय गुलामीतून स्वराज्य प्राप्तीच्या लढ्यातच्या रणधुमाळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वराज्यातील बहिष्कृतांच्या स्वातंत्र्याची बाजू मांडण्यासाठी या पत्रातून सुरुवात केली मूकनायकाच्या कामगिरी बाबत गंगाधर पानतावणे म्हणतात,' मूकनायकाने दलितांच्या आकांक्षा रुजवण्याचा जो पहिला प्रयत्न केला त्याला ऐतिहासिक असे महत्त्व आहे, सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर असे स्थान निर्माण केले पाहिजे ही नवी जाणीव मूकनायकाच्या रूपाने अस्तित्वात आली, अस्पृश्यात अस्मिता, जाणीव निर्माण करण्याचे मुख्य कार्य मुख्य नायकाने अल्पावधीत केले, प्रबोधनाचा तो प्रभावी अविष्कार होता' अशा शब्दांमध्ये पानतावणे यांनी या वृत्तपत्राचे महत्त्व अधोरेखित केले

“मूकनायक या बाबासाहेब आंबेडकरांच्या वृत्तपत्राने स्त्रियांच्या प्रश्ना संदर्भात विशेष भूमिका घेऊन स्त्रियांचा प्रश्न वृत्तपत्रातून मांडला' टोणगे पान्हावतील काय 'या विविधविचार सदरात १९१७ साली प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्यास अनुज्ञ देणाऱ्या बिलाला काही मोजक्याच म्युन्सिपालट्यांनी सक्ती केली सक्तीचे शिक्षण मुलांनाच मुलींना मागवून द्यावे अशा निरर्थक चर्चाचा खरपूस समाचार मूकनायक ने घेतला केसरीची स्त्री

शिक्षणाविषयीची विचारसरणी मांडली स्त्रियांना अज्ञानी ठेवण्याचा हेतूही स्पष्ट केला अशा प्रकारे स्त्री शिक्षणाविषयी दुट्टप्पी भूमिका घेणाऱ्या लोकांचा मूकनायक ने समाचार घेऊन स्त्री प्रश्नाविषयीची आपली भूमिका स्पष्ट के० ."९

**बहिष्कृत भारत :**

महाडच्या चवदार तळयाच्या सत्याग्रहाला केवळ १३ दिवस झाले होते. त्यानंतर हे पत्र सुरू करण्यात आले. ही दोन वर्षं डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक जीवनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची होती. या दोन वर्षांत महाडचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, पुण्यातील पर्वती मंदिरात प्रवेशाचा सत्याग्रह अशा महत्त्वपूर्ण घटना घडल्या. याच काळात डॉ. आंबेडकरांची विधिमंडळातील कारकीर्द देखील बहरू लागली होती. राज्यभरात अस्पृश्य परिषदा, शेतकरी परिषदांच्या निमित्ताने डॉ. आंबेडकर पूर्ण महाराष्ट्रभर फिरून लोकसंग्रह करत असत. 'बहिष्कृत भारत' हे त्यांच्या चळवळीचे मुखपत्रच बनले होते. महार वतने खालसा करण्यात यावी असं डॉ. आंबेडकरांना वाटत असे. ही प्रथा बंद व्हावी यासाठी त्यांनी बहिष्कृत भारतमधून आपली भूमिका लोकांना समाजावून सांगितली. डॉ. आंबेडकर जिथे भाषण करत असत तेथील भाषण बहिष्कृत भारतमध्ये प्रसिद्ध केले जात असे.

बहिष्कृत भारतमध्ये केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचेच लेख येत असत असे नाही. त्यांनी आपल्या अनेक सहकाऱ्यांना त्यांनी लिहिण्यास प्रोत्साहित केले. राज्यभरात ज्या-ज्या ठिकाणी चळवळीसंबंधी ठराव होत असत, त्याचे वृत्त बहिष्कृत भारतात येत असे. विचार मानस, पत्रव्यवहार अशा स्तंभातून समाजातील सर्व स्तरातील लोक आपल्या भावना व्यक्त करत. त्यांच्या लेखाला यथोचित स्थान पत्रातून मिळत असे. काही जण टोपणनावाने या पत्रातून लिहित असत.

**बहिष्कृत भारतातले वृत्तांकन :**

डॉ. आंबेडकरांच्या कार्याने प्रोत्साहित होऊन पुरोगामी विचारसरणी अवलंबणाऱ्यांचे अभिनंदन करणाऱ्यांचे पत्र देखील लोक पाठवत असत. याचं एक उत्तम उदाहरण म्हणजे १२ ऑगस्ट १९२७ चा अंक. या दिवशी प्रकाशित झालेल्या अंकात एका पत्रात डॉ. पंजाबराव देशमुखांनी अस्पृश्यता निवारणासाठी कार्य केल्याचा उल्लेख आहे. त्यांच्या घरी दरवर्षी ब्राह्मण भोजन देण्याचा प्रघात होता.तो त्यांनी बंद करून वसतिगृहात शिकणाऱ्या मुलांना भोजन दिले होते. वसतिगृहातील मुलांमध्ये कुठलाही भेदभाव न ठेवता डॉ. देशमुखांच्या मातोश्रींनी सर्वांचे आदरातिथ्य करून समभावाने जेऊ घातले असे 'अमरावतीकर' या नावाने पत्र लिहिणाऱ्या व्यक्तीने म्हटले आहे.

राज्यातल्या विविध जिल्ह्यांमध्ये प्राथमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांवर कसा भेदभाव होतो याची माहिती तक्त्यातून दिली जात असे. मुलांना नेमकं कुठे बसवले जाते, त्या शाळेची इमारत कशा प्रकारची आहे, कोणत्या गावात कशी पद्धत आहे याचा तपशील या तक्त्यातून दिला जात असे.९ तालुक्यातील वेगवेगळया लोकांकडून कोणत्या गावात कसा भेदभाव होतो याची माहिती घेऊन हा तक्ता तयार करण्यात आल्याचे आपल्याला दिसते. डॉ. आंबेडकरांना शिक्षणाविषयी तळमळ होती.

राज्यात जर कुठे अस्पृश्यांवर अत्याचार झाला असेल तर त्याचे वृत्त बहिष्कृत भारतमध्ये दिले जाई. गावगुंडांचे जुलुम, अस्पृश्यांवरील बहिष्कार, तथाकथित शुद्धीकरण अशा प्रकारच्या अनेक बातम्यांना बहिष्कृत भारतात स्थान मिळाले. 'बहिष्कृत भारत' १५ नोव्हेंबर १९२९ मध्ये बंद पडले. त्यानंतर एका वर्षाने 'जनता' सुरू करण्यात आले.बहिष्कृत भारताचे नाव बदलूनच जनता हे नाव देण्यात आले होते. डॉ. आंबेडकरांनी चालवलेल्या नियतकालिकांपैकी सर्वाधिक काळ जनता हेच पत्र चालले.

**'जनतेच्या हितासाठी जनता':**

२४ नोव्हेंबर १९३० ला सुरू झालेले जनता पत्र १९५५ पर्यंत चालले. काही काळ बंद पडून त्यानंतर 'जनता' पत्राचे नाव हे 'प्रबुद्ध भारत' ठेवण्यात आले होते.डॉ. आंबेडकरांच्या वृत्तपत्र कारकीर्दीतील सर्वाधिक काळ चाललेले हे नियतकालिक होते. आपल्या वृत्तपत्रीय कारकीर्दीतील सर्वाधिक काळ लेखन डॉ. आंबेडकरांनी जनतासाठी केले. 'जनतेच्या भाग्योदयासाठी जनता पत्र प्रमुख साधन उपयोगी म्हणून पडेल,' अशी आशा डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केली होती. 'गुलामाला त्याच्या गुलामीची जाणीव करुन द्या म्हणजे तो पेटून उठेल,' हे ब्रीदवाक्य घेऊन जनता पत्र तत्कालिक प्रश्नांवर चर्चा घडवून आणू लागले. 'जनता' पत्र हे केवळ डॉ. आंबेडकरांच्याच नाही तर मराठी पत्रकारितेतील मैलाचा दगड ठरले. १९३० नंतरच्या काळात देशात अनेक राजकीय बदल घडू लागले होते. येत्या काळात स्वातंत्र्य मिळणार हे निश्चित आहे पण कोट्यवधी अस्पृश्य आणि मागासवर्गीय जातीतील लोकांच्या स्थितीत बदल झाला नाही तर ते स्वातंत्र्यानंतरही गुलामगिरीतच राहतील, अशी मांडणी डॉ. आंबेडकरांनी केली.१०

**आर्थिक अडचणीतही 'जनता' चे काम सुरू :**

जनता या पत्रामुळे डॉ. आंबेडकरांवर खूप मोठा आर्थिक ताण पडत होता तरी देखील त्यांनी हे नियतकालिक सुरू ठेवले. त्यांनी २५,०००रुपये खर्च करून स्वतंत्र छापखाना उभा करुन दिला होता.पण जसं त्यांचं वय आणि जबाबदाऱ्या वाढू लागल्या तसं जनताची जबाबदारी त्यांना एकट्याला सांभाळताना त्यांच्यावर ताण पडू लागला होता. आपण आता पन्नाशीकडे झुकु लागलो आहोत आपण वेळोवेळी जनता या पत्राला जीवदान दिले आहे पण आता इतर सहकाऱ्यांनी पुढाकार घेऊन ही जबाबदारी पार पाडावी असे त्यांनी म्हटले होते. 'जनता' सुरू ठेवण्यासाठी जास्तीत जास्त लोकांनी वर्गणीदार होऊन या पत्राची

जबाबदारी घ्यावी, असे त्यांनी आपल्या लेखात म्हटले होते.११

तर कुणाकडून आर्थिक मदत स्वीकारण्याऐवजी आपल्याच वाचक वर्गाने नियतकालिकांना सहकार्य करावे अशी त्यांची भूमिका होती. त्यामुळे वर्गणीदार जोडणे, सभासद जोडणे ही कामे करावीत असा सल्ला ते सहकाऱ्यांना देत. 'अस्पृश्य वर्ग कितीही गरीब असला तरी आठवड्याला एक आणा खर्च करण्याइतका तरी तो निश्चितच गरीब नाही', असं ते म्हणत. दुसरी गोष्टी म्हणजे समाजातील लोकांनी समोर येऊन जनतासाठी देणग्या द्याव्यात अन्यथा 'जनता' बंद पडेल असं ते म्हणत.

**समता साप्ताहिक:**

डॉ. आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी 'समता' हे नियतकालिक सुद्धा सुरू केले होते. त्यांनीच स्थापन केलेल्या 'समता सैनिक दला'चे हे मुखपत्र होते.'समता'ची जबाबदारी बाबासाहेब आंबेडकरांनी देवराव विष्णू नाईक यांच्याकडे सोपवली होती.पुढे हे नियतकालिक बंद पडले असले तरी चळवळीच्या ध्येयावर आधारित नियतकालिक असल्यामुळे महत्त्वपूर्ण ठरते.

**प्रबुद्ध भारत':**

'जनता'चे नाव बदलून ४ फेब्रुवारी१९५६ रोजी 'प्रबुद्ध भारत' ठेवण्यात आले होते. डॉ. आंबेडकरांची संपूर्ण देशाच्या सर्वांगीण उन्नतीबाबत असलेलं दूरदृष्टी, त्यांचे व्हिजन या नावातून दिसते. रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याची घोषणा त्यांनी प्रबुद्ध भारत मधूनच केली होती.

रिपब्लिकन पक्षाची दिशा कशी असेल, या पक्षाची घटना काय आहे, कोणत्या आदर्शांवर हा पक्ष चालणार यासंबंधित सर्व गोष्टी 'प्रबुद्ध भारत' मधून प्रकाशित करण्यात आल्या होत्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्वसमावेशक आणि विविधांगी पत्रकारिता :

डॉ. आंबेडकरांनी आपल्या पत्रकारितेच्या कारकीर्दीत विविधांगी आणि विपुल लेखन केले. त्यांची विद्वता आणि ग्रंथांच्या व्यासंगामुळे ते कुठलाही विषय चटकन समजून घेऊ शकत आणि समजावून देखील सांगू शकत असत. कठीणातील कठीण विषय सामान्य माणसापर्यंत कसा पोहचावता येईल हे ते पाहत. ते विषय देखील लोकांच्या जिव्ह्याळयाचेच घेत. त्यांचे मराठी भाषेवर प्रभुत्व होते. मराठीच्या अभिजात साहित्याचा त्यांचा अभ्यास होता. अत्यंत ओघवत्या भाषेत ते आपला विषय मांडत.

कधी गोष्ट सांगून, कधी दृष्टांत देऊन ते लोकांच्या मनाचा ठाव घेत. तर कधी वीज कडाडल्याप्रमाणे गर्जना करत ते अन्यायाविरुद्ध तुटून पडत.ग्रामीण भागात प्रचलित म्हणी असो वा जगभरातील उत्तमोत्तम साहित्यिकांचे वचन असो, त्या गोष्टीचा वापर ते अत्यंत चपखलपणे आपल्या लिखाणात करत. त्यांच्या लेखनात मराठी भाषेचं सौंदर्य आणि समृद्धी पाहायला मिळते.

मागास जातीतील लोकांना त्यांचे हक्क मिळावेत, शिक्षणाचा प्रचार-प्रसार व्हावा, अस्पृश्यता पूर्णपणे नष्ट व्हावी, महिला, अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे रक्षण व्हावे, धर्मावरील धर्ममार्तंडांचा पगडा कमी होऊन जनतेनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारावा तरच त्यांची उन्नती होईल अन्यथा त्यांना गुलामगिरीतच खितपत पडावे लागेल, अशी भीती डॉ. आंबेडकरांना वाटत होती. त्यातूनच जनोद्धारासाठी त्यांनी पत्रकारिता केली.

विशिष्ट जातसमूहाच्याच लोकांचे हितसंबंध जपणाऱ्या आणि इतर जातींबद्दल अनास्था दाखवणाऱ्या तत्कालीन वृत्तपत्रांना त्यांनी इशारा दिला होता की तुमच्या या वृत्तीचा फटका हा तुम्हालाही बसू शकतो.बहिष्कृत भारतातील मनोगतात ते म्हणतात, 'एखादी जात अवनत झाली तर तिच्या अवनतीचा चट्टा इतर जातीस बसल्याशिवाय राहणार नाही. समाज ही एक नौकाच आहे....एका जातीचे नुकसान केल्यामुळे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार,' हे सांगत असताना ते समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून भाष्य करतात.

आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणात अस्पृश्यांना प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे अन्यथा त्यांची अवस्था आता आहे त्याहून बिकट होईल असा इशारा त्यांनी दिला होता.

महारवतनं हे गुलामगिरीचे चिन्ह असून ती रद्द झाली पाहिजे हे देखील त्यांनी आपल्या पत्रकारितेतून सांगितले.महिलांचे सबळीकरण, शेतकऱ्यांचे प्रश्न, कामगारांचे प्रश्न, अल्पसंख्यांकांचे प्रश्न, भाषावार प्रांतरचनेचा मुद्दा अशा विविध विषय त्यांनी हाताळले. मूकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता आणि प्रबुद्ध भारत ही नियतकालिकं डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या आयुष्याच्या वेगवेगळया टप्प्यावर सुरू केली आणि त्यातून आपल्याला त्यांच्या वैचारिक प्रतिभेची आणि प्रतिमेचे दर्शन घडते. त्यांच्या पत्रकारितेचा वारसा अनेकांना घेत आपल्या परीने ही चळवळ जिवंत ठेवण्याचे कार्य केले.

**संदर्भ व तळटीपा :**

१.संपादक डॉ.पाटील संभाजी - 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता', विनिमय प्रकाशन,२००२, पृष्ठ क्र. ५५ - ५८

२. २० मे १९२७ , बहिष्कृत भारत, महाराष्ट्र शासन सोर्स मटेरिअल ग्रंथ, पृष्ठ क्र.२०-२३

३.मूकनायक- ३१ जानेवारी, १९२०, महाराष्ट्र शासन सोर्स मटेरिअल ग्रंथमालिका, पृष्ठ क्र.३५ -३९

४.प्रा. अरुण कांबळें- 'जनता पत्रातील लेख' २००९ पृष्ठ क्र ६८

५.खंडाळे  व इंगोले विजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता एक सामाजिक विश्लेषण, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद , २००७ पृ.९०९ – ९११
६.मुकनायक अंक ३१ जानेवारी १९२०
७.मुकनायक  अंक २८ फेब्रुवारी १९२०
८.मुकनायक अंक १० एप्रिल १९२०
९.डॉ. बाबसहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मुकनायक - डॉ. बाबसहेब आंबेडकर. म. जोतिबा फुले आणि राजर्षि शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समिति, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन २००८ पृष्ठ क्र.११०
१०.खैरमोडे चांगदेव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र – खंड एक सुगावा प्रकाशन, पुणे पृष्ठ क्र.६६-७०
११.फडके य. दि - विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड – ५ ,मौज प्रकाशन गृह ,२००७, पृष्ठ क्र.२८७

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.8 Jan-Feb 2025

# भारतीय स्वतंत्र आंदोलनातील सुभाषचंद्र बोस यांचे योगदान एक ऐतिहासिक अभ्यास

**प्रा.डॉ. रामभाऊ देवराव काशीद**
इतिहास विभाग
महिला महाविद्यालय आंबेजोगाई
ता. आंबेजोगाई जि. बीड
**Corresponding Author: प्रा.डॉ. रामभाऊ देवराव काशीद**
**DOI-10.5281/zenodo.14778409**

**प्रस्तावना**

राष्ट्रीय काँग्रेस यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय चळवळीत सामील होण्यासाठी १९२१ मध्ये भारतात परत आले. बोस हे जवाहरलाल नेहरू यांचे नेतृत्व असलेल्या गटात गेले. हा गट घटनात्मक सुधारणेसाठी कमी उत्सुक होता आणि समाजवादासाठी अधिक खुला होता. नेताजी सुभाष चंद्र बोस असामान्य आणि प्रतिभाशाली होते, तरी जपानी लोक त्यांना लष्करीदृष्ट्या अकुशल मानत होते, तसेच त्यांचा सैनिकी प्रयत्न अल्पकाळच टिकला.भारतीय राष्ट्रवादाचे मुख्य साधन असलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने बोस यांच्या देशभक्तीची नेहमीच प्रशंसा केली परंतु त्यांच्या रणनीती आणि विचारसरणीपासून स्वतःला दूर केले. ब्रिटिशांची राजवट आझाद हिंद सेनेमुळे कधीही धोक्यात आली नाही.

शोध निबंधाचे उद्देश

१. सुभाष चंद्र बोस यांचे भारतीय स्वतंत्र आंदोलनातील कार्य अभ्यासणे.

२. सुभाष चंद्र बोस यांच्या भारतीय स्वतंत्र आंदोलनातील योगदानाचे विश्लेषण करणे.

सुभाष चंद्र बोस कटक मध्ये रॅवेन्शॉ कॉलिजिएट हायस्कूल नामक शाळेत शिकत होते. ह्या शाळेत त्यांच्या एका शिक्षकाचे नाव वेणीमाधव दास होते. वेणीमाधव दास आपल्या विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीचे स्फुल्लिंग जागवत. त्यांनी सुभाषमधली सुप्त देशभक्ती जागृत केली वयाच्या १५व्या वर्षी, सुभाष गुरूच्या शोधात हिमालयात गेले हाते] गुरूचा हा शोध असफल राहिला. त्यानंतर स्वामी विवेकानंदांचे साहित्य वाचून, सुभाष त्यांचे शिष्य बनले] महाविद्यालयात शिकत असताना, अन्यायाविरूद्ध लढण्याची त्यांची प्रवृत्ती झाली कोलकात्त्यातील प्रेसिडेंसी महाविद्यालयात इंग्रज प्राध्यापक ओटेन हे भारतीय विद्यार्थ्यांशी उर्मटपणे वागत असत म्हणून सुभाष चंद्र बोस यांनी महाविद्यालयात संप पुकारला होता. १

१९२२ साली दासबाबूंनी काँग्रेस अंतर्गत स्वराज पक्षाची स्थापना केली. विधानसभेच्या आतून इंग्रज सरकारला विरोध करण्यासाठी, कोलकाता महापालिकेची निवडणूक, स्वराज पक्षाने लढवून, जिंकली.

स्वतः दासबाबू कोलकात्त्याचे महापौर झाले. त्यांनी सुभाषबाबूंना महापालिकेचे प्रमुख कार्यकारी अधिकारी बनवले. सुभाषबाबूंनी आपल्या कार्यकाळात महापालिकेची काम करण्याची पद्धतच बदलून टाकली. कोलकात्त्यातील रस्त्यांची इंग्रज नावे बदलून, त्यांना भारतीय नावे दिली गेली. स्वातंत्र्यलढ्यात प्राणार्पण केलेल्या क्रांतिकारकांच्या कुटुंबीयांना महापालिकेत नोकरी मिळवून दिली .लवकरच, सुभाषबाबू देशातील एक अग्रेसर युवा नेता म्हणून ओळखले जाऊ लागले. पंडित जवाहरलाल नेहरूंसह, सुभाषबाबूंनी काँग्रेस अंतर्गत इंडिपेंडन्स लिगची स्थापना केली. १९२८ साली जेव्हा सायमन कमिशन भारतात आले, तेव्हा काँग्रेसने त्याला काळे झेंडे दाखवले होते. कोलकात्त्यात सुभाषबाबूंनी ह्या आंदोलनाचे नेतृत्व केले. सायमन कमिशनला उत्तर देण्यासाठी, काँग्रेसने भारताच्या भावी घटनेचा आराखडा तयार करण्यासाठी आठ सदस्यांची समिती नेमली. पंडित मोतीलाल नेहरू ह्या समितीचे अध्यक्ष होते तर सुभाषबाबू त्याचे एक सदस्य. ह्या समितीने नेहरू रिपोर्ट सादर केला. १९२८ साली काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन पंडित मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली कोलकात्त्यात झाले. ह्या अधिवेशनात सुभाषबाबूंनी खाकी गणवेश घालून, पंडित मोतीलाल नेहरूंना लष्करी पद्धतीने सलामी दिली. गांधींजी त्याकाळी पूर्ण स्वराज्याच्या भूमिकेशी सहमत नव्हते. ह्या अधिवेशनात त्यांनी इंग्रज सरकारकडून वसाहतीचे स्वराज्य मागण्यासाठी ठराव मांडला होता. मात्र, सुभाषबाबू व पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांना, पूर्ण

स्वराज्याच्या भूमिकेशी तडजोड मान्य नव्हती. अखेर वसाहतीचे स्वराज्याची मागणी मान्य करण्यासाठी इंग्रज सरकारला एक वर्षाची मुदत देण्याचे ठरले. जर एका वर्षात इंग्रज सरकारने ही मागणी मान्य केली नाही, तर काँग्रेस पूर्ण स्वराज्याची मागणी करेल असे ठरले. इंग्रज सरकारने ही मागणी मान्य केली नाही. त्यामुळे १९३० साली काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली लाहोरला झाले तेव्हा असे ठरवले गेले की जानेवारी २६ हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून पाळला जाईल.२

२६ जानेवारी १९३१च्या दिवशी, कोलकात्त्यात सुभाषबाबू तिरंगी ध्वज फडकावत एका विराट मोर्चाचे नेतृत्व करत होते. तेव्हा पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्यात ते जखमी झाले. सुभाषबाबू तुरूंगात असताना, गांधींजीनी इंग्रज सरकारबरोबर तह केला व सर्व कैद्यांची सुटका करण्यात आली. परंतु सरदार भगतसिंग आदि क्रांतिकारकांची सुटका करण्यास इंग्रज सरकारने नकार दिला. भगतसिंगांची फाशी रद्ध करावी ही मागणी गांधींजीनी इंग्रज सरकारकडे केली. सुभाषबाबूंची इच्छा होती, की ह्याबाबतीत इंग्रज सरकार जर दाद देत नसेल, तर गांधींजीनी सरकारबरोबर केलेला करार मोडावा. पण आपल्या बाजूने दिलेला शब्द मोडणे गांधींजीना मान्य नव्हते. इंग्रज सरकारने आपली भूमिका सोडली नाही व भगतसिंग आणि त्यांच्या साथीदारांना फाशी देण्यात आले. भगतसिंगांना वाचवू न शकल्यामुळे सुभाषबाबू, गांधींजी व काँग्रेसच्या कार्यपद्धतीवर फार नाराज झाले.

१९३० साली सुभाषबाबू कारावासात असताना त्यांची कोलकात्त्याच्या महापौरपदी निवड झाली. त्यामुळे सरकारला त्यांची सुटका करणे भाग पडले. १९३२ साली सुभाषबाबू पुन्हा कारावासात होते. ह्या वेळेस त्यांना अलमोडा येथील तुरुंगात ठेवले होते. अलमोडा तुरुंगात त्यांची तब्येत पुन्हा बिघडली. वैद्यकीय सल्ल्यानुसार सुभाषबाबू ह्यावेळी औषधोपारासाठी युरोपला जायला तयार झाले. १९३६ पर्यंत सुभाषबाबूंचे युरोप मध्ये वास्तव्य होते. युरोप मधील वास्तव्यात सुभाषबाबूंनी आपल्या तब्येतीची काळजी घेतानाच, आपले कार्यही सुरूच ठेवले. त्यांनी इटलीचे नेते मुसोलिनी ह्यांची अनेकदा भेट घेतली. मुसोलिनीने त्यांना, भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सर्वतोपरी सहकार्य करण्याचे वचन दिले. आयर्लंडचे नेते डी व्हॅलेरा सुभाषबाबूंचे चांगले मित्र बनले. पुढे सुभाषबाबू युरोप मध्ये विठ्ठलभाई पटेल ह्यांना भेटले. विठ्ठलभाई पटेल ह्यांच्यासह सुभाषबाबूंनी पटेल-बोस जाहीरनामा प्रसिद्ध केला, ज्यामध्ये त्या दोघांनी गांधीजींच्या नेतृत्वावर कडाडून टीका केली. त्यानंतर विठ्ठलभाई पटेल आजारी पडले, तेव्हा सुभाषबाबूंनी त्यांची खूप सेवा केली. पण विठ्ठलभाई पटेलांचे निधन झाले.३

विठ्ठलभाई पटेलांनी आपले मृत्युपत्र बनवून आपली करोडोंची संपत्ती सुभाषबाबूंच्या नावे केली. पण त्यांच्या निधनानंतर, त्यांचे बंधू सरदार वल्लभभाई पटेलांनी हे मृत्युपत्र स्वीकारले नाही व त्यावर न्यायालयात खटला चालवला. हा खटला जिंकून, सरदार वल्लभभाई पटेलांनी ती सर्व संपत्ती, गांधीजींच्या हरिजन सेवा कार्याला भेट दिली. १९३८ साली काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन हरिपुरा येथे झाले. ह्या अधिवेशनासाठी गांधीजींनी काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून सुभाषबाबूंची निवड केली. हे काँग्रेसचे ५१वे अधिवेशन होते. ह्या अधिवेशनात सुभाषबाबूंचे अध्यक्षीय भाषण फारच प्रभावी झाले. कोणत्याही भारतीय राजकीय व्यक्तीने क्वचितच इतके प्रभावी भाषण कधी केले असेल. आपल्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत सुभाषबाबूंनी योजना आयोग स्थापना केला. पंडित जवाहरलाल नेहरू त्याचे अध्यक्ष होते. सुभाषबाबूंनी बेंगलोर येथे प्रसिद्ध वैज्ञानिक सर विश्वेश्वरैय्या ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक विज्ञान परिषदही भरवली.

१९३७ मध्ये जपानने चीनवर आक्रमण केले. तेव्हा सुभाषबाबूंच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसने चिनी जनतेला साहाय्य करण्यासाठी, डॉ द्वारकानाथ कोटणीस ह्यांच्या नेतृत्वाखाली वैद्यकीय पथक पाठवण्याचा निर्णय घेतला.

१९३८ साली गांधीजींनी काँग्रेस अध्यक्षपदासाठी सुभाषबाबूंची निवड केली असली, तरी गांधीजींना सुभाषबाबूंची कार्यपद्धती पसंत नव्हती. ह्याच सुमारास युरोपात द्वितीय महायुद्धाची छाया पसरली होती. सुभाषबाबूंची इच्छा होती की इंग्लंडच्या कठीण परिस्थितीचा लाभ उठवून, भारताचा स्वातंत्र्यलढा अधिक तीव्र केला जावा. त्यांनी आपल्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत ह्या दिशेने पावले टाकण्यास सुरुवातही केली होती. गांधीजी ह्या विचारसरणीशी सहमत नव्हते.

१९३९ मध्ये जेव्हा नवीन काँग्रेस अध्यक्ष निवडण्याची वेळ आली, तेव्हा सुभाषबाबूंना अध्यक्षपदावर कुणी अशी व्यक्ती हवी होती, जी ह्या बाबतीत कोणत्याही दबावासमोर झुकणार नाही. अशी कोणती दुसरी व्यक्ती समोर न आल्यामुळे, सुभाषबाबू स्वतः पुन्हा काँग्रेस अध्यक्ष बनू इच्छीत होते. पण गांधीजी आता ते नको होते. गांधीजीनी अध्यक्षपदासाठी पट्टाभि सितारमैय्या ह्यांची निवड केली. कविवर्य रवींद्रनाथ ठाकूर ह्यांनी गांधीजींना पत्र लिहून सुभाषबाबूंनाच पुन्हा अध्यक्ष बनवण्याची विनंती केली. प्रफुल्लचंद्र राय, मेघनाद साहा सारखे वैज्ञानिक ही पुन्हा सुभाषबाबूंनाच

अध्यक्ष करावे ह्या मताचे होते. पण गांधीजींनी ह्या प्रश्नावर कुणाचेच म्हणणे ऐकले नाही. शेवटपर्यंत तडजोड न होऊ शकल्यामुळे, अनेक वर्षांनंतर, काँग्रेस अध्यक्षपदासाठी निवडणूक लढवली गेली.४

पण निवडणुकीच्या निकालाने पेच मिटला नाही. पट्टाभि सितारामैय्यांची हार ही आपली स्वतःची हार मानून, गांधीजींनी आपल्या साथीदारांना असे सांगितले की त्यांना जर सुभाषबाबूंची कार्यपद्धती मान्य नसेल, तर ते काँग्रेसमधून बाहेर पडू शकतात. ह्यानंतर काँग्रेस कार्यकारिणीच्या १४ पैकी १२ सदस्यांनी राजीनामा दिला. पंडित जवाहरलाल नेहरू तटस्थ राहिले व एकटे शरदबाबू सुभाषबाबूंच्या बाजूने उभे राहिले. १९३९ सालचे वार्षिक काँग्रेस अधिवेशन त्रिपुरी येथे झाले. ह्या अधिवेशनाच्या वेळी सुभाषबाबू तापाने इतके आजारी होते, की त्यांना स्ट्रेचरवर पडून अधिवेशनाला उपस्थित रहावे लागले. गांधीजी ह्या अधिवेशनाला उपस्थित राहिले नाहीत. गांधीजींच्या साथीदारांनी सुभाषबाबूंशी बिलकुल सहकार्य केले नाही. अधिवेशनानंतरही सुभाषबाबूंनी तडजोडीसाठी खूप प्रयत्न केले. पण गांधीजी व त्यांच्या साथीदारांनी त्यांचे काही चालू दिले नाही. शेवटी परिस्थिती अशी बनली की सुभाषबाबू काही कामच करू शकत नव्हते. अखेर, एप्रिल २९, १९३९ रोजी सुभाषबाबूंनी काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.५

३ मे १९३९ रोजी, सुभाषबाबूंनी काँग्रेस अंतर्गत फॉरवर्ड ब्लॉक नामक आपल्या पक्षाची स्थापना केली. काही दिवसांनंतर, सुभाषबाबूंना काँग्रेस मधून काढून टाकण्यात आले. पुढे फॉरवर्ड ब्लॉक हा एक स्वतंत्र पक्ष बनला. दुसरे महायुद्ध सुरू होण्यापूर्वीच, फॉरवर्ड ब्लॉकने भारताचा स्वातंत्र्यलढा अधिक तीव्र करण्यासाठी, जनजागृती सुरू केली. त्यामुळे इंग्रज सरकारने सुभाषबाबू सहित फॉरवर्ड ब्लॉकच्या सर्व मुख्य नेत्यांना कैद केले. दुसरे महायुद्ध सुरू असताना तुरूंगात निष्क्रिय राहणे सुभाषबाबूंना शक्य नव्हते. सरकारला आपली सुटका करण्यास भाग पाडण्यासाठी, सुभाषबाबूंनी तुरूंगात आमरण उपोषण सुरू केले. तेव्हा सरकारने त्यांची सुटका केली. पण इंग्रज सरकार युद्धकाळात सुभाषबाबूंना मोकळे ठेवू इच्छीत नव्हते.त्यामुळे सरकारने त्यांना त्यांच्याच घरात नजरकैदेत ठेवले. काही वर्षांपूर्वी अॅडॉल्फ हिटलर ह्यांना माइन काम्फ नामक आपले आत्मचरित्र लिहीले होते. ह्या पुस्तकात त्यांनी भारत व भारतीयांविषयी अनुदार उद्गार काढले होते. ह्या विषयावर सुभाषबाबूंनी अॅडॉल्फ हिटलर ह्यांच्याकडे आपली नाराजी व्यक्त केली. अॅडॉल्फ हिटलर ह्यांनी आपल्या कृत्याबद्दल माफी मागितली व आपल्या आत्मचरित्राच्या पुढील आवृत्तीतून ते सर्व परिच्छेद गाळण्याचे वचन दिले. शेवटी, सुभाषबाबूंना समजले की अॅडॉल्फ हिटलर व जर्मनी ह्यांच्याकडून त्यांना फार काही मिळण्यासारखे नाही. त्यामुळे मार्च ८, १९४३ रोजी, जर्मनीतील कील बंदरात, ते अबीद हसन सफरानी नामक साथीदारासह, एका जर्मन पाणबुडीत बसून, पूर्व आशियाच्या दिशेने निघाले. ह्या जर्मन पाणबुडीतून त्यांनी हिंदी महासागरातील मादागास्करचा किनारा गाठला. तिथे त्या दोघांनी भयंकर समुद्रातून रबराच्या होडीने वाट काढत, जपानी पाणबुडी गाठली. द्वितीय महायुद्धाच्या काळात, कोणत्याही दोन देशांच्या नौसेनेच्या पाणबुड्यांच्या दरम्यान झालेली, नागरिकांची ही एकमात्र अदलाबदल. ही जपानी पाणबुडी मग त्यांना इंडोनेशियातील पादांग बंदरात घेऊन आली. पूर्व आशियात पोहचल्यावर वयोवृद्ध क्रांतिकारी रासबिहारी बोस ह्यांनी सिंगापूर येथील फेरर पार्कमध्ये भारतीय स्वातंत्र्य परिषदेचे नेतृत्व सुभाषबाबूंकडे सोपवले. नेताजींच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन, जपानचे पंतप्रधान जनरल हिदेकी तोजो ह्यांनी त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. काही दिवसांनंतर, नेताजींनी जपानची संसद डायट समोर भाषण केले. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी, नेताजींनी सिंगापुरात अर्जी-हुकुमत-ए-आझाद-हिंदची (स्वाधीन भारताचे अंतरिम सरकार) स्थापना केली. ते स्वतः ह्या सरकारचे राष्ट्रपति, पंतप्रधान व युद्धमंत्री बनले. ह्या सरकारला एकूण नऊ देशांनी मान्यता दिली. नेताजी आझाद हिंद फौजेचे सरसेनापतीही बनले.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. प्रा. शांता कोटेकर, सुमन वैद्य, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन नागपूर २००८ पृ. १४६
2. प्रा. ए. जी. थोरात, आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर २०१० पृ. १५२
3. प्रा. डॉ. दिपक देसाई, आधुनिक भारताचा इतिहास, प्रशांत प्रकाशन जळगाव २०१२ पृ. १७७
4. प्रा. सोमनाथ रोडे, आधुनिक भारताचा इतिहास, कल्पना प्रकाशन नांदेड २००८ पृ. ८८
5. प्रा. मदन मार्डीकर आधुनिक भारताचा इतिहास, कैलास प्रकाशन औरंगाबाद २००६ पृ. १२२

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.8 Jan-Feb 2025

# महाराष्ट्र राज्याच्या पायाभरणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास

**डॉ. बाळासाहेब काळे**
इतिहास विभागप्रमुख
इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भिगवण,ता. इंदापूर, जि. पुणे
**Corresponding Author: डॉ. बाळासाहेब काळे**
**Email:** balasahebkale_2007@rediffmail.com
**DOI-10.5281/zenodo.14778430**

**प्रास्ताविक**

भारतातले एक महत्त्वपूर्ण राज्य म्हणून महाराष्ट्राला ओळखले जाते. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य हे भारतातील तिसरे मोठे राज्य आहे. लोकसंख्येच्या बाबतीत महारष्ट्र दुसरे मोठे राज्य आहे. महाराष्ट्रात रेल्वे, रस्ते, हवाई मार्ग आणि जलमार्गांचे सक्षम जाळे आहे. भारतातील उत्कृष्ट शहरीकरण झालेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कृषी, रोजगार, औद्योगिक, सहकार, पर्यटन इत्यादी क्षेत्रांमध्ये पुढारलेले राज्य म्हणून महाराष्ट्राची ख्याती आहे. भारतातील एक प्रगतशील राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. अशा या महाराष्ट्र राज्याची निर्मिती दि. ०१ मे १९६० रोजी झाली. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांना मिळाला होता. त्यांनीच आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी केली.[1] अशा या प्रगतशील महाराष्ट्र राज्याच्या पायाभरणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान श्रेष्ठ होते.

यशवंतराव बळवंतराव चव्हाण हे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री (१९६०-१९६२) होते. भारताचे उपपंतप्रधान, संरक्षणमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्र मंत्री अशी महत्त्वाची पदेही यशवंतरावांनी भूषविली आहेत. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ते ओळखले जातात.[2] यशवंतराव चव्हाण हे सुधारणावादी विचारांचे पुरस्कर्ते होते. उत्कृष्ट संसदपटू, उदारमतवादी व अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ख्याती आहे. ते रसिक व साहित्यिकही होते. ‘युगांतर’, ‘सह्याद्रीचे वारे’, ‘कृष्णाकाठ’, ‘ऋणानुबंध’ इत्यादी त्यांची साहित्यसंपदा आहे.[3]

यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म दि. १२ मार्च १९१३ रोजी देवराष्ट्रे (जि. सातारा) येथे एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले, पुढे उच्च शिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. सन १९३० साली महात्मा गांधीजींनी ‘सविनय कायदेभंग चळवळ’ सुरू केली, तेव्हा त्यात यशवंतरावांनी सहभाग घेतला होता. त्यामुळे सन १९३२ साली यशवंतरावांना पहिला तुरुंगवास झाला होता. या कारावासात मार्क्सवादाशी आणि मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांशी त्यांचा परिचय झाल्यामुळे पुढे कॉंग्रेसमधील रॉयपंथीय गटाशी त्यांचे संबंध वाढले होते. दुसरे महायुद्ध सुरू होण्याच्या वेळी रॉय यांनी घेतलेली युद्धविषयक भूमिका यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांना अमान्य झाली व ते कॉंग्रेसमध्येच राहिले. पुढे सन १९४२ च्या ‘छोडो भारत आंदोलनात’ ते सामील झाले. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. रॉय यांची विचारसरणी व महात्मा गांधींची आंदोलने यांकडे यशवंतराव आकर्षित झाले होते.

परंतू पंडित जवाहरलाल नेहरूंच्या विचारांचा त्यांच्यावर खोल ठसा उमटला गेला. नेहरूंप्रमाणे डावीकडे झुकलेला मध्यममार्गी नेता, असे त्यांचे वर्णन केले जाते.[4]

सन १९४६ साली मुंबई प्रांताच्या विधिमंडळाची निवडणूक होऊन यशवंतराव दक्षिण सातारा मतदार संघातून निवडले गेले आणि संसदीय चिटणीस झाले होते.

१९४८ साली त्यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या चिटणीसपदावर नियुक्ती झाली. सन १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य व पुरवठा खात्याचे मंत्री झाले. पुढे द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्रे हाती घेतली. पुढे मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर (१ मे, १९६०) महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणूनही त्यांचीच निवड झाली.

इ.स. १९६२ मध्ये चीन युद्धाच्या काळात तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी यशवंतरावांची नेमणूक देशाच्या संरक्षणमंत्री पदावर केली. हा त्यांच्या कारकिर्दीचा सर्वोच्च बिंदू म्हणता येईल. पुढील काळात त्यांनी उपपंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री ही पदे यशस्वीरीत्या भूषविली. केंद्रात जनता पक्षाचे सरकार असताना (१९७७-७८) ते विरोधी पक्षनेते होते. तसेच पुढे ते आठव्या केंद्रीय वित्त आयोगाचे अध्यक्षही झाले.[5]

यशवंतराव चव्हाणांनी आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी केली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे त्यावेळेस महाराष्ट्राची सूत्रे यशवंतरावांच्या हाती होती, त्यावेळेस अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत धोरणात्मक निर्णय यशवंतरावांनी घेतले. त्यामुळेच राज्याची पुढची वाटचाल अर्थपुर्ण ठरली आहे.

यशवंतराव एकूण साडेसहा वर्षं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यातील पहिली चार वर्ष म्हणजेच सन १९५६ ते १९६० पर्यंत द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री राहिले. दि. १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून अडीच वर्षं काम पाहिले. हा काळ केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या पायाभरणीचा हा काळ होता.

नवे आर्थिक स्त्रोत तयार करणे, सामाजिक उतरंडीत खाली राहिलेल्या वर्गांना नव्या रचनेत समान संधी मिळवून देणे, आधुनिक शिक्षण आणि उद्योग ही देशाची दिशा होती, तीच महाराष्ट्राचीही दिशा असेल अशी आखणी करायची होती.

'जातीयवादाच्या या विषारी विचारापासून आपण महाराष्ट्राला मुक्त केले पाहिजे. जातीयवादाचा हा विचारच समूळ नष्ट केला पाहिजे, तेव्हाच महाराष्ट्राचे सामाजिक मन एकजिनसी होईल.[6] यासाठी यशवंतरावांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले होते.

महाराष्ट्राच्या विकासासाठी यशवंतरावांनी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले. त्याचे दूरगामी परिणाम झाल्याचे आपल्याला पाहायला मिळतात.

**लोकशाहीचे विकेंद्रीकरण आणि पंचायत राज**

महाराष्ट्राला यशवतंराव चव्हाण यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेची अमूल्य देणगी आहे. भारत स्वतंत्र झाल्यावर सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी सगळेच आग्रही होते. ब्रिटिशांच्या काळात प्रांतांची निवडून आलेली सरकारं होतीच. त्याखाली लोकल बोर्ड होते. पण खेडं हे केंद्रस्थान मानून गावागावापर्यंत लोकशाही नेण्यासाठी, स्थानिक पातळीवरही निर्णयाचे अधिकार देण्यासाठी पंचायत पद्धती आणण्यावर पंडित नेहरुंचा भर होता. बलवंतराय मेहता समितीनं त्यासाठी केलेल्या शिफारसींनुसार काही राज्यांनी ती प्रत्यक्षातही आणली. पण यशवंतराव चव्हाणांना त्यात काही त्रुटी जाणवत होत्या. त्यानुसार महाराष्ट्रानं स्वतंत्र अभ्यास केला, त्यासाठी वसंतराव नाईकांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. यशवतंरावांच्या स्वत:च्या काही सूचना आणि आग्रह होते. त्यानुसार आठ महिन्यांनी महाराष्ट्रानं स्वत:चं पंचायत राज्य विधेयक आणलं.[7] दि. ८ डिसेंबर १९६१ रोजी ते विधिमंडळानं संमत केलं आणि दि. १ मे १९६२ पासून ते अंमलात आणलं गेलं. यानुसार महाराष्ट्रात जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय रचना अस्तित्वात आली.[8]

देशात इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये ही व्यवस्था जास्त यशस्वी ठरली. १९५२-५६ या काळात यशवंतराव स्थानिक स्वराज्य संस्था विभागाचे मंत्री होते. या काळातला त्यांचा अनुभव महाराष्ट्राला उत्तम पंचायत राज्य व्यवस्था देण्यात झाला असं म्हटलं जातं. या पद्धतीमुळं दोन गोष्टी प्रामुख्यानं झाल्या. एक म्हणजे सत्ता केवळ केंद्र वा राज्यातल्या नेतृत्वाच्या हाती न केंद्रीत होता, ती गावपातळीपर्यंत विभागली गेली. निर्णय घेण्याचे अधिकार आणि ते प्रत्यक्षात आणण्याची प्रशासकीय व्यवस्था गावांपर्यंत तयार झाली. त्याची स्वायत्तता हीसुद्धा एक देणगी होती आणि असं म्हटलं गेलं की अनेक आमदार, खासदारांचा त्याला तेव्हा विरोध होता कारण त्यांचं काहीच चालणार नव्हतं. पण यशवंतरावांनी ती प्रसंगी वाईटपणा पत्करुन प्रत्यक्षात आणलं.

'विधेयकातील काही तरतुदींवर केंद्रातील काही लोक आणि राज्यातील आमदार, खासदार नेतेमंडळी नाराज होती. कारण त्यांना जिल्हा परिषदांच्या कामात हस्तक्षेप

करायला वाव ठेवण्यात आला नव्हता. चव्हाणांनी मात्र मोठ्या चातुर्यानं विधेयक संमत करुन घेतलं. दि. १२ एप्रिल १९६१ रोजी नाईक समिती अहवाल जेव्हा विचारासाठी विधिमंडळात आला त्यावेळी चव्हाणांनी केलेलं भाषण त्यांच्या विचारपूर्वक संसदीय वक्तृत्वाचा एक नमुना तर आहेच, पण त्याचप्रमाणे लोकशाहीतील प्रशासनाच्या प्रक्रिया, निर्वाचित सत्ताधा-यांचे अधिकार आणि पंचायत राज्याच्या संकल्पनेचा लोकशाहीच्या चौकटीत बसणारा भावार्थ याबद्दलचा त्यांचा अभ्यास आणि गाढ समज या भाषणातून प्रतीत होते. खासदार आणि आमदारांना जिल्हा प्रशासनावर कोणतेही स्थान असू नये हा विधेयकातील वादाचा मुद्दाही मंजूर झाला.'[9] याशिवाय महाराष्ट्रात स्थानिक नेतृत्त्वाच्या उदयाला सुरुवात.

केवळ उच्चवर्गीय वा धनाढ्य वा राजकारणात स्थिरावलेल्या कुटुंबांनाच नेतृत्व करता येईल असा समज आणि रचना या नव्या पद्धतीनं मोडून काढली. गावपातळीवरुन पंचायत पद्धतीत नेतृत्व पुढं येऊ लागलं. ती एक संसदीय पद्धतीची शाळाच बनली. त्या प्रक्रियेतून मोठं झालेल्यांनी पुढे महाराष्ट्राचं नेतृत्व केलं. आजही महाराष्ट्रातले मंत्री वा आमदार यांची सुरुवात ग्रामपंचायत सदस्य या टप्प्यापासून झालेली पाहायला मिळते.

**कृषी आणि औद्योगिक धोरण**

कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र कायम देशातल्या आघाडीच्या राज्यांमध्ये गणला जातो. काळाच्या ओघात पारंपरिक कृषिपद्धतीची जागा आधुनिक शेतीनं घेतली आणि राज्य कृषिप्रधान अर्थव्यवस्थेकडून उद्योगाधारित अर्थव्यवस्थेकडे गेलं.

औद्योगिकीकरण आणि शहरीकरण झालेल्या निवडक राज्यांपैकी एक महाराष्ट्र राज्य आहे. पण ही एक दीर्घ प्रक्रिया आहे आणि जर त्या प्रक्रियेसाठी पायाभरणीस असलेली धोरणं सुरुवातीला नसतील तर पुढच्या आधुनिक टप्प्यांचा तर विचारच करायला नको. अशी पायाभरणी करण्याचं द्रष्टेपण यशवंतरावांनी दाखवलं. त्यामुळेच कृषी, कृषीआधारित उद्योग आणि उद्योग यासाठी त्यांनी घेतलेले निर्णय महत्वाचे मानावे लागतील.[10]

**सहकार चळवळ**

सहकार चळवळी व त्यातून उभारल्या गेलेल्या अर्थव्यवस्थेची एक परंपराच महाराष्ट्रात आजही पाहायला मिळते. महाराष्ट्रातलं राजकारण हे सहकाराचं राजकारण म्हटलं जात होतं. यशवंतरावांच्या अगोदरच प्रवरानगर सारख्या व अन्य ठिकाणी सहकारी तत्वावरचे प्रयोग महाराष्ट्रात यशस्वी झाले होते. पण यशवंतरावांनी या प्रयोगांना कायद्याचे आणि संस्थात्मक बळ दिले. यशवंतरावांनी ठरवून काही धोरणं निश्चित केली. त्या धोरणांमुळेच राज्यात सहकारी, औद्योगिक वसाहती तयार झाल्या आहेत. साखर कारखाने, दूध संघ, कुक्कुटपालन, पतपेढ्या असं एक जाळं कालानुरुप तयार होतं गेलं.

डॉ. जे. एफ. पाटील यांनी म्हटल्याप्रमाणे 'सहकारी अर्थकारण ही यशवंतराव चव्हाण यांची विकासाच्या अर्थशास्त्राला एकमेवाद्वितीय देणगी आहे. त्यांनी महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० मध्ये मंजूर केला. सहकारी संस्थांना सरकारी भांडवल आणि मार्गदर्शन देण्याची व्यवस्था केली. सहकारी पत, सहकारी पणन, सहकारी वाहतूक, सहकारी ग्राहक भांडारे, सहकारी श्रमिक संस्था, तसेच सहकारी खरेदी-विक्री संघ असा एक सर्वस्पर्शी ग्रामीण विकासाचा आराखडा तयार करण्यात यशवंतराव यशस्वी झाले.'[11]

महाराष्ट्रात 'कुळकायद्याची' प्रभावी अंमलबजावणी आणि १९६१ सालचा 'कमाल जमीन अधिग्रहण कायदा'. यामुळे कृषीअर्थव्यवस्थेत सर्व वर्गांकडे जमिनीचं वाटप झालं. बहुतांश समाज या व्यवस्थेशी जोडला गेला. शेतकरी वर्गाच्या कल्याणासाठी त्यांनी नवं कृषि–धोरण अंगिकारलं. कसेल त्याची जमीन यासारखा प्रगत विचाराचा कायदा केला. अरुण साधू यांनी म्हटल्याप्रमाणे 'चव्हाणांनी राज्यभर औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची सर्वंकष योजना स्वीकारली, ज्यायोगे शहरांपासून दूर ग्रामीण भागातदेखील छोटे कारखाने निघून तेथील रोजगार वाढेल. मूळ कल्पना नेहरुंनी १९४७ मध्ये स्थापन केलेल्या अॅडव्हायजरी प्लानिंग बोर्डाची. त्यांनी १९५५ मध्ये प्रांतांना औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची शिफारस केली. तेव्हा मुख्यमंत्री चव्हाणांचे द्वैभाषिक राज्य त्यात आघाडीवर होते. महाराष्ट्र राज्य झाल्यावर त्या योजनेत सुधारणा करुन तिचा वेगानं विस्तार केला. मुंबईजवळ ठाणे, पुण्याच्या आसपास आणि कोल्हापूरजवळ शासकीय प्रयत्नानं अशा वसाहती निर्मिल्या गेल्या आणि त्यांना योजनेप्रमाणे पुष्कळ सोयी-सवलती मिळाल्या. पुण्याजवळ भोसरी येथे औद्योगिक वसाहत उभारायची होती तेव्हा चव्हाणांनी स्वत: जाऊन वसाहतीसाठी जागा निवडली.'[12] आज या भागात टाटा आणि बजाज यांनी आपल्या वाहनउद्योगाचे कारखाने उभारले त्यामुळे हा भाग 'ओटोमोबाईल हब' म्हणून ओळखला जातो.

मुळात औद्योगिक वसाहतींची (MIDC) संकल्पनाच चव्हाण यांनी आणल्यामुळे आज महाराष्ट्र राज्य

औद्योगिकीकरणात देशात आघाडीवर आलेले पाहायला मिळते. मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासावर खूप भर दिला होता. सहकार चळवळीचे महत्त्व जाणून त्यांनी महाराष्ट्रात सहकार क्षेत्राचा पाया पक्का केला.

**शिक्षणक्षेत्रातले अमूलाग्र निर्णय**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शिक्षणक्षेत्रात यशवंतराव चव्हाण यांनी घेतलेले काही निर्णयही दूरगामी परिणाम करणारे ठरले. नवीन विद्यापीठ स्थापन करायचा निर्णय यशवंतराव चव्हाण यांनी घेतला. तेव्हा मुंबई, पुणे, नागपूर ही मोजकी विद्यापीठं महाराष्ट्रात होती. शिक्षण सर्वदूर न्यायचं असेल, नवी पिढी घडवायची असेल तर नवीन विद्यापीठं हवीत. पण तेव्हा विद्यापीठ एखाद्या भागाला मिळण्यासाठी अनेक अटी होत्या. मुख्य म्हणजे त्या भागात काही संख्येनं महाविद्यालयं असणं आवश्यक होतं. पण मराठवाड्यासारख्या भागात तेव्हा कमी महाविद्यालये होती आणि परिणामी विद्यापीठ नव्हते. पण यशवंतरावांनी तो निर्णय बदलला आणि मराठवाड्यात संभाजीनगर (औरंगाबाद) मध्ये विद्यापीठ १९५८ मध्ये सुरु केले. ते आज डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ म्हणून ओळखलं जातं. कोल्हापूर मध्ये शिवाजी विद्यापीठ १९६२ मध्ये सुरु केले.

आजही महाराष्ट्रात आर्थिकदृष्ट्या मागास (EBC) असलेल्यांना विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कात सवलत मिळते. यशवंतरावांनी 'EBC' सवलत सुरु केली. तेव्हा 1200 रुपये आर्थिक उत्पन्न वा त्यापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या पाल्यांना शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आलं होतं. कालानुरुप ही रक्कम बदलत गेली. पण त्यामुळे अनेकजण शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आले. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी त्यांनी जातीनं लक्ष दिले होते.

'यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात दूरगामी पावलं टाकली. याचे एक उदाहरण म्हणजे सातारा इथे सैनिक स्कूलची केलेली स्थापना हे होय.'[१३] सातारा जिल्ह्यातील काही गावांमधून सैन्यात भरती होण्याचे प्रमाण आजही मोठे असल्याचे दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबर व नंतर धर्मांतर केलेल्या नवबौद्ध समाजाचे केवळ धर्मांतर करून शैक्षणिक व सामाजिक मागासलेपण कमी होणार नाही. म्हणून नवबौद्ध समाजाला कायद्याने सवलती मिळवून देण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय यशवंतरावांनी घेतला.

**साहित्य - संस्कृती**

यशवंतरावांचे साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान अतुलनीय होते. त्यांचे साहित्य आणि सांस्कृतिक वर्तुळाशी असलेले घनिष्ठ संबंध सवर्श्रुत होते. ते स्वत: राजकारणाच्या व्यस्ततेतून लेखन करत. त्यांनी 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'ची स्थापना १९६० मध्ये केली. त्यातूनच पुढे 'मराठी विश्वकोश मंडळा'ची निर्मिती १९८० मध्ये झाली.

प्राचार्य पी. बी. पाटील यांनी म्हटल्याप्रमाणे 'महाराष्ट्रातील सामान्य मराठी माणसांची पिढ्यान् पिढ्यांची मानसिक कोंडी फोडण्याचे काम चव्हाण साहेबांनी केले. मरगळून गेलेल्या मनांत नवा आत्मविश्वास भरला आणि कार्यकर्तृत्वाची अनेक दालने उघडून पुढे जाण्याचे रस्ते काढून दिले. यशवंतरावांचे जीवनकार्य हे महाराष्ट्राला प्रेरणा, स्फूर्ती, दिशा आणि दृष्टी देणारे आहे.'[14]

'थोर देशभक्त, रसिक मन, धुरंधर मुत्सद्दी, विचारवंत, गुणग्राही, सौजन्यमूर्ती, व्यवहारी राजकारणी, दिलदार मित्र व लोकांच्या प्रेमात गुरफटलेला नेता. समर्थ, समाजवादी, लोकशाहीचे पुरस्कर्ते, थोर चारित्र्यसंपन्न समाजसेवक, अभिरुचीसंपन्न कलारसिक, सुसंस्कृत, गुणग्राही राजकारणी - संक्षेपी वाचक, ओजस्वी वक्ते, विचारवंत, समृद्ध महाराष्ट्राचे शिल्पकार, सह्याद्रीचा प्रतिभासंपन्न भूमिपुत्र, मराठी मनाचा तुरा...'[15] अशा स्वरूपाचे वर्णन यशवंतराव चव्हाण यांच्या संदर्भात राम प्रधान यांनी केले आहे.

महाराष्ट्रासह देशाच्या राजकारणावर ज्यांचा प्रभाव होता असे ते राजकारणी होते. स्वातंत्र्य लढ्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यासोबतच सामाजिक कार्य आणि साधी राहाणी हे त्यांचे वैशिष्टय होते. भारताच्या उपपंतप्रधान पदापर्यंत पोहोचले असले तरी सामान्य माणसाशी त्यांची नाळ जोडलेली होती. यशवंतरावांनी महाराष्ट्रातील अनेक तरुणांमधील नेतृत्वगुण व धडाडी ओळखून त्यांना पुढे आणले. यातील एक नाव म्हणजे शरद पवार. शरद पवार हे यशवंतरावांना राजकीय गुरु मानतात. अशा प्रकारे यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याला समृद्ध बनण्याच्या वाटचालीचा पाया घातलेला दिसतो. त्यामुळे त्यांचे महाराष्ट्राच्या पायाभरणीतील योगदान अतुलनीय आहे.

**टिपा व संदर्भ–साहित्य–सूची**

1. विश्वास मेहेंदळे, यशवंतराव ते विलासराव, अनुबंध प्रकाशन, पुणे, २००७, पृ. ८०.

2. गोविंद तळवलकर, यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तृत्व, मौज प्रकाशन, मुंबई, २०१२, पृ. ३७.
3. कित्ता.
4. https://mr.wikipedia.org/wiki/
5. विश्वास मेहेंदळे, पूर्वोक्त, पृ. ८१.
6. ना. धों. महानोर (संकलन), यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, २०१२, पृ. ३०.
7. https://education.vikaspedia.in/viewcontent/education/apala-maharashtra/
8. गोविंद तळवलकर, पूर्वोक्त, पृ. ६२.
9. https://www.yashwantraochavan.in
10. यशवंतराव चव्हाण, कृष्णाकाठ, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, २००६, पृ. १८.
11. कित्ता.
12. रामभाऊ जोशी, यशवंतराव इतिहासाचे एक पान, केसरी प्रकाशन, पुणे, १९७६, पृ. २३.
13. विश्वास मेहेंदळे, पूर्वोक्त, पृ. ८२.
14. कित्ता.
15. गोविंद तळवलकर, पूर्वोक्त, पृ. ३९.

नेताजी शिक्षण संस्थेचे,

# सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय,

केडगाव, ता.  दौंड, जि. पुणे ४१२२०३.

# अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद ३२  वे राष्ट्रीय अधिवेशन

प्रमुख संपादक
डॉ. अरुणा मोरे
अध्यक्षा
अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

प्रकाशक
प्राचार्य डॉ. नंदकुमार जाधव
सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
केडगाव, ता. दौंड, जि. पुणे